म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय कथा
दा. क्र. १७१०

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १७१०

IRBK-0101710

IRBK-0101710

# प्राची

## कथासंग्रह

लेखक

वा. ग. तळवलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
प. क्र. ९७१० नों दि

J. S. LTD.
POONA 2

IRBK-0101710
IRBK-0101710

पुणें

१९४०

प्रकाशक

जनार्दन सदाशिव लिमिटेड, पुणें.

प्रकाशक :
मनोहर रानडे,
जनार्दन सदाशिव लिमिटेड, करितां
३९४ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

—सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन—

मुद्रक :
मनोहर रानडे
जनार्दन सदाशिव लिमिटेड
३९४ सदाशिव पेठ, पुणें नं

# आभार

* कथा
नों. क्र. १०८६९
१७।५।५२

## पुनर्मुद्रण

पूर्वप्रकाशित गोष्टींच्या पुनर्मुद्रणाला अनुमति दिल्याबद्दल किर्लोस्कर, मनोहर, स्त्री, ज्योत्स्ना, साप्ताहिक सकाळ या नियतकालिकांच्या संपादकांचा लेखक आभारी आहे.

## मुखपृष्ठ

मुखपृष्ठाच्या सजावटीचें श्रेय श्रीयुत के. बी. गोडबोले, बी. ए., आणि श्रीयुत जे. बी. दीक्षित, जी. डी. आर्ट यांच्याकडे आहे.

## उल्लेख

‘बुद्धि आणि भावना’, ‘मुशाहिरा’ व ‘सुटलेला नाद’ या तीन गोष्टींना परभाषेंतील कथासूत्रें आधारभूत आहेत. बाकीच्या गोष्टी स्वतंत्र आहेत.

# प्राची

## कथाक्रम


| | कथा | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | केवळ सिगरेटवरून | ... | १ |
| २ | शरदूचें मासिक ... | ... | १५ |
| ३ | आशा ... | ... | २० |
| ४ | बुद्धि आणि भावना | ... | २७ |
| ५ | धाकटा मेंदू ... | ... | ३४ |
| ६ | खडूची कांडी ... | ... | ३८ |
| ७ | तिसरा प्रयत्न ... | ... | ४० |
| ८ | मुशाहिरा ... | ... | ५१ |
| ९ | वसुधावहिनी ... | ... | ७० |
| १० | खास अंक ... | ... | ९१ |
| ११ | संभावितांच्या सान्निध्यांत | ... | ९९ |
| १२ | खोट्या नाण्यांचा कारखाना | ... | १०६ |
| १३ | सुटलेला नाद ... | ... | १२३ |

म. ग्रं. सं. ठाणे. बाल... शाखा.
क्र. ... ... नों. दि. ...
वि. ... ...

# केवळ सिगरेटवरून!

दहा-पंचवीसची नव्हे, पण अगदीं सव्वादहाची लोकल पकडायची म्हटली तरी अजून वीस मिनिटें अवकाश होता. आणि घरून स्टेशनवर जायला असा किती वेळ लागणार होता ? फार तर तीन मिनिटें. तेव्हां साहजिकपणें जगन्नाथनें अजून सूट चढवला नव्हता. नुकतेंच जेवण करून तो आपल्या आवडत्या ' गोल्ड फ्लेक ' चा समाचार घेत आरामखुर्चीवर पडला होता.

इतक्यांत मंदाकिनी आंतून आली आणि तोंडावर हात ठेवून आणि डोळे मोठे करून म्हणाली, " हें काय ? कपडे नाहीं केले अजून ! " असें म्हणून ती नेहमींप्रमाणें हसली.

" वेळ आहे अजून ! " घड्याळाकडे एक बेफिकीर कटाक्ष टाकून जगन्नाथ म्हणाला, " शिवाय घड्याळ पुढें आहे आज. "

मंदाकिनीनें पुन्हां एकदां गाल फुगवून तोंडावर हाताचा पंजा ठेवला आणि पुन्हां तसेच डोळे मोठे करून ती म्हणाली, " अगबाई ! विसरलेंच कीं नवी पॅंट काढून ठेवायला ! " आणि ती शेजारचें कपाट उघडूं लागली.

कसलेंहि आश्चर्य किंवा विस्मय व्यक्त करायचा झाल्यास: मंदाकिनीचा तो अभिनय ठरलेला असे. जगन्नाथलाहि त्याची भारी गंमत वाटे.

या वेळींहि असेंच झालें. रंगांत येऊन त्यानें खुर्चीवर पडल्या-पडल्याच आपले ओठ चिंचोळे करून सिगरेटचा धूर मंदाकिनीच्या तोंडावर सोडला.

तिला गुदमरल्यासारखें झालें कीं काय कुणास ठाऊक, पण "इश्श!" असें म्हणत ती झट्कन् दूर सरली. "कितीदां सांगायचं तुम्हाला!" ती जरा तक्रारीच्या स्वरांत म्हणाली.

जगन्नाथ फक्त मोठ्यानें हंसला! हें मात्र तिला सहन झालें नाहीं. पण ती कांहीं बोलली नाहीं. अखेर तोच म्हणाला,

"काय होतं मोठं सिगरेट ओढली म्हणून?"

"शी:! घाण सगळी!"

यावर तिला केवळ खिजविण्याच्या हेतूनें जगन्नाथ म्हणाला, "ओढल्याशिवाय कसं कळेल घाण कां चांगलं तें?"

"पुरे झालं!" तिची चीड आता हळूहळू प्रकट होऊं लागली होती.

"पुरे झालं कां? विसरलीस वाटतं? त्या दिवशीं आपण खालच्या इराण्याकडे बसलों होतों. चहा झाल्यावर मीं सिगरेट्स् मागवल्या. नेहमींप्रमाणंच 'ओढायच्या नाहींत,' म्हणून तू म्हणालीस. त्यावर मीं म्हटलं, 'तू ओढून पाहा हवी तर.' तेव्हां बाईसाहेब, आपलं मनोधैर्य कुठं पळालं?"

आतां जास्त वादाच्या भरीस पडल्यास आपल्या मनाचा तोल जाईल या भीतीनें मंदानें आपला राग मोठ्या मुष्किलीनें आवरला आणि तो विषयच बदलायचा प्रयत्न केला. ती म्हणाली,

"बरं, पण आज जायचं ना?"

"कुठं? पॅथेला? मीं म्हटलं होतं खरं पॅथेला जाऊं म्हणून;

नकोच. आज आपण रीगललाच जाऊं या. आजपासून तिथं एक अप्रतिम टॉकी लागली आहे. आजपर्यंतची हॉलिवुडची सर्वोत्कृष्ट लव्ह-स्टोरी आहे म्हणे. अन् त्यांतली नायिका तर हुबेहुब तुझ्यासारखी दिसते बघ. परवाच ट्रेलर पाहिला मीं."

"बरं पण लौकर याल ना तुम्ही?" ती जरा शांत होऊन म्हणाली.

त्यालाहि जरा बरें वाटलें. तो म्हणाला, "हो तर, आज शनिवारच आहे. अडीचला येईन मी. शक्य तोंवर मॅटिनीच साधूं आपण."

आणि तिच्या रागाचा उरलासुरला अंशसुद्धां घालवून टाकण्याकरितां म्हणून तो उठला आणि तिच्याजवळ जाऊन डाव्या हातानें तिचा ऊजवा खांदा हालवीत हलकेंच पुढें म्हणाला, "म्हणजे मग सावकाश फिरत फिरत यायला हरकत नाहीं. गिरगांवांत थांबू जरा वेळ. तुला पातळ घ्यायचं होतं ना? मग येईन मी अडीचला, हं."

इतकें म्हणून तो किंचित् पुढें वाकला—

पण त्याला आज निराळाच प्रकार दिसला!

झट्कन् मंदाकिनीनें मान फिरवली आणि त्याला आपल्या उजव्या हातानें दूर सारलें!

जगन्नाथ विस्मयचकित झाला! क्षणमात्र त्याला कळलेंच नाहीं आपण कुठं आहोंत तें! पण दुसऱ्याच क्षणीं त्याला आपल्या भोंवतालच्या परिस्थितीची जाणीव झाली. किती विरस झाला त्याचा! नुसता विरसच नाहीं तर त्याला विलक्षण रागहि आला मंदाकिनीचा! त्याच्यासमोर त्याची रोजची मंदा उभी नव्हती तर आज त्या ठिकाणीं दुसरीच कुणी मंदा होती असें त्याला वाटलें!

त्यानें कपाळाला आंठ्या आणून त्या नव्या मंदाकडे पाहिलें; आणि त्यानें न विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्याचा आविर्भाव आणून मंदा तिरस्कारपूर्वक म्हणाली,

"तोंडाला वास येतो तुमच्या !"

हा आघात मात्र अगदीं असह्य होता !

जगन्नाथ कांहींएक बोलला नाहीं. त्यानें एक वेळ घड्याळ पाहिलें, हँगरवरचा कोट काढला, पायांत चपला सरकवल्या आणि अंगांत कोट चढवत चढवत तो तसाच बाहेर पडला.

दहा-पंचवीसची लोकलसुद्धां त्याच्यासाठीं थांबून राहिली नव्हती.

अखेर अकरा वाजून दहा मिनिटांनी तो कसाबसा ऑफिस-मध्यें हजर झाला. आणि बारा वाजण्याच्या आंत कधींहि न येणारा त्याचा साहेबसुद्धां आज त्याच्या आधीं येऊन बसला होता.

जगन्नाथनें अंगांतला कोट काढून आपल्या खुर्चीच्या पाठीला अडकविला मात्र, इतक्यांत पट्टेवाला शिवराम त्याच्या टेबलापाशीं येऊन आदबीनें म्हणाला, " साहेब, बड्या साहेबांनीं आज दोनदां विचारलं तुम्ही आलांत का म्हणून ? अन् तुम्ही आल्याबरोबर वर्दी द्यायला सांगितलीय् मला." इतकें सांगून शिवराम साहेबांच्या खोलीकडे जाऊं लागला. तो आंत शिरला तरी जगन्नाथ खोलीच्या झुलत्या दाराकडे पाहातच राहिला.

शिवरामला बाहेर यायला वेळ लागला नाहीं. त्यानें जवळजवळ धावतच येऊन डोळ्यांच्या खुणेनें जगन्नाथरावांना काय तें विदित केलें.

जगन्नाथनें पुन्हा कोट चढवला आणि तो झटकन् साहेबाच्या खोलींत गेला.

आज जगन्नाथच्या नशिबानें त्याला त्याच्या आयुष्यांतला सग-ळ्यांत वाइट दिवस दाखवायचें ठरविलें होतें कीं काय न कळे ! उशिरा आल्याबद्दल साहेबानें त्याची हजेरी घ्यायला सुरवात केली. जगन्नाथला वक्तशीरपणाबद्दलचें त्याचें व्याख्यान म्हणजे कुठल्याशा

संस्कृत पुस्तकांतल्या 'वदतोव्याघाता'चें उदाहरण आहे कीं हा मराठींतील ठराविक स्वरूपाच्या 'नाटयछटे'चा नमुना आहे हेंच कळेना! आणि यांपैकीं तें काय आहे हें ठरवायला जगन्नाथ मोकळाहि नव्हता. आपलें पार भडकलेलें मन शांत करण्याच्या खटपटींत होता तो.

आणि त्याच्या साहेबाला तरी जगन्नाथाचें उशिरा येणें हा एकच विषय त्याची हजेरी घ्यायला पुरेसा होता थोडाच! तो तरी आपलें अस्खलित वक्तृत्व एकाच मुद्दयाभोंवतीं किती वेळ घुटमळत ठेवणार? त्याच्या काकदृष्टीला जगन्नाथमध्यें आणखी एक वैगुण्य सांपडायला वेळ लागला नाहीं.

"अन् काय हा तुमचा पोषाख! धोतरांत ऑफिसला येतां?" वगैरे वगैरे.

साहेबाच्या खोलींतून बाहेर पडून आपल्या जागेकडे जातांना त्याला अनेक टेबलांपुढून जावें लागलें, तिथले कांहीं कारकून आपल्याकडे टवकारून पाहात आहेत आणि बाकीचे मिष्किलपणें हंसत आहेत असा त्याला भास झाला.

तो त्या सर्वांच्याकडे दुर्लक्ष करून, पण मनांतल्या मनांत त्या सर्वांवर संतापत आपल्या जागेवर जाऊन बसला. त्यानें खुर्ची गांठली आणि त्याबरोबरच पांढरपेशा कारकून जातींतील सात्विक संतापाचा उच्चांक गांठला.

त्यानें शेजारच्या शेल्फवरील एक लठ्ठ लेजरबुक खसकन् ओढून काढलें आणि भराभर त्यांतील पानें उलटलीं. सगळीं पानें उलटून झाल्यावर त्यानें शेवटाकडून पुन्हां एकेक पान उलटण्यास सुरवात केली. त्याला हवें असलेल्या गिऱ्हाइकाचें खातें आजच त्या लेजर-बुकांतून कुठें पळालें होतें कुणास ठाऊक! अखेर कंटाळून त्यानें त्या लेजरबुकाचें कव्हर फटकन् मिटलें, तों त्यावर गेल्या वर्षाचा आकडा हंसत होता!

जगन्नाथची त्यावेळीं जी स्थिति झाली ती त्याची त्यालाच नीटशी कळली नाहीं. तो स्वतःवर खूप चिडला; पण करतो काय बिचारा? तें लेजरबुक जागच्या जागीं ठेवून चालू वर्षाचें हातीं घेणें त्याला प्राप्त होतें.

पण अशा प्रक्षुब्ध मनस्थितींत असतांना पांचपांच आंकडीं रकमांच्या बेरजा कुणाला बरोबर करतां आल्या आहेत? त्यांत पुन्हां पयांना बारानें आणि आण्यांना सोळानें भागण्याचें अवधान ठेवितां ठेवतांच हातचे म्हणून आलेल्या आंकड्याची मर्जी सांभाळायची असते.

एकंदरींत तितकेंसें सोपें काम नसतें तें. निदान जगन्नाथच्या बेरजा आज चुकूं लागल्या आणि त्या जसजशा चुकत गेल्या तसतसा त्याचा मनःक्षोभहि वाढत गेला. तो इतका वाढला, कीं शेजारचे सारे टाइपरायटर्स हे आपल्या कानांना कटकट करण्यासाठीं चालूं आहेत असें त्याला वाटूं लागलें.

अखेर एकदाचे अडीच वाजले आणि जगन्नाथ ऑफिसांतून बाहेर पडला. त्या बंदिस्त वातावरणांतून बाहेर पडल्यानंतर तर त्याचे विचार अधिकच स्वैर धावूं लागले आणि सोसाट्याच्या वाऱ्यानें वणवा जास्तच भडकावा तसें त्याचें पेटलेलें मन अधिकच भडकलें.

'घरीं इतक्यांत जायचं नाहीं' असें ठरवून तो ॲपोलो बंदराकडे वेड्यासारखा निघाला. वाटेंत त्याचें लक्ष 'रीगल' च्या भिंतीवरील प्रचंड जाहिरातीकडे खेचलें गेलें.

आजपासून सुरू असलेल्या टॉकींतील एक प्रसंग त्या भव्य चित्रांत दाखविलेला होता. हुबेहूब मंदाकिनीसारखी दिसणारी नायिका दोन बोटांनीं ओठांत सिगरेट धरून उभी होती आणि नायक आपला पेट्रोल-लाइटर तिच्या सिगरेटला लावत होता.

वास्तविक त्या चित्राचा जगन्नाथच्या जीविताशीं कांहींएक संबंध नव्हता. किंवा आपणहि मंदाची सिगरेट अशीच पेटवून देऊं अशी आकांक्षाहि त्यानें कधीं बाळगली नव्हती. पण त्या जाहिराती-कडे पाहून त्याचा उद्वेग वाढला यांत शंका नाहीं.

तरी त्यांतल्या त्यांत त्याला थोडें समाधान झालें. प्रत्यक्ष मंदाला घेऊन यायच्या आधीं आपण ही जाहिरात पाहिली हें एका दृष्टीनें ठीकच झालें असें त्याला वाटलें.

ऑफिसमधून बाहेर पडतांनाच त्यानें घरीं लवकर न जाण्याचा विचार केला होता आणि आतां तर सकाळीं ठरलेला सिनेमाचा कार्यक्रम पार पाडतां येणें शक्यच नव्हतें.

तो उदास आणि उद्विग्न मनानें ॲपोलो बंदरावर तसाच किती वेळ तरी बसून राहिला.

दुपारच्या बैठकींत मंदाकिनीनें आपला सकाळचा पराक्रम अभि-मानानें पण जरा भीतभीतच आपल्या उपदेशिकांना म्हणजे घरबसल्या साऱ्या जगाच्या संसाराची काळजी वाहणाऱ्या शेजारच्या यमुनाकाकू, रमामावशी आणि मंडळींना निवेदन केला.

' भीतभीतच ' म्हणायचें कारण असें, कीं यमुनाकाकू वगैरेंच्या सांगण्यावरून जरी मंदाकिनीनें सकाळीं रागाचा विलक्षण आव आणला होता तरी कधीं न पाहिलेला पतीचा राग पाहून कोणती पत्नी घाबरणार नाहीं ? साहजिकपणें मंदाकिनीला कसेंसेंच वाटत होतें. आणि ऐन वेळीं गांगरलेल्या आपल्या पक्षकाराला कोणता वकील धीर देणार नाहीं ? अशा अडचणीच्या वेळीं मंदाकिनीला खराखोटा धीर देणेंच यमुनाकाकूंच्या मोठेपणाला भूषणास्पद होतें.

त्या म्हणाल्या, " अहो, एवढयानं काय घेऊन बसलांत ? हा रागाचा पारा एखाददुसरा दिवस टिकला तरी दाद देऊं नका तुम्ही ! बाकी आमच्याकडे कांहीं इतका त्रास पडला नव्हता म्हणा ... "

त्यांच्या अनुभवीपणामुळें मंदाकिनी त्यांचें ऐकायला तयार झाली होती. पण आतां आपल्या अनुभवाचें पुराण त्यांनी तिला पुन्हां सांगण्याची आवश्यकता नव्हती; आणि शक्यताहि नव्हती. कारण ती शनिवारची दुपार होती आणि सगळ्याजणींचीं 'इकडचीं माणसें' आज लवकर घरीं येणार होतीं.

मंदाकिनी उठली आणि घरीं जाऊन जगन्नाथची वाट पहात बसली.

तिच्या मनांत दोन परस्परविरोधी भावनांचा पाठशिवणीचा खेळ चालू होता.

जगन्नाथची क्षमा मागून चटकन् मोकळें व्हावें कीं त्यानें सिगरेट सोडीपर्यंत आपणहि रागाचा आणलेला अभिनिवेश सोडूं नये हें निश्चित करणें तिला कठिण जात होतें. पण यमुनाकाकूंच्या अनुभवी बोलांनीच तिच्या मनाचा त्या वेळीं अधिक ताबा घेतला होता. आणि जगन्नाथ ठरल्याप्रमाणें लवकर आला नाहीं; इतकेंच नव्हे, तर दिवेलागणी झाली तरी तो आला नाहीं यावरून त्याचा राग कायम असला पाहिजे, किंबहुना वाढला असला पाहिजे हें तिच्या लक्षांत आलें. तिनेंहि आपल्या मनाची तयारी अधिक जोरानें चालविली.

दिवेलागणी होऊन बराच वेळ झाला होता. फिरायला आलेले सारे लोक परतले होते. अखेर जगन्नाथहि तिथून उठला. 'रीगल' च्या जाहिरातीकडे प्रयत्नपूर्वक दुर्लक्ष करीत तो थेट म्यूझियमजवळ आला आणि त्यानें ट्रॅम गांठली.

संध्याकाळचा शो नुकताच सुटला असल्यानें ट्रॅममध्यें बरीच गर्दी होती. खालच्या सर्व जागा भरल्या असल्यामुळें त्याला वर जाणें भाग होतें. आणि वर बसण्याचाच त्याचा परिपाठ असे; कारण खालीं धूम्रपानाला बंदी होती.

आज त्यानें घरांतून बाहेर पडल्यापासून धूम्रपान केलें नव्हतें आणि आतांहि तो करणार नव्हता. परंतु वर जातांच त्याचें लक्ष खिडकीवरील एका जाहिरातीकडे गेलें.

" Smoking now permitted
Enjoy your Honeydew ! "

त्या जाहिरातीच्या योजकतेचें जगन्नाथाला कमालीचें कौतुक वाटलें. आतां त्याच्यानें राहावेचना. दिवसभर मोठ्या प्रयासानें आवरून धरलेली धूम्रपानाची त्याची लहर उसळीसरशीं वर आली. आपल्या खिशांतील ' केस ' त्यानें बाहेर काढली. उघडून पाहातो तों त्यांत उरलेल्या दोनचार सिगरेट्स्चे तुकडेतुकडे करून ठेवण्यांत आले होते !

अर्थात् मंदाचेंच काम असलें पाहिजे हें ! आतां मात्र त्याला मंदाची विलक्षण चीड आली ! एका क्षुल्लक धूम्रपानाच्या व्यसनामुळें आपल्याला कवडीमोल समजणारी मंदा कोण शहाणी !

पत्नीकडून अवमानित झालेलें असलें जिणें मात्र त्याला कवडीमोलाचें वाटूं लागलें.

ट्रॅममधून उतरल्याबरोबर त्यानें कोपऱ्यावरच्या इराण्याकडून ' गोल्ड फ्लेक ' चें पन्नासाचें टिन घेतलें आणि कधीं न ओढलेले ' प्लॅटर्स ' चे कांहीं चिरूटसुद्धां घेतले.

घरीं आल्यावर तो आपल्या निजण्याच्या खोलींत गेला. जातांना " मला जेवायचं नाहीं " असे मोजके शब्द मंदेच्या कानावर फेंकण्यास तो विसरला नाहीं.

मंदाकिनीनेंहि " कां ? " म्हणून विचारलें नाहीं किंवा त्याला जेवणाचा आग्रह केला नाहीं.

एवढें मात्र खरें, कीं तीहि मग जेवली नाहीं. आपल्या मनाच्या जरा विरुद्धच असें एवढें प्रचंड नाटक ती वठवीत असल्यामुळें तिच्या साऱ्या कोमल मनोवृत्तींवर कांहीं कमी ताण पडला नव्हता. तशा स्थितींत तिला जेवण सुचणें शक्य नव्हतें.

वैतागून जाऊन जगन्नाथनें एकामागोमाग एक सिगारेट ओढण्याचा सपाटा चालवला. प्रत्येक झुरक्याबरोबर त्याच्या घशाला धुराचा उबारा लागत होता आणि तंबाखूच्या धुराचा प्रत्येक कण घशाला आंतून झोंबल्यासारखा होत होता. त्यांत त्याला एक प्रकारचें अपूर्व सुख वाटत होतें. त्यानें टिनमधल्या शक्य तितक्या सिगरेट्स् खलास केल्या. जणूं त्याचें उत्तेजित मन त्यामुळें शांत होणार होतें.

जरा वेळानें त्यानें एक चिरूट काढला आणि त्याचें एक टोक दातांनी कुरतडून तोडलें. त्यानें अजूनपर्यंत जरी कधींच चिरूट ओढला नव्हता तरी कित्येकांना तसा ओढतांना त्यानें पाहिलें होतें.

पहिल्याच मोठ्या झुरक्याबरोबर त्याच्या डोक्यांत कसल्या तरी झिणझिण्या आल्यासारखें त्याला वाटलें. आणि मग त्याला वाटलें,

छे, त्याला कांहींच वाटूं शकलें नाहीं. कारण त्याला एक प्रकारची ग्लानि आली होती.

बऱ्याच वेळानें तो जागा झाला तेव्हां आदल्या दिवशीं व संध्याकाळीं घडलेल्या साऱ्या प्रसंगांची स्मृति प्रथम अस्पष्ट आणि मग सुसंबद्ध स्वरूपांत त्याच्यापुढें उभी राहिली. ' उगीच मंदाला चिडविली आपण ' असें त्याला वाटलें कीं काय न कळे.

तो सहज कुशीवरून वळला त्या क्षणीं त्याला जें दृश्य दिसलें तें विलक्षण होतें.

कोपऱ्यांतल्या टेबलाजवळच्या खुर्चीवर मंदा बसली होती. टेबलावर विजेचा लहानसा टेबल-लॅंप होता त्याच्या मंद प्रकाशाचा झोत मंदाच्या मुखावर आणि एकंदर शरीराच्या ऊर्ध्वभागावर पडला होता. खोलींत इतरत्र अंधार होता त्यामुळें मंदाच्या चेहऱ्यावर पडलेला प्रकाश प्रखर भासत होता. त्या प्रकाशांत तिच्या लावण्याला एक प्रकारचा कृत्रिमपणा आलेला दिसत होता. त्या वेळीं तिनें नेसलेलें पातळहि जरा भडक रंगाचें होतें आणि मूळचे लालसर आणि नाजुक दिसणारे तिचे ओठ तर या वेळीं लिप्-स्टिक् लावल्या-सारखे दिसत होते.

आणि या सगळ्या गोष्टींवर मात करण्याकरितांच कीं काय, तिनें आपल्या तोंडाजवळ नेलेल्या हातांतील दोन बोटांत एक पांढरी सिगरेट धरलेली दिसत होती !

मंदाकिनीला त्या स्थितींत पाहतांच जगन्नाथला कसेंसेंच वाटलें. त्याला त्या दृश्याची शिसारीच आली !

कारण रात्रीं ट्रॅममधून येतांना त्यानें असेंच एक दृश्य पाहिलें होतें. त्या वेळीं तो दादरला घरीं यायला निघाला होता खरा; पण आपल्याच नादांत असल्यामुळें पांच नंबरची ट्रॅम गांठण्याऐवजीं लांबच्या रस्त्यानें गिरगांवांतून जाणाऱ्या सहा नंबरमध्येंच तो चुकून शिरला होता आणि धूम्रपानाच्या संवयीमुळें वरच्या मजल्यावर जाऊन बसला होता. गिरगांवानंतर एकदोन कोपरे ओलांडल्यावर ट्रॅम एका स्टॅंडवर थांबली असतांना त्याला खिडकींतून शेजारच्या चाळींतील एक अतिप्रकाशित खिडकी दिसली. तेथें एक स्त्री नट्टा-पट्टा करून खिडकींत बसली होती. आसपासच्या वस्तींत तशा कैक स्त्रिया होत्या. त्या स्त्रीनें एक अद्यावत् प्रसाधनविशेष म्हणून कीं काय, एक जळती सिगरेट बोटांत धरली होती आणि येणारी-

जाणारी प्रत्येक ट्रॅम त्या ठिकाणीं थांबली कीं ती स्त्री धूम्रपान करीत असल्याचा अभिनय करीत होती.

तें दृश्य पाहून जगन्नाथनें आपली मान दुसरीकडे फिरविली होती.

आतांहि मंदाकिनीकडे पाहून त्याला त्या दृश्याची आठवण झाली, आणि " मंदा, काय हें ? " असें म्हणून तो फिरून दुसऱ्या कुशीवर वळला.

त्या क्षणीं मंदाकिनीची बांधून घेतलेली शिदोरी संपुष्टांत आली.

मंदाकिनी झट्कन् ऊठून पुढें आली आणि कॉटच्या कडेवर बसून त्याच्या गालांवर आपले दोन्ही पंजे टेकून त्याचें तोंड आपल्याकडे फिरवूं लागली. त्याचीं कानशिलें तिच्या हाताच्या तळव्यांना किती गरम लागलीं ! ' उगीचच आपण ह्यांना एवढ्या यातना दिल्या ' असें तिच्या मनांत येऊन गेलें.

" शी: ! टाकून दे ती सिगरेट ! " एवढें म्हणून त्यानें कपाळाला आठ्या घातल्या.

" कुठली सिगरेट ? " ती म्हणाली.

" हातांत काय होतं तुझ्या ? "

" इश्श, तें होय ? " असें म्हणत ती उठली आणि तक्तपोशीचा मोठा दिवा तिनें लाविला.

त्याबरोबर खोलींत जो प्रकाश फांकला त्यांत जगन्नाथला दिसून आलें, कीं मंदाच्या हातांत असलेली वस्तु म्हणजे सिगरेट नसून लहान मुलें खातात तसली ' मिल्क–कॅरमेल ' ची कांडी होती !

ती पाहून त्याला पूर्वीचा एक गोड पोरकटपणा आठवला.

कशावरूनसें तो मंदाला प्रेमांत म्हणाला होता, " लहान कां आहेस तूं ? "

" चॉकोलेट आणून दिलंत तर तेंहि कबूल करीन. " असें ती म्हणाली होती.

त्यावर त्यानें खरोखरच संध्याकाळीं येतांना चॉकोलेट्स् आणि कॅरमेल्स आणलीं होतीं.

आणि " लहानच नाहीं कां मी तुमच्याहून ? " असा पोरकट कबुलीजबाब देत मंदाकिनीदेखील त्या वेळी मनापासून हंसली होती.

तो प्रसंग आठवल्यामुळें जगन्नाथच्या वृत्तींत एकाएकीं कसला तरी पालट झाला आणि तो म्हणाला,

" मंदा, चुकलं माझं, मी एक ओढतों सिगरेटम् तेवढं पुरे आहे. तुला नको आणखी ती संवय ! खरं म्हणजे मीदेखील सोडून देणार आहे आतां. "

" छे छे, मी कुठं तसं म्हणतेंय् तुमच्याबद्दल ? " त्याला आडवीत मंदाकिनी म्हणाली, " माझं म्हणणं इतकंच, कीं माझ्या संगतींत असतांना ओढूं नका म्हणजे झालं. मला नाहीं वास सहन होत त्या धुराचा त्याला मी तरी काय करूं ? "

कॉटवर उठून बसत आर्जवाच्या स्वरांत जगन्नाथ म्हणाला—

" मी व्यसनाच्या इतक्या आहारीं गेलों म्हणून द्वेष तर नाहीं ना करत तूं माझा, मंदा ? "

पापण्यांच्या कडा ओलसर झालेल्या असूनदेखील हंसत हंसत मंदा म्हणाली, " इश्श ! सिगरेटची संवय ती काय ? अन् तेवढ्या-वरनं माणसाचा बाकी सगळा चांगुलपणा मातीमोल ठरवणारी मला तुम्ही शेजारची यमुनाकाकू समजलांत कीं काय तरी ? "

आणि असें म्हणून तिनें आपले केंस दोन्ही कानांमागून घेऊन ताणून धरले आणि डोळे बारीक करून यमुनाकाकूंची नक्कल केली.

जगन्नाथला एकदम हसूं कोसळलें. आपल्या हातांनी तिच्या केंसांच्या सैल फुगवट्या पूर्ववत् तिच्या कानांवरून सारख्या करून घेत हंसत हंसत त्यानें विचारलें, " मग माझ्या ' केस 'मधें सिगरेट्स्चे तुकडे कुणीं करून ठेवले होते ? "

वाचनालय

ती उठली आणि त्याच्या कोटाच्या खिशांतील सिगारेट-केस काढून पाहात म्हणाली, " इश्श, मीं नाही हं ! ऑफिसमधें थट्टा केलेली दिसतेय् कुणींतरी ! "

एवढेंच म्हणून ती थांबली नाहीं. तिनें त्याच्या उशालगतच्या टिनमधली एक सिगरेट काढली आणि ती त्याच्या ओठांत त्याला धरायला लावली. मग एक काडी ओढून त्या सिगरेटच्या दुसऱ्या टोकाशीं नेत खेळकरपणें " हं– " एवढेंच ती म्हणाली. आणि ' चालू द्या आतां ! ' अशा अर्थानें तिनें मानेची हालचाल केली.

पण त्याला काय वाटलें कुणास ठाऊक, त्यानें एकहि झुरका घेतला नाहीं !

उलट तोंडांतील सिगरेट हातांनी दूर करीत आणि मंदाला जवळ घेत तो तितक्याच खेळकरपणें म्हणाला,

" थँक यू ! पण आतां नको मला ! त्रास होईल तुला उगीच! "

—' स्त्री '

# शरद्चें मासिक

शरद् जोशीला कुणी पाहिलें तर 'आहे झालं एक लुकडं पोर!' म्हणून माना वेळतात. तसें पाहिलें तर तो अगदीं हुशार आहे. पण बळी तो कान पिळी ना? जो येईल तो आपला बिचाऱ्याला त्रास देतो. मला तर अगदीं कींव येते त्याची! परवां असेंच एकदां—

शरद्नें वर्गाचें एक मासिक काढायचें ठरविलें. आणि त्याप्रमाणें कागद वगैरे आणून तो कामाला लागला. सकाळीं उठल्यापासून शाळेंत जाईपर्यंत आणि संध्याकाळीं शाळेंतून परत आल्यावर रात्रीं निजेपर्यंत तो सारखा खपत असे. दहा बारा दिवसांत त्यानें पहिला अंक तर सुंदर तयार केला.

मुखपृष्ठावर रंगीत चित्र होतें. त्यांतल्या डोंगरांच्या मागून उगवता सूर्य डोकावून पाहात होता आणि डोंगरांतूनच एक ओढा वाहत आलेला होता. सर्वांत पुढें एक आगगाडी दाखविलेली होती. तिचे रूळ दूरवरच्या डोंगरांना वळसा घालून अदृश्य झाले होते. शिवाय कांहीं झाडेंझुडपें, आणि दूर उडून चाललेले चाराच्या

आंकडयासारखे दिसणारे पक्षीमुद्धां त्यानें त्या चित्रांत दाखविले होते. खरोखर तें चित्र फारच सुंदर साधलें होतें.– नुसतें मुखपृष्ठ तयार करायला शरद्‌ला दोन दिवस लागले होते.

अंक तयार झाल्यावर तो वर्गशिक्षकांना दाखवायला म्हणून त्यानें वर्गांत आणला. त्यांचा तास होता शेवटचा.

पहिल्या तासाला काटे मास्तर भूगोल शिकवत होते. शरद्‌ला धीर निघेना, तो एकसारखा आपली वही उघडून आंतला मासिकाचा पहिला अंक पाहात होता. जरा वेळानें शेजारच्या छबू चव्हाणलाहि तो अंक दिसला.

‘ बघूं दे रे, बघूं दे मला ! ’ चव्हाणनें जवळजवळ आज्ञाच केली. कारण तो स्वत: लठ्ठ आणि दांडगा होता.

‘ आतां नको रे. आधीं साने सरना दाखवणार आहे मी, नि मग तुम्हाला सगळ्यांनाच वाचायला देणार आहे ना. ’

‘ मग बीग कांहीं नाहीं; आत्तां– आधीं दे ! ’ चव्हाणनें डोळे वटारले.

‘ मग बाकीचीं मुलंसुद्धां... ’ शरद् काकुळतीनें बोलूं लागला.

‘ देतोस कीं नाहीं तू ? ’ चव्हाणनें शरदच्या पाठींत एक गुद्दा लगावून अंक हिसकावून घेतला. शरद्‌च्या पाठीपासून छातीपर्यंत कळ पोंचली. कांहीं वेळ त्याला बोलतांच येईना.

‘ तूं रे ! उभा राहा– नांव काय तुझं ? लक्ष कुठं आहे ? ’ म्हातारे काटे मास्तर, चष्म्याची फ्रेम आणि स्वत:च्या भुवया यांच्यामधून पाहात गरजले. त्यांच्या हातांतल्या छडीचें टोक शरद्-कडे रोखलेलें होतें.

भूगोलांतल्या प्रश्नाचें उत्तर द्यायची पाळी आपल्यापर्यंत आली; पण आपल्याला प्रश्नच माहित नाहीं, हें शरद्‌च्या लक्षांत आलें. तो नुसताच उभा राहिला.

‘ नांव काय तुझं ? ’ मास्तरांच्या स्वरांत प्रगति होती.

'जोशी.'

'मघाशीं प्रश्न विचारला तेव्हां लक्ष कुठं होतं तुझं ?'

शरद् मूकस्तंभासारखा उभा राहिला.

'जोश्या ! तुला विचारतोय मी.– लक्ष कुठं...'

'सर, ह्या चव्हाणनं मला गुद्दा मारून माझं मासिक ओढून घेतलं, सर; त्याला मीं कितीदां तरी सांगितलं, सर, कीं...'

'कसलं मासिक रे ?– इकडे आण पाहूं !' मास्तर जरी गंभीरपणानें बोलले तरी त्यांचा आवाज पहिल्यापेक्षां जरा उतरला होता. त्यामुळें शरद्‌ला थोडी आशा वाटली. नवीन आलेले काटे मास्तर पहिल्याच दिवशीं इतके रागावले म्हणून शरद् प्रथम अगदीं घाबरून गेला होता. पण आपल्या मासिकाच्या जोरावर आपण त्यांना आपलेसे करून घेऊं अशी उमेद त्याला वाटूं लागली.

चव्हाण उठला आणि त्यानें तो अंक टेबलावर नेऊन ठेवला. नेतांना तो शरद्‌नें पाहिला.

'सर, ह्यानं त्या चित्रावर शाईचा डाग पण पाडला–' शरद्‌नें कुरकूर केली.

'चाहाड्या करतोस का आणखी वर ?' पुन्हा सरनीं गर्जना केली. शरद्‌ची उमेद डळमळली. 'इकडे ये पाहूं असा !'

शरद् मास्तरांच्या जवळ गेला.

'हात पुढें कर पाहूं !'

शरद्‌नें हात पुढें केला.

तीन वेळां आवाज झाला. सापालासुद्धां लोक इतक्या निर्दयपणें मारत नसतील ! शरद्‌च्या नाजूक हातावर– पण हाताकडे नकोच पाहूं–त्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा एकाएकीं वाहूं लागल्या.

मास्तरांनीं व्याख्यान द्यायला सुरवात केली. 'अभ्यास नको करायला ! वर्गांत बसून गप्पा मारायला पाहिजेत, मासिकं काढायला पाहिजेत, नाहीं का ?'

आणखी एक आवाज झाला. शरद्‌नें तोंडावाटे एकहि शब्द काढला नाहीं. फार काय, त्यानें डोळ्याचें पातेंसुद्धां हालविलें नाहीं. डोळ्यांतलें पाणी मात्र त्याच्या गालांवरून अधिक वेगानें ओसरूं लागलें.

'वर्गांत नंबर कितवा आहे तुझा ?' मेघगर्जना आणि सिंह-गर्जना यांची तुलना करून जी श्रेष्ठ ठरेल तिचीच उपमा इथें द्यायला हवी.

मान खालीं घालून शरद्‌नें शक्य तितक्या हळूं आवाजांत उत्तर दिलें.

'पहिला.'

'मग पहिला असलास म्हणून चढून जाऊं नकोस कांहीं !'

नुकत्याच वाचलेल्या एका गोष्टीची शरद्‌ला आठवण झाली. त्या गोष्टींतला लांडगा कोंकराला म्हणाला होता—'तूं मला शिव्या दिल्या नसल्यास तर तुझ्या बापानं दिल्या असतील; तेव्हां मी तुला खाणार !'

मास्तर पुढें म्हणतात, 'असल्या इतर गोष्टींत लक्ष घालायला लागलास तर पहिला नंबर टिकायचा नाहीं, समजलास? चांगला आपला अभ्यास आपण करायचा तें सोडलं आणि—'

पुन्हां एक आवाज झाला.

— आणि केवढी कृपा कीं शाळेच्या घंटेनेंहि त्याच वेळीं आवाज करायला सुरवात केली.

'जा, जागेवर जाऊन बस जा !' असें म्हणून काटे मास्तर आपला जोडा करंकर वाजवीत वर्गांतून बाहेर गेले.

शेवटच्या तासाला वर्गशिक्षक साने आले आणि त्यांनी वर्गाचा हजेरीपट उघडला.

'जोशी !' त्यांनी शरद्‌चें नांव पुकारलें. पण नेहमींप्रमाणें उत्तर आलें नाहीं, म्हणून त्यांनी मान वर करून वर्गाकडे पाहिलें.

'तो आला होता, सर; पण त्याला ताप-' मी सांगूं लागलों; इतक्यांत—

कसलीशी सूचना घेऊन शिपाई वर्गांत आला. तो परत गेल्यावर साने मास्तरनीं बाकीच्या मुलांची हजेरी मांडली, तासभर शिकविलें आणि शाळा सुटली.

नंतर चव्हाणजवळ मीं अंक मागितला. त्याच्याजवळ तो नव्हता. घरीं शरद्कडेहि चौकशी केली. त्याच्याजवळहि मिळाला नाहीं. मग तो अंक होता कुठें ?– कुणास ठाऊक! पण त्यानंतर मला तो अंक कधींच पाहायला मिळाला नाहीं.

—'किर्लोस्कर'

# आशा

कान्तेला स्टेशनवर पाहून सदानंदाला आश्चर्य वाटलें. 'ही कशाला मुंबईला निघाली ?' असा प्रश्न त्याच्या मनांत येऊन गेला. त्यानें तो माझ्याजवळ बोलूनहि दाखवला. पण मीं त्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. माझा संबंध काय ? त्यानें जयंत व कांता या पतिपत्नींची माझ्याशीं पूर्वीं ओळख करून दिली होती इतकेंच.

ते झोन—तिकिटांचे दिवस असल्यामुळें कोण कोठें जाऊन येईल याचा नेम नव्हता. सदानंदानें आपल्या मनाची अशी कांहींतरी समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

पण तेवढ्यानें त्याचें मन गप्प बसेना. कारण कांता त्याला पूर्ण परिचित होती. आज कैक वर्षें ती त्याच्या डोळ्यासमोर वावरत होती.

तसें पाहिलें तर एकेकाळीं तोच तिच्याशीं लग्न करूं इच्छित होता. पण काय झालें कुणास ठाऊक ? बी. कॉम. होऊन व्यापार-धंद्यांत पडलेल्या जयंताशीं लग्न करायचें तिनें ठरविलें, आणि सदानंदाला आपली इच्छा प्रकट करण्याची संधि देखील न देतां एकदम त्याच्या हातांत आपल्या लग्नाची गुलाबी आमंत्रणपत्रिका

तिनें नेऊन दिली होती. आणि अर्थात् सदानंदाला कांतेचा स्नेह तेवढ्यावरच सोडून द्यावा लागला होता. ही गोष्ट देखील सदानंदानें मला पूर्वींच सांगितली होती.

कांता कांहीं फारशी रूपवती होती अशांतला भाग नाहीं. सदानंद तिच्या गुणांवर लुब्ध होता. तो म्हणे–' सगळ्या गोष्टी रूपावर थोड्याच अवलंबून असतात ? '

मात्र कित्येक गोष्टी केवळ रूपावरच अवलंबून असतात हेंहि खोटें नव्हे. हें खोटें असतें तर जयंताला वारंवार मुंबईला जाण्याची गरज पडली नसती. त्याचें व्यापारी काम त्याला जरी वरच्यावर मुंबईला खेंचून नेई, तरी एकेकदां तो गेला कीं त्याचा मुक्काम तेथें किती होईल याचा हिशेब नसे. कांतेनें पुण्याला खुशाल बसावें त्याची वाट पहात ! तो परत येईल तेव्हां खरा.

त्यामुळें सदानंदाला साहजिकच आश्चर्य वाटलें. ' आज कांता जयंताबरोबर कशी ? '

जास्त आश्चर्याचें कारण म्हणजे गाडी सुटायला बराच अवकाश असून तीं दोघेहि डब्यांत जागेवर बसलेली; आणि कांतेचा उजवा हात जयंताच्या खांद्यावरून डब्यांत खिडकीच्या कडेवर सोडलेला. खिडकीजवळच्या एका लोखंडी पट्टीशीं तिच्या बोटांचा उगीच कांहींतरी चाळा चाललेला होता.

मी व सदानंद शेजारच्या डब्यापाशीं उभे होतों आणि त्यांच्या हालचाली आमच्या डोळ्यासमोरच होत होत्या. लवकरच जयंतानें आपल्या मनगटावरील घड्याळ पाहण्याच्या निमित्तानें आपल्या शरीराची थोडी हालचाल केली. ती सुलभ व्हावी म्हणून कांतेनें आपला हात किंचित् मागें घेतल्यासारखा केला. तेवढी संधि साधून, कंटाळा आल्याप्रमाणें चेहरा करून जयंत बांकावरून उठला. कांताहि उठली आणि त्याच्या मागोमाग डब्यांतून प्लॅट-फॉर्मवर उतरली.

त्यांचें बोलणें चाललें होतें तें बहुतेक एकांगी होतें. कारण कांताच दरवेळीं कांहींतरी नवा विषय काढून बोलण्याचा प्रयत्न करी. आणि जयंत प्रत्येक वेळीं एकादा हस्तविक्षेप करून तुटक उत्तर दिल्यासारखें करी. आणि दरवेळीं कांतेचा हिरमोड होई. पण जरा थांबून ती पुन्हां नव्या उल्हासानें कांहीं तरी नवें बोलणें काढी...

जरा वेळानें तिनें प्लॅटफॉर्मच्या टोकाकडे हात दाखविला. एखादा फेरफटका मारून यावा असेंच तिला सांगायचें होतें.

मग तीं दोघें त्या दिशेनें चालूं लागलीं. पण जयंत मुळींच राजी नव्हता असें दिसलें. तो रेंगाळत आणि आपल्या पायांतील स्लिपरचा फरफटत आवाज काढत कसाबसा तिच्या मागोमाग चालला होता. त्यामुळें तिला तेवढ्यांतल्या तेवढ्यांत कितीदां तरी उगीचच थबकावें लागत होतें.

प्लॅटफॉर्मवरील एका फेरफटक्याला साधारणतः जेवढा वेळ लागतो त्यापेक्षां कितीतरी थोड्या वेळांत तीं दोघें परत देखील आलीं. ‘ तिकडे गेलों नसतों आपण, तरच बरं झालं असतं, ’ अशा विचारांचें प्रतिबिंब दर्शविणारा भाव कांतेच्या चेहऱ्यावर उमटला होता तो ती जेव्हां थोडी जवळ आली तेव्हां आम्हांला दिसला.

ती आणखी जरा जवळ येतांच सदानंद किंचित् हंसला आणि म्हणाला,

“ काय, मुंबईला निघाला वाटतं ? ”

“ छे, पोंचवायला आलें, ” असें म्हणून तिनें जयंताकडे मानेनें निर्देश केला, आणि तीं दोघें पुढें चालूं लागलीं.

पूर्वस्थळीं येऊन थांबतांच तिनें केविलवाण्या स्वरानें जयंताला कांहींसें विचारलें.

जयंतानें खिशांतलें पैशाचें पाकीट एकदां बाहेर काढून उघडलें न उघडलेंसें केलें, परत बंद करून तें आपल्या हातांतल्या हातांत

झेलल्यासारखें केलें, आणि तें जसेंच्या तसें खिशांत टाकीत त्यानें आपले ओंठ चिंचोळे करून किंचित् पुढें केले आणि मान हालवली.

"सध्यां नाहींत माझ्याजवळ–" असेंच उत्तर त्याला तिला द्यावयाचें होतें.

मग विषय बदलण्याकरितांच कीं काय, कांतेनें कुठल्याशा गाडीच्या येण्याजाण्याच्या वेळांचा प्रश्न उपस्थित केला. त्या ठिकाणींहि त्यांचा मतभेद झाला. त्याची समजूत पटविण्याच्या हेतूनें तिनें समोरच्या भिंतीवरील मोठ्या टाइमटेबलकडे बोट दाखवलें.

"हवं तर–" ती म्हणूं लागली.

तिला पुरी बोलूं न देतां, आपल्या हातांतील ऐटबाज छडी भिंतीकडे रोखून तो बेफिकीरपणें म्हणाला,

"पाहून ये जा तूच!"

तिचा चेहरा एकदम हिरमुसल्यासारखा झाला. तो जयंतापासून तात्पुरता लपवण्यासाठीं ती खरोखरच एकटी टाइमटेबल पाहायला गेली.

तेवढ्यांत, ठराविक खाकी पोषाख केलेला माणूस खाद्यपेयांची गाडी ढकलीत जयंतासमोरून जाऊं लागला.

जयंतानें त्याला थांबविलें आणि दोन संत्रीं विकत घेतलीं.

कांता परत आल्यावर त्यानें तिला त्यांतलें एक दिलें.

तिनें तें सहज बोलतां बोलतां फोडलें आणि त्यांतल्या फोडी ती त्याला देऊं लागली.

"घे कीं तू; मला नको–" असें म्हणत त्यानें हातांतलें संत्र तिला दाखवलें.

त्या फोडींच्याकडे एकदां दृष्टि टाकून त्यांतली एकच तिनें कशीबशी तोंडाला लावली; आणि बाकीचें संत्र तसेंच हातांत राहूं देऊन तिनें बोलणें पुन्हां चालू केलें.

त्याचींहि एकेक शब्दाचीं तुटक उत्तरें पुन्हां चालू झालीं.

कांहीं वेळानें त्याच्या बोटांतील नव्या अंगठीकडे पाहून तिनें त्याचा हात आपल्या हातांत घेतला, आणि मग आपली दीनवाणी अनन्य नजर त्याच्या चेहऱ्यावर लावली.

ती प्रीतीची खूण—

जयंतावर मोठा पेंचप्रसंगच येऊन ठेपला !

उद्यां प्रेमाची भेट म्हणून देण्यासाठींच त्यानें ती सुरेख अंगठी नुकतीच तयार करवून आणली होती ! ती आज इथें देऊन टाकायची ? ...

इतक्यांत कांतेची कोणीतरी मैत्रीण प्लॅटफॉर्मवर उपस्थित झाली, आणि तिच्याशीं निदान औपचारिक तरी बोलण्यांत कांतेनें जयंताला केलेला प्रश्न जरा मागें राहिला.

' सुटलों बुवा ! ' अशा अर्थाचा चेहरा जयंतानें केला. कांतेच्या त्या मैत्रिणीचे मनांतल्या मनांत आभार मानण्यापुरेसा वेळ त्याला जेमतेम मिळाला—

कारण, मग गार्डच्या आणि एंजिनच्या शिटीच्या गोंगाटांत आणि उतारूंच्या धांवपळींत तो. कसाबसा डब्यांत शिरून जागेवर जाऊन बसला, आणि गाडी चालू झाली...

खिडकींतून बाहेरहि तिच्याकडे न पाहणाऱ्या जयंतासाठीं आपला पांढरा हातरुमाल उंच हातानें हलविणाऱ्या कांतेचा श्यामलवर्ण चेहरा सदानंदाला जरा कष्टी आणि अंतर्मुख झाल्यासारखा दिसला. अस्निग्धपणामुळें किंचित् फुगीर वाटणारे तिचे केंस तिला शोभून दिसत नव्हते असें नाहीं. तिचें पातळ देखील तिला वाईट दिसत नव्हतें कांहीं.

' रूप अन् गुण यांपैकीं एकेकावर जगांतल्या कोणकोणत्या गोष्टी अवलंबून असतात कुणास ठाऊक ! ' असें कांहींसें सदानंद आपल्याशींच पुटपुटला.

तिकिटें देऊन प्लॅटफॉर्मच्या बाहेर पडतांना आमची आणि कांतेची फिरून गांठ पडली. सदानंदानें फिरून विचारलें. " एकूण जयंतराव गेले मुंबईला, अन् तुम्ही पोंचवायला आला होता का त्यांना ?"

ती म्हणाली,

" अलिकडे बरेच दिवसांत ते आले नव्हते इकडे. अन् आतां पुन्हां कधीं येतील तें नक्की नाहीं म्हणून म्हटलं जावं या खेपेला निरोप द्यायला स्टेशनवर."

सायकल–स्टॅंडकडे वळत सदानंद म्हणाला, " म्हणजे, अजून आशा आहे वाटतं ?"

टांग्यांत बसत बसत कांतेनें उत्तर दिलें—

" नसायला काय झालं ?– ठेवली म्हणजे राहते !"

तिचा टांगा चालू झाला आणि सदानंदानें मला विचारलें, " कायरे, ह्या जोडप्याला ओळखतोस कां ?"

मीं म्हटलें, " हो; तूंच तर मागें ओळख करून दिली होतीस. शिवाय अलिकडे लोकांत पुष्कळ ऐकलंय् मीं ह्यांच्याबद्दल– "

" काय ऐकलं आहेस ?"

" मुंबईच्या कुठल्याशा छचोर पोरीच्या पाशांत जयंत सांपडला आहे. ती त्याच्या आयुष्यांत प्रवेश करूं पाहते आहे–नव्हे प्रवेश तर तिनं केव्हांच केला आहे; पण आतां तर ती कांतेपेक्षांहि मानाचं स्थान पटकावयाला बघते आहे. आणखी त्या दोघींना एकमेकीं-पासून योग्य अंतरावर– तूर्त ११९ मैल ठेवण्यांत जयंताची सारी हुषारी अन् त्याच अक्कलहुषारीवर मिळवलेला पैसा खर्च होत आहे..."

" ठीक, ऐकलंस तें फारसं चूक नाहीं तर."

" अन् त्या पोरीचं नांव ' आशा '–"

" इथं मात्र सपशेल घसरलास!– कशावरून म्हणतोस तिचं नांव ' आशा ' असं ? "

" तुमच्या आत्तांच्या बोलण्यावरून. "

" तुला अर्थ समजला नाहीं आमच्या बोलण्याचा ! "

" म्हणजे ?— "

" अरे जयंताचं मन कांतेवरून उडालं आहे हें उघड आहे. पण तें आपण पुन्हां काबीज करूं अशी वेडी आशा अजून बिचारीच्या मनांत आहे.– तर त्या अर्थानं मीं तिला विचारलं, ' अजून आशा आहे वाटतं ?' अन् तिनं काय उत्तर दिलं तें तूं ऐकलंसच. ती खिन्नपणें हंसून म्हणाली, ' नसायला काय झालं ? ठेवली म्हणजे राहते !... "

—' प्रभात '
दिवाळी अंक, १९३९

# बुद्धि आणि भावना

बरेच दिवसांनी त्या दोघांची आज पुन्हां गांठ पडली होती. बोलायला जरी नवें कांहीं नव्हतें, तरी त्याच त्याच आठवणी उपस्थित करण्यांत दोघेंहि वेळेचें भान विसरलीं होतीं. केवळ पूर्वाश्रमींच्या आठवणींनीं दोघांनाहि वरचेवर उमाळे येत होते. अखेर नेहमींप्रमाणें ती त्याला काकुळतीनें म्हणाली,

'पण मीं तुला सांगितलं ना, कीं असा मला भेटायला येत जाऊं नकोस ?'

'पण मला राहवत नाहीं, त्याला मी तरी काय करूं ग ? मला हें कां कळत नाहीं, कीं माझ्या भेटीपासून तुला त्रास होतो ?'

'तसा त्रास नव्हे रे !' ती अधिकच काकुळतीच्या स्वरानें म्हणाली. 'तूं येऊन गेलास कीं दोनतीन दिवस तरी माझ्या मनावरची खिन्नपणाची छाया दूर होत नाहीं; असं वाटतं कीं नकोत त्या आठवणी ! मनाला जखम झाली खरी; पण अशा भेटीमुळं त्यावरची खपली मात्र तेवढ्यापुरती उकलते; अन् मग वेदना अगदीं असह्य होतात बघ.'

'जखम होतांना नाहीं वाटतं वेदना झाल्या?' विश्राम जरा तुटकपणानेंच म्हणाला आणि असें म्हणून तो खुर्चीवरून उठला आणि खिडकीशीं जाऊन उभा राहिला. त्याच्या कृतींत आणि तीं चारपांच पाउलें जलद टाकण्याच्या पद्धतींत दुःखाबरोबरच रागाचीहि एक प्रकारची छटा दिसून येत होती. सुनंदेच्या नजरेंतून ती छटा सुटली नाहीं. तिनें त्याला तसें बोलूनहि दाखविलें.

'पहा, पहा,' ती म्हणाली, 'नुसत्या आठवणींनीं किती राग आला तुला!'

'मग? मी पुरुष आहे,' तो म्हणाला, 'आठवणी काढून नुसतं मुळू मुळू रडत बसावं बायकांनीं!'

त्याच्या त्या कटु शब्दांतील हिणवण्याकडे दुर्लक्ष करून सुनंदा म्हणाली, 'तेंच तर मी पहिल्यापासून सांगत होतें. तुला जर एवढं वाटत होतं माझ्याबद्दल, तर बाबांच्याजवळ तस वेळींच प्रकट कां केलं नाहींस? आतां रागावून काय उपयोग? मी त्याच वेळीं म्हणत होतें त्याप्रमाणं आपलं प्रेम प्रकट करायचं धैर्य तुझ्या पुरुषमनाला झालं नाहीं, आणि आतां मुळु मुळु रडत बसतेस म्हणून मला म्हणतोस. विश्राम, एकेक गोष्ट कसकशा होत गेल्या तें सारं पुन्हां एकदां डोळयांपुढं आण, म्हणजे तुझं तुलाच उमगेल कीं—'

पण विश्रामचें लक्ष मात्र आतां सुनंदेच्या बोलण्याकडे नव्हतेसें दिसलें. तो खिडकींत उभा राहूनच शून्य दृष्टीनें बाहेर पहात होता.

गांवाबाहेरच्या त्या प्रायः निर्जन भागांत तो एकटाच बंगला आपल्या श्रीमंत मालकाप्रमाणेंच इतरांपासून दूर राहिलेला होता. सहसा कोणाशीं न मिसळणाऱ्या आणि कोणाचेंहि मन समजावून घेण्यास उत्सुक नसलेल्या आपल्या श्रीमंत मालकाच्या स्वभावाचें तो जणु प्रतीकच होता. सभोंवतालच्या निर्जन वातावरणाला अंधारानें अधिकच भेसूर स्वरूप दिलेलें होतें. बागेंतील कांहीं झाडांवर बंगल्यांतील उघडया खिडक्यांतून विद्युत्प्रकाशाचे लहानमोठे पट्टे

7712

उमटलेले होते. आणि त्यामुळें बाकीचीं झाडें आणि एकंदर देखावा अधिकच भयाण दिसत होता.

सुनंदेचें बोलणें चालूंच होतें. ती सांगत होती,—

'तूं म्हणत होतास तसं प्रेम कांहीं मला त्यावेळीं तुझ्याबद्दल वाटत नव्हतं. पण तूं मला आवडत नव्हतास असंहि नाहीं. आपल्या लहानपणापासूनच्या मैत्रीला आमच्या बाबांनीं उत्तेजन दिलं. अशा परिस्थितींत तुला वाटत होतं तें प्रेम तूं बाबांच्याजवळ उघड करायला हवं होतंस. तें तूं फक्त मला बोलून दाखवलंस. आणि मी तरी कशी?— तर जिला त्या वेळीं प्रेम म्हणजे काय चीज असते ह्याची नीटशी कल्पना नव्हती, —आणि जिचं नुकतंच वसंतरावांच्याशीं लग्न बाबांनीं ठरवलं होतं!'

'हं; पण मला तरी काय कल्पना कीं तुझं लग्न इतकं एकाएकीं ठरविण्यांत येईल म्हणून?' असें म्हणतांना विश्राम एकदम वळला, आणि खिडकीकडे पाठ करूत रेलून उभा राहिला. 'आणखी कांहीं दिवसांनंतर, योग्य वेळ आल्यावर, आपल्या भावना प्रकट करूं म्हणून मी मूक राहिलों. अशा स्थितींत एकदां सहज परगांवीं गेलों असतांना तिथं अकल्पितपणं तुझ्या लग्नाची आमंत्रणपत्रिका मला आली.'

'तशा स्थितींतहि तूं येऊन आपलं मन बाबांजवळ उघड केलं असतंस तर त्यांनी तें ठरलेलं लग्नसुद्धां मोडायला मागंपुढं पाहिलं नसतं. माझ्या हिताची तशीच काळजी होती त्यांना!' हें सांगतांना सुनंदेच्या मुखावर पित्याविषयींच्या अभिमानाचे भाव स्पष्टपणें उमटले. त्यामुळें त्या खिन्न वातावरणांत एक प्रकारच्या पवित्रतेची भर पडल्यासारखें विश्रामला वाटलें. त्याचे उद्गारहि मग तसेच मृदु स्वरांत आले.

'मीं तसं त्या वेळीं बाबांच्याजवळ बोलून दाखवणं चूक ठरलं असतं कदाचित्. कारण त्यांच्याहि लौकिकाचा प्रश्न त्यांत गुंतलेला

होता. बाबांनीं ठरवलेलं लग्न मी त्यांना मोडायला कसा लावूं? शिवाय तुझं माझ्यावर मी म्हणतों तसं प्रेम नव्हतं हें जितकं खरं तितकंच हेंहि खरं कीं तुला वसंतरावांच्याबद्दल तिटकारा असा मुळींच वाटत नव्हता. तुला ते नको होते असं थोडंच होतं? उलट त्यांच्यासारखा श्रीमंत पति मिळाल्याचं तुला एक प्रकारचं समाधानच वाटत होतं;—निदान असं मला तुझ्या त्या वेळच्या वृत्तीवरून दिसत होतं...'

'त्या वेळीं—आणि आज?' असें म्हणून सुनंदेनें एक दीर्घ निश्वास टाकला. जरा वेळ ती कांहींच बोलली नाहीं. नंतर आपल्या दुःखांना एकदम वाट देत ती म्हणाली,

'करायची आहे काय असली श्रीमंती?—प्रत्येक ठिकाणीं ढोंगीपणा आणि औपचारिकपणा दाखवावा लागतो! आज मला खऱ्या प्रेमाची किंमत कळायला लागली आहे, त्याची भूक लागली आहे, तर तें कांहीं मिळत नाहीं! सभासमारंभांतून मात्र मी ह्यांच्याबरोबर सदा हवी! नको ही जुलमी श्रीमंती असं होऊन गेलंय् मला!'

सुनंदेच्या डोळ्यांतून अश्रु येऊं लागले. हुंदके देत देत ती पुढें म्हणाली, 'त्यापेक्षां तुझ्यासारख्या गरिबाशी लग्न झालं असतं तर कोंड्याचा मांडा करून आनंदांत दिवस काढले असते!'

या ठिकाणीं ती एकदम थांबली. आपण त्याच्या गरिबीचा उल्लेख केला तो त्याला लागला तर नाहीं ना, अशी तिला शंका आली.

तिनें उशींत लपविलेलें तोंड वर करून त्याच्याकडे पाहिलें.

त्याचीं बुबुळें कांहींशीं निश्चल दिसत होतीं आणि त्याच्या पापण्या कांठोकांठ भरून आलेल्या होत्या.

'लागलं का रे तुला? चुकून बोललें हं मी.' ती आर्जवाच्या स्वरानें म्हणाली.

तिनें त्याच्याजवळ जाऊन त्याच्या खिशांतील हातरुमाल काढला, आणि त्याचे डोळे पुसले. मग त्याचे दोन्ही हात आपल्या हातांत घेत ती म्हणाली, ' राग का आला तुला ? अं ? '

त्याच वेळीं वाऱ्याची एक झुळुक आली; त्याबरोबर रातराणीचा सुगंध खोलींतील हवेंत पसरला.

' छे, वस्तुस्थितीचं वर्णन केलंस त्यांत राग कसला मानायचा ? दरिद्री माणसाला दरिद्री म्हटल्याबद्दल का राग येईल ?— उलट, हल्लीं गरिबी ही फॅशनच होऊं पहाते आहे ! ' असें म्हणून तो किंचित् हंसला. त्यानें आपले हात तिच्या हातांतून हलकेच सोडवून घेतले. ग्रीष्मऋतूंत वळवाच्या पावसानें धरणीला क्षणभर प्रसन्न वाटावें तसें तिला त्याच्या हंसण्यानें वाटलें. तिनें त्याला पुन्हां खुर्चीवर बसविलें, आणि ती म्हणाली,

' खरंच इतका वेळ आपण बोललों सवरलों; पण मीं आज तुझी कांहींच चौकशी केली नाहीं कीं ! – हं, सांग तर आतां – काय म्हणतो तुझा नवा धंदा ? '

' धंदा काय म्हणणार ? ' तो धंदेवाईक बेफिकीरीनें म्हणाला, ' आज डोंगराच्या शिखरावर तर उद्यां दरीच्या तळाशीं ! '

' म्हणजे ह्या दोनतीन महिन्यांत कांहीं प्रगति नाहीं कीं काय तरी ? ' तिच्या स्वरांत काळजीची आर्तता स्पष्ट प्रतीत होत होती.

' प्रगतीचा कुणीं नेम सांगावा ? — चालायचंच ! धंदा म्हटला म्हणजे असंच. '

' असं काय मोघम बोलतोस रे ? खरं सांग पाहूं आज काय वस्तुस्थिति आहे ती ? '

' खरं सांगायचं म्हणजे प्रवास चालू आहे दरीच्या तळाकडंच. ' त्याचा आवाज हळु आणि गंभीर आला.

ती लगेच तत्परतेनें म्हणाली, ' मग कांहीं मदत लागली तर मागत कां नाहींस माझ्याजवळ ? — माझ्याशीं असा संकोच कां ? '

असें म्हणून ती लगबगीनें आंत गेली, आणि त्याच्या मनांत यत्किंचित् राग ज़री उरला असला तरी त्यांचें परिमार्जन व्हावें म्हणून हातांत कांहींतरी घेऊन त्याला तें देण्यासाठीं लगेच बाहेर आली.

तो बसला होता, त्याच्या समोरच्या टेबलावर तिनें आपला हात रिकामा केला.

तें एक नोटांचें लठ्ठ पुडकें होतें.

पण काय चमत्कार ! –

मग मात्र त्याचा राग अनावर झाला ! आपल्या नुकत्याच झालेल्या शाब्दिक विटंबनेपेक्षां ह्या तिच्या कृतीनें आपला झालेला उपहास त्याला सहन झाला नाहीं असें दिसलें.

त्यानें तें नोटांचें पुडकें उचललें आणि खिडकीबाहेर भिरकावून दिलें ! ! तें बाहेरच्या एका झाडाला अडखळून पडलें तेव्हां पानांचा थोडा सळसळाट झाला तेवढाच. बाकी कांहीं वेळ सारें स्तब्ध होतें.

सुनंदा विश्रामकडे पाहातच राहिली ! अखेर विश्रामनें आपल्या संतापाला वाव दिला. ' आतां मात्र मी खरंच रागावलोंय् तुझ्यावर. जातों मी. अन् तुझ्या इच्छेप्रमाणं तुला पुन्हां कधीं भेटणार नाहीं ! '

' अरे, पण ऐकून तर घेशील– ' ती समजावणीच्या स्वरानें म्हणाली. दिङ्मूढ झालेली सुनंदा एवढेंच बोलूं शकली.

तिच्या शब्दाची क्षिति न ठेवतां विश्राम जिन्यावरून धाड्धाड् पाय वाजवीत उतरून गेला, आणि बाहेरच्या अंधारांत दिसेनासा झाला.

तेवढ्यांत सुनंदानें ' विश्राम ! विश्राम- ' अशा दोनतीन हांका मारल्या, पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं.

तिनें असहायपणें कोचावर अंग टाकलें, आणि ती हुंदके देऊं लागली.

रात्र कशी गेली तें सुनंदेला कळलें नाहीं. सकाळीं, उदासवाण्या मनानेंच तिनें वर्तमानपत्र उघडलें, तों तिला एका स्थानिक अपघाताची बातमी त्यांत प्रामुख्यानें आढळली—

'काल रात्रीं येथून जाणाऱ्या पंजाबमेलखालीं सांपडून एक तरुण मरण पावला. त्याची ओळख न पटण्याइतका त्याचा देह छिन्नभिन्न स्थितींत सांपडला. मात्र त्याच्या काळ्या कोटाच्या खिशांतील पैशाच्या पाकिटांतील कार्डा-वरून त्याचें नांव 'विश्राम' असल्याचें आढळून आलें. पोलीसतपास चालू आहे.'

ती बातमी वाचत असतां सुनंदेला आपल्या सर्व गात्रांतील शक्ति एकाएकीं नष्ट झाल्यासारखी वाटली, आणि तिच्या डोळ्यांपुढें अंधारी आली...

त्याच वेळीं गांवांतील एका हॉटेलांत विश्राम आणि त्याचा एक सोबती चहा घेत बसले होते. विश्राम सोबत्याला सांगत होता—

'नेमलेल्या ठिकाणीं तू उभा आहेस कीं नाहीं हें पाहण्यासाठीं मी मुद्दाम खिडकीशीं येऊन गेलों एकदां. चांगला उभा होतों ना खिडकींत किती वेळ! अन् नशीब तरी बघ किती दांडगं आपलं काल! नाहींतर तूं उचललेलं तें नोटाचं पुडकं मला विजारीच्या खिशांत ठेवायची कां बुद्धि व्हावी?– म्हणजे माझा कोट चोरीला गेला तरी कोटाच्या खिशातलं पाकिट जवळजवळ रिकामंच गेलं म्हणेनास! हं: हं: हं:– ए छोकरा, आणखी दोन सिंगल आण!– अन् हें बघ, 'गोल्ड फ्लेक' चं एक पाकिट पण आण!'

—'मनोहर'
दिवाळी अंक, १९३६

# धाकटा मेंदू

धाकटा मेंदू आज चिडला होता. आपण जरी लहान असलों तरी एकंदर मानवी शरीरांतलें आपलें महत्त्व नाकबूल करण्यापर्यंत मोठ्या मेंदूची मजल जावी हें त्याला सहन झालें नाहीं.

"मी सबंध शरीराचा राजा आहे, राजा!" मोठा मेंदू आढ्यतेनें म्हणाला, "प्रत्येक इंद्रिय कसलीहि हालचाल करायच्या आधीं माझी परवानगी घेतें—माझी आज्ञा प्रत्येकाला पाळावी लागते."

"असेल, पण म्हणून माझें काम कांहीं लहानसान नाहीं!" धाकटा मेंदू उत्तरादाखल म्हणूं लागला, "सबंध शरीराचा तोल—"

त्याला पुरें न बोलूं देतां मोठा मेंदू पुन्हां म्हणाला, "उथळ पाणी आहे तुझें; म्हणूनच फार खळखळाट चालविला आहेस! अरे बाबा, विचार करणें म्हणजे सोपी गोष्ट नव्हे. जगाच्या आरंभापासून मी विचार करीत आलों आहे. आजपर्यंत माझ्या कार्यांच्या महत्त्वाबद्दल कुणीहि शंका घेतली नाहीं. आणि तूं काय माझ्यापुढें आज मिजास दाखवतोस?"

" माझ्यावरची जबाबदारीहि कांहीं कमी नाहीं— "

" कसली जबाबदारी घेऊन बसला आहेस! माझ्याकडे पहा तर खरें एकदां. सगळ्या मानव जातीचें वैशिष्ट्य – तिची विचार-शक्ति माझ्यावर अवलंबून आहे. "

यावर 'माझ्यावरहि मनुष्यजात पुष्कळ अंशीं अवलंबून असते' असें धाकटा मेंदू म्हणणार होता. पण इतक्यांत त्याला त्याहून एक चांगली कल्पना सुचल्यासारखें वाटलें. तो म्हणाला, " नुसती मानव-जातच कशाला हवी? पशु, पक्षी, किंबहुना सगळे जलचर, स्थलचर प्राणी विचारांत घेतले तरी त्यांच्या शरीरांत माझे भाऊबंद – धाकटे मेंदू – आहेत म्हणून तर त्यांना आपापला तोल नीट सांभाळतां येतो."

परंतु कल्पना सुचण्याच्या कामीं मोठा मेंदूच केव्हांहि सरस ठरला असता. किंबहुना, कल्पनेवर प्रतिकल्पना लढविणें हें तर त्याचें काम. त्या बाबतींत तरी तो धाकट्या मेंदूला हार गेला नसता. तेव्हां त्याच्या कल्पनेचा फायदा घेऊन मोठा मेंदू म्हणाला, " किती क्षुद्र कल्पना तुझी! इतर प्राणी आणि मनुष्य प्राणी ह्यांत फरक काय हें सुद्धां तुला कळूं नये ना? माणसानें आज सगळ्या सजीव सृष्टीवर जें वर्चस्व मिळविलें आहे, तें केवळ माझा अधिक प्रभावी अंश माणसांत असतो म्हणून. – वाघसिंहांसारख्या हिंस्र पशूंवर मनुष्य हुकमत चालवितो, ती माझ्या मदतीनेंच. आफ्रिकन् जंगलांतला सिंह असो, नाहीं तर पॅसिफिक्च्या तळाशीं दडलेला भयंकर असा निनांवी जलचर असो, त्याचा निमिषार्धांत फडशा उडवून टाकतां यावा म्हणून मनुष्याला स्फोटक दारूचा शोध कुणी लावून दिला! मींच ना? "

काय हा गर्व! धाकट्या मेंदूला तर तो उन्माद मुळींच सहन झाला नाहीं, तो कांहीं तरी उत्तर देणार होता. 'माझा अंश जर मनुष्यांत नसता तर तो नुसता एकाच ठिकाणीं पडून राहिला असता. त्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जायचें म्हटल्यास

सरपटत किंवा लोळत जावें लागलें असतें. अर्थात् मग तो विशेष पराक्रम करूं शकला नसता. मग जीवसृष्टीचें वर्चस्व कुठून त्याच्याकडे जायला ?' असेंच कांहींसें उत्तर धाकटा मेंदू देणार होता.

पण तेवढ्यांत मोठा मेंदू म्हणाला, "माझ्यावांचून मनुष्य अडून बसेल! त्याची कांहींच प्रगति व्हायची नाहीं."

"आणि माझ्यावांचून तर," धाकटा मेंदू हंसून म्हणाल "माणसाचें शब्दशः एकहि पाऊल पुढें पडणार नाहीं! आतां आपण ज्या कुडींत आहोंत तीच कुडी पहा. मी माझा ताबा सोडला तर हा देह धाडकन् खालीं आदळेल. अगदीं भर रस्त्यांत!"

"अरे, जा! ह्या देहाला तुझ्यापेक्षा माझाच जास्त उपयोग होतो आहे. मी डोळ्यांना सांगतों, 'कशा रंगीबेरंगी इमारती दिसताहेत!' मी नाकाला विचारतों, 'शेजारच्या बगीचांतून वाऱ्याबरोबर येणारा फुलांचा वास तरी घेतलास कां?' आणि मी कानांना म्हणतों, 'पलीकडच्या बंगल्यांत चाललेलें रेडियोवरचें संगीत तर ऐका!'– अशा रीतीनें मी माझ्या विचाराच्या भरारीनें ह्या देहाला पायाखालचा ओबडधोबड रस्तासुद्धां विसरायला लावतों पहा!"

"इथेंच तर माझें महत्व सिद्ध होत आहे," धाकटा मेंदू विजयानंदानें म्हणाला, "कारण मी आहे म्हणून अशा परिस्थितींत सुद्धां हा देह नीट चालला आहे."

परंतु धाकट्या मेंदूचा विरस झाला. कारण त्याचें म्हणणें आपल्याला मान्य आहे कीं अमान्य आहे त्याबद्दल मोठा मेंदू कांहींच बोलला नाहीं. तो आतां रंगीत बंगले, फुलांचा सुगंध, आणि मधुर संगीत वगैरेंचें सेवन करण्यांत, आणि त्यांतून कल्पनेच्या भराऱ्या मारण्यांत अगदीं गुंग झाला होता.

त्यामुळें धाकटा मेंदू अधिकच चिडला. आपला पराक्रम दाखविलाच पाहिजे झाला, असा त्यानें निश्चय केला.

इकडे कल्पनेच्या भराऱ्यांना स्वर्ग दोनच बोटें उरला होता. इतक्यांत डोळ्यांनीं मोठ्या मेंदूकडे वर्दी आणली, "समोरून मोटर नांवाचें अजस्त्र धूड भरवेगानें येत आहे!"

कानांनीं बातमी आणली, "एकसारखा हॉर्न् वाजतो आहे!"

मोठ्या मेंदूनें घाईत हुकूम सोडला, "सर्व अवयवांना म्हणावें, आगच्या जागी उभे रहा! पायांना म्हणावें, शक्य तर मागें फिरा! आटपा!!"

"तें आतां शक्यतेच्या पलीकडे गेलें आहे," असा मोठ्या मेंदूला निरोप पाठवून पाय तिथेंच उभे राहिले.

त्याच वेळीं इतर सर्व अवयवांकडून निरोप निघाले, "धाकट्या मेंदूनें राजीनामा दिला आहे; आमचा तोल चालला!— "

—– परंतु तो निरोप मोठ्या मेंदूकडे पोंचायच्या आंतच तें अजस्त्र धूड आलें आणि तो देह धाडकन् रस्त्यावर कोसळला!

कवटी फुटून मोठ्या मेंदूला जबर दुखापत झाली होती, आणि पृष्ठ-वंश-रज्जूच्या टोंकाला धाकटा मेंदू लोंबत होता!

—'महाराष्ट्र-शारदा'

# खडूची कांडी

दिल्ली शहराबद्दलची माहिती वर्गातल्या मुलांना सांगतांना मास्तर ऐन रंगांत आले होते. कारण त्यांचें लहाणपण दिल्लींत गेलें होतें. एके काळीं जरी त्यांनीं आपल्या आशांचे मनोरे कुतुबमिनार-एवढे उभविले होते, आणि आतां ते सारे जरी कोसळले होते, तरी आज कुतुबमिनारचें वर्णन करतांना त्यांना विलक्षण अभिमान वाटत होता.

" सर, तो पडत कसा नाहीं ? " एका विद्यार्थ्यानें कुतूहलानें प्रश्न केला.

" त्याचा पाया जास्त रुंद असतो– " अशी सुरुवात करून मास्तरांनीं त्या विद्यार्थ्याची शंका दूर करायचे खूप प्रयत्न केले. पण त्याला मनोऱ्याच्या बांधणीविषयीं नीटशी कल्पना होईना.

इतक्यांत मास्तरांचें लक्ष टेबलावर ठेवलेल्या एका खडूच्या कांडीकडे गेलें. आणि त्यांनीं ती कांडी टेबलावर सरळ उभी करून पुन्हां सुरुवात केली, " आतां तुम्हांला कुतुबमिनार कसा बांधला आहे तें नीट समजेल– "

ते शब्द खडूच्या कांडीनें ऐकले मात्र. किती हुरळून गेली ती! आज आपण धन्य झालों असें तिला वाटू लागलें. " कुतुबमिनारच्या ठिकाणीं आपली योजना! बस, आणखी काय पाहिजे? नाहींतरी मास्तरांनीं फळ्यावर लिहितां लिहतां आपण झिजूनच जायचं ना?"

तिच्या गर्वाचा कुतुबमिनार अखेर इतका चढला कीं, तिला स्वर्ग दोन बोटें उरलासें वाटू लागलें; तोंच—

"... तर असं महत्त्व आहे दिल्लीच्या कुतुबमिनारचं!" असें आवेशानें म्हणत मास्तरांनीं आपली वळलेली मूठ टेबलावर आपटली!

—कुतुबमिनारला धरणीकंपाचा धक्का बसावा तसा त्या बिचाऱ्या खडूच्या कांडीला एक प्रचंड धक्का बसला! ती हादरून एका बाजूला कलली आणि टेबलावरून गडगडत फरशीवर पडली. तिचे तुकडे तुकडे झाले, ते सुद्धां फरशीवर गडगडत एकमेकांपासून दूर जाऊन थांबले.

इकडे मास्तर कुतुबमिनारचें महत्त्व फळ्यावर लिहून द्यायच्या विचारांत होते; कारण ते त्याच वेळीं वर्गाच्या मॉनिटरला सांगत होते—

" खडूची कांडी दे रे दुसरी– "

एकुण, मुलांच्या ज्ञानाकरितां आपण झिजायचें भाग्य दुसऱ्याच खडूच्या कांडीला मिळायचें होतें!

* "आनंद"

# तिसरा प्रयत्न

“अर्रर्र— पेटलं ! पेटलं ! !” असे धाईनें उद्गार काढीत अप्पासाहेब खुर्चीवरून उठले.

मीहि दचकून उठलों आणि त्यांच्या मागोमाग खिडकीजवळ जाऊन बाहेर पाहूं लागलों.

समोरच्या घरांत तळमजल्यावर एका बाईचें पातळ पेटलें होतें ! तेवढ्यांत प्रसंगावधान राखून तिनें तें चट्कन् सोडलें आणि समोरच्या पेटत घातलेल्या स्टोव्हला धाडकन एक लाथ मारली. तो कोलमडून पडतांना त्याचा धक्का शेजारच्या स्पिरिटच्या बाटलीला लागला. ती खळ्कन् फुटली आणि स्पिरिट जमिनीवर पसरतां पसरतां एकच भडका उडाला ! ज्वालाहि आसपास पसरल्या आणि त्या बाईनें सोडून टाकलेल्या पातळानें पुन्हां पेट घेतला. दचकून ती बाई मागें सरकली. त्या विवस्त्रेकडे आमचें लक्ष जातांच आम्हीं एकदम माना फिरवल्या. तेवढ्यांत आम्हाला दिसलें कीं, त्या पेटलेल्या खोलीच्या खिडकींत चट्कन् एक म्हातारा आला आणि त्यानें ती खिडकी लावून घेतली.

त्या जागेकडे हात दाखवून आप्पासाहेब म्हणाले, " परवांपासनं हें दुसऱ्यांदा बरं का ! "

" दुसऱ्यांदा ? " मी म्हणालों.

" हं " इतकेंच आप्पासाहेब म्हणाले. त्यांनी आपलें डोकें दोन्ही हातांनी घट्ट दाबून धरलें होतें. त्या अनपेक्षित देखाव्याची भयानकता त्यांना फार जाणवली असावी.

माझ्या नसादेखील कांहीं कमी हादरल्या नव्हत्या ! मी बराच वेळ कांहीं बोललों नाहीं. जातांना ' बरं, जातों ' एवढेंच सांगून घरीं जायला निघालों.

दुसऱ्या दिवशीं, कुठल्या तरी गांवच्या प्राथमिक शाळेची इमारत बांधायचें कॉंट्रॅक्ट मिळाल्यामुळें अप्पासाहेब त्या गांवीं निघून गेले.

तिथून मला त्यांचीं मधूनमधून पत्रें येत; पण त्यांत तिथलें निसर्गसौंदर्य, शाळेवरील अधिकाऱ्यांचा चांगुलपणा, नव्या इमारतीबद्दल विद्यार्थ्यांची उत्सुकता,—ह्याव्यतिरिक्त विशेष कांहीं नसे.

जवळजवळ सहा महिन्यांनीं अप्पासाहेबांचें तिकडचें कॉंट्रॅक्ट पुरें झालें असेल, आणि आतां ते दहापंधरा दिवसांत इकडे येतील अशी मी अपेक्षा करत होतों. कारण त्यापूर्वीं नुकत्याच आलेल्या त्यांच्या पत्रांत त्यांनीं तसें म्हटलें होतें.

तिकडचें काम संपल्यावर, चार दिवस मजा म्हणून माझ्याकडे अप्पासाहेबांना बोलवायचा मीं विचार केला आणि त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं त्यांना लिहायचें ठरवून मी आमच्या वसतिगृहांतल्या माझ्या खोलींत वाचत कॉटवर पडलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं दारावरील टक्टक् असा आवाज ऐकून मी जागा झालों. दार उघडून पाहतों तों अप्पासाहेब हजर !

इकडचें तिकडचें असें अगदीं थोडकें बोलून झाल्यावर अप्पासाहेब म्हणतात,

" अरे, मी जायच्या आदल्या दिवशींचा प्रसंग आठवतो कां तुला ? "

" हो, आजच्याच पत्रांत मी तुम्हाला लिहिणार होतों—तीच बाई स्टोव्हनं भाजून काल आमच्या हॉस्पिटलमधें येऊन पडलीय् ! मागच्याच वेळीं तुम्ही म्हणाला होतां कीं हें दुसऱ्यांदा म्हणून ! मग काय आज हें तिसऱ्यांदा म्हणायचं कीं काय ? "

" हो ना " अप्पासाहेब म्हणाले, " पण जरा बाहेर चलतोस का ? " शेवटचे शब्द उच्चारतांना त्यांचा चेहरा एकाएकीं गंभीर झाला.

समोरच्या ' काफे मेडिको ' मधें आम्ही गेल्यावर अप्पासाहेबांनीं अगदीं एका कोंपऱ्यांतलें एक टेबल पसंत केलें. चहा आणायला पोऱ्याला सांगून त्यांनी एकवार आजूबाजूला नजर फिरविली.

तिथल्या धांदलीच्या वातावरणानें त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारची असमाधानाची छाया पसरली असें मला वाटलें. मीं ओळखलें कीं, ह्यांना आतां एकांताची जरूर आहे आणि माझ्याशीं कांहीं खाजगी बोलायचें आहे. म्हणून चहा वगैरे झाल्याबरोबर मी त्यांना ' माझगांव हिल'वर घेऊन गेलों. तिथल्या सर्व हिरवळी ओलांडून टेनिस कोर्ट्स् मागें टाकून, अगदीं कडेच्या एका बांकावर आम्ही जाऊन बसलों. ही ' माझगांव हिल ' म्हणजे मुंबईतली दुसरी ' हँगिंग गार्डन 'च आहे. अगदीं ' मलबार हिल'चा नमुना. नाहीं तरी आम्ही ' ग्रांट मेडिकल'चे विद्यार्थी ह्या ठिकाणाला ' पॉकेट एडिशन ऑफ दि मलबार हिल ' असेंच म्हणतों.

तिथून दिसणारा देखावा मोठा मनोवेधक होता. टेकडीच्या लगतच खालीं हार्बर ब्रँच रेल्वे व टँक बंदरची ट्रॅम यांची ये-जा चालू होती. मालाची नेआण करणाऱ्या बोटींनीं धक्क्यापाशीं थांबून गर्दी केली होती, आणि मच्छीमारी करणाऱ्यांच्या होडया दूरवर पसरलेल्या खाडींत इकडून तिकडे येरझारा घालीत होत्या. तरीहि अप्पासाहेबांचें गांभीर्य कायम होतें. त्या देखाव्यांतून त्यांनी भलताच अर्थ काढला.

"लांबून कसा छान दिसतोय देखावा ! पण जवळ जाऊन पाहा जरा– पाण्यांतनं नुकतेच काढून त्या बारक्या होडींतल्या टोपलींत टाकलेले तडफडणारे मासे डोळ्यांनीं बघवायचे नाहींत ! मोठ्या बोटींतल्या घाणीनं नाक गुदमरून जाईल अगदीं, श्वाससुद्धां घेता यायचा नाहीं धड ! अन् त्या गाडीच्या न् ट्रॅमच्या खडखडाटानं कान किटून जातील नुसते ! – कुठंहि जा, हें असंच सांपडेल ! कांहीं माणसंसुद्धां अशींच—– अगदीं हाच नमुना ! वरून दिसायला संभावित, आंतून पापाचे पुतळे ! वरवर निर्मळ पाणी, अन् आंत पापाच्या चिखलानं भरलेली विहीर ! अरे फार कशाला ? – माझ्या-बद्दल तर तुझं मत आजवर चांगलं होतं ना ?..." अशी उद्वेगपूर्ण प्रस्तावना करून त्यांनीं त्या भाजलेल्या बाईविषयीं जी हकीकत सांगितली, ती अशी :

धुतल्या तांदळासारखा निष्कलंक मनुष्य सांपडणें कठीणच एकंदरींत. प्रत्येकाच्या आयुष्यांत कुठें ना कुठें तरी गालबोट असायचेंच ! त्यांत त्याचा फारसा दोष असतो अशांतला अर्थ नाहीं. आणि म्हणूनच तर आज मी ही सगळी कबुली निःशंकपणें देत आहे.

त्याचें असें झालें– मी रहात होतों त्याच वाडींत समोरच्या खालच्या मजल्यावर तो म्हातारा राहात होता. पक्का कर्मठ होता बेटा. रोज दोनदां स्नान, सकाळीं पूजा-अर्चा, शिवाय सोंवळें-

ओवळें सगळें कांहीं अगदीं कडक. वयानें चाळिसच्या पलीकडचा सहज होता.

आणि इतकें असून जेव्हां म्हाताऱ्या धीरूभाईनें तिसरें कीं चवथें—कितवे तें नक्की ठाऊक नाहीं— लग्न करून घेतलें तेव्हां मला त्याच्या नव्या बायकोची—मृदुलाबेन तिचं नांव— कींव आली.

तीच ही स्टोव्हनं भाजलेली बाई. प्रथम माझ्याकडे आली ती आपलें भविष्य विचारायला म्हणून. सामुद्रिक जाणणारा म्हणून मी सगळ्या वाडींत माहीत होतों.

तिचा नाजूक हात मीं हातांत घेतला आणि तिच्या गुंतागुंतीच्या भावी आयुष्याबद्दल विचार करतां करतां दृष्टि वर केली. तीहि माझ्याकडे उत्कंठेनें पाहात होती. मीं तिच्याकडे पाहतांच तिनें असें कांहीं मोहक स्मित केलें कीं मी निमिषमात्र जगाला विसरलोंच. आमचे चेहरे आधींच एकमेकांच्या अगदीं जवळ होते. तशांत दृष्टीला दृष्टि भिडलेली आणि त्या सर्वांवर मात करणारें तिचें वेड लावणारें हास्य !— मी क्षणिक उन्मादाला बळी पडलों !

— आणि तिनें मुळींच नाखुषी दाखवली नाहीं.

उलट, मी भानावर येऊन मागें सरकतांच पाहतों तों तिचे डोळे आनंदातिशयानें मिटलेले ! अगदीं तंद्रीत होती ती.

मी अगदीं गोंधळून गेलों. तिची माफी मागावी काय असा मी विचार करीत होतों. इतक्यांत ती स्वतःच म्हणाली,

" माझं भविष्य !— असंच... "

असेंच कांहींसें ती अर्धवट म्हणाली, एरवींसुद्धां ती गुजराथी असून मराठी भाषा उत्तम बोलत असे; पण त्या वेळीं ती अडखळली.

तिच्या म्हणण्यांतला आशय मीं ओळखला. मला थोडीशी भीति वाटली. शिवाय माझ्या हातून नुकत्याच होऊन गेलेल्या गोष्टीबद्दल मनाला टोंचणी लागली होती. मीं तिला म्हटलें,

" तुमचं भविष्य ? सांगेन पुन्हां केव्हांतरी; फार गुंतागुंतीचं आहे तें. "

मुद्दामच तिला टाळायच्या उद्देशानें मीं तसें सांगून टाकलें. तीहि मग फार वेळ न बसतां गेली.

त्यानंतर जेव्हां जेव्हां ती माझ्या दृष्टीस पडे तेव्हां तेव्हां ती माझ्याकडे पाहून हंसे. मी तिकडे लक्षच द्यायचें नाहीं असें ठरविलें. पण मी जों जों तिला टाळायला लागलों, तों तों ती माझ्या दृष्टीस पडायचा अधिकच प्रयत्न करूं लागली.

पुढें पुढें तर ती खालीं नळावर गर्दी असली कीं पाणी भरायला वर येऊं लागली.

माझी खोली अगदीं शेवटची होती. पलीकडे आमच्या मजल्याचें स्नानगृह होतें. त्याला एक दार बाहेरच्या व्हरांड्यांतून होतें आणि दुसरें माझ्या खोलींतून परस्पर होतें. हें अर्थात् नेहमीं मिटलेलें असायचें. माझे स्नेही स्नान करायला गेले कीं आपलें स्नान झाल्यावर ते ह्या दारावर ठोके देत असत. म्हणजे इतर कुणी स्नानाला जायच्या आधीं मला स्नानगृह मोकळें मिळे.

त्या दिवशीं दारावर नेहमींप्रमाणें ठोके आले.

" कोण रे ?– हरिभाऊ ? होऊं दे तुझं सावकाश. जरा वेळ आहे मला. " मी म्हणालों.

पण हरिभाऊकडून कांहींच उत्तर आलें नाहीं.

" कोण, पांडोबा का रे ? " मी म्हणालों.

पण तो पांडोबाहि नव्हता. कारण, नाहींतर त्यानें नेहमींप्रमाणें ' अप्पासाहेब ! ' म्हणून पुकारलें असतें.

दारावर पुन्हां टक् टक् असा आवाज झाला.

" दाढी करतोंय् मी लेका ! " मी गर्जलों. तरीहि आंतून उत्तर नाहीं.

मात्र आणखी एकदां दारावर बोटें वाजलीं.

" कां ? वाचा बसली वाटतं ? " असें चेष्टेनें म्हणत मीं मधलें दार उघडलें आणि पाहतों, तों काय आश्चर्य—

मृदुलाबेन ओलेती उभी !

मी थक्कच झालों.

" टॉवेल आणायला विसरलें हो " ती हंसतहंसत म्हणाली, " म्हणून तुह्मला तसदी दिली... "

मीं चट्‌कन् तिला टॉवेल काढून दिला. तसें करणें भाग होतें.

तिनें अंग पुसलें आणि पातळ बदललें.

तेवढ्यांत माझी दाढी पुरी झाली होती. मी स्टोव्ह पेटवत होतों. तिनें खोलींतलें पातेलें घेतलें आणि नळावरून पाणी आणलें.

" तुम्ही नका, मीच करतें चहा " असें म्हणून तिनें आधण ठेवलें. त्यांत साखर टाकून झाल्यावर ती माझ्याशीं गप्पा मारूं लागली.

" आभार मानतें मी तुमचे " तिनें सुरुवात केली, " तुम्ही नसतां तर आज मोठी फजितीची वेळ आली होती ! " वगैरे, वगैरे. माझें फारसें लक्ष नव्हतें तिच्या बोलण्याकडे.

" खरंच, तुम्ही लग्न कां नाहीं करत ? " ती मध्येंच म्हणाली, स्वतःच चहा करून घ्यायचा, खाणावळींत जाऊन जेवायचं, कंटाळा नाहीं येत तुम्हाला ?... "

त्या दिवशीं तिच्या हातचा चहा आम्हीं दोघांनीं एकत्र बसून घेतला.

आणि असाच मी हळुहळू तिच्या पाशांत गुरफटलों.

आमच्या परस्पर-संबंधाला कांहीं ' प्रेम ' म्हणतां यायचें नाहीं. आणि त्यांत तुला विशेष वावगें वाटणार नाहीं. मेडिकल स्टयूडंट आहेस तू. मनुष्यजातीचे अनेक नमुने पाहिले असशील तूं.

पुढच्या बारीकसारीक गोष्टीही तुला सांगायला नकोत, कारण त्यानंतर कितीदां तरी आम्हीं एकत्र बसून चहा घेतला, गप्पा मारल्या. तिची मोहिनी कांहीं माझ्यावरून दूर होईना.

एवढें मात्र खरें कीं, म्हाताऱ्या धीरूभाईला हें तिचें वर्तन पसंत नसे. पण सांग, तिचा तरी काय इलाज होता ? तिला तरी संसाराची कांहीं हौस असणारच ना ? पण धीरूभाईनें आपल्या हौसेखातर तिला विकत घेतली होती. हो, लग्न कसलें तें ?

धीरूभाई संतापला म्हणजे तिला कधींकधीं मारायचा सुद्धां. ती मग माझ्याजवळ येऊन कुरकूर करायची. एकदां तर म्हाताऱ्यानें तिला जिवंत जाळायचा धाक घातला. आणि तसा प्रयत्नहि केला. सुदैवानें ती त्यांतून निसटली आणि माझ्याकडे येऊन रडली. मला म्हणाली, 'मला दूर कुठेंतरी घेऊन चला.' मला मोठा प्रश्नच पडला. 'लवकरच कांहीं तरी ठरवून सांगेन' असें म्हणून मी तिचें कसेंबसें समाधान केलें.

त्यानंतर दुसऱ्यांदा तिचे पातळ पेटलें. त्या दिवशीं तूं होतासच. त्या वेळीं लोकांना संशय येऊं नये म्हणून त्या म्हाताऱ्यानें कशी चट्कन् खिडकी लावून घेतली तें तूं पाहिलेंसच.

तूं गेल्यावर मृदुला माझ्याकडे आली आणि हट्टच घेऊन बसली कीं, 'मला इथून हालवा.' मींहि तिला सांगितलें कीं, 'उद्यां मला कॉंट्रॅक्टच्या नवीन गांवीं जायचं आहे. तिथं जातों, काम कसं काय आहे तें पाहतों, तुझ्या राहण्याचीही कांहीं सोय करून ठेवतों. अन् आठवड्याभरांत परत येऊन तुला घेऊन जातों. तशीच जरूर लागली आधीं तर कळव मला.' असें म्हणून मीं तिला माझा पत्ता देऊन ठेवला.

तिकडे गेल्यावर कामाला एकदम जोरांत सुरवात झाली आणि तिचेंहि मला कांहीं पत्र आलें नाहीं. तेव्हां मीं मनाशीं म्हटलें, 'काय

करायचं आहे इतक्यांत जाऊन? ठीक चाललं असेल सगळं कांहीं. नाहींतर तिनं मला बोलावलं असतं.' असा मी बेफिकीर झालों.

शेवटीं परवां जेव्हां तिचें पत्र आलें तेव्हां कुठें माझे डोळे उघडले. लगेच काम टाकून मी यायला निघालों. हें पहा तिचें पत्र—

"अप्पासाहेबांना पुस्कळ प्रणाम—

हें पत्र कोणापासून आले तेचा विस्वास आपणास आरंभी नाय बसेल. कारण मी मराठी बोली जाणते पर लिहावे कसे ते सिखले नाय.

तुमचा आठ दिवसांचा हिसाब अजून संपले नाय काय? कारण आतांशीं मला धीरूभाई मारहाण करते. फार तरास देते. इतके दीस मी तुमाला लिवलें नाय कारण इतके दीस बरा होते. पर आतां मला सा मैने गेलेत, तवा पोट दुकते. तर धीरुभाई बोलते—कुटाय तुजा अप्पासाब? मी काय बी सांगले तरी मला मारहाण करते. आग लावील बोलते.

असा बांका वखताला तुमी याल तर बरा पडेल. मी तुमासंग जायला राजी होएल.

पाय पकडतें, पर वखत गमावूं नका.

मृदुलाबेन"

हें पत्र मिळाल्यावर माझी माणुसकी जागी झाली. येतांना गाडींत सारखे तिच्याबद्दलचेच विचार मनांत येत होते. तिचें लग्न एका म्हाताऱ्याशीं करून देण्यांत तिच्या वडिलांची चूक झाली असेल, पण क्षुल्लक मोहाचा प्रतिकार न करतां तिच्या सबंध आयुष्याचें मातेरें कुणी केलें? मींच ना?

सकाळीं बोरीबंदरवर उतरल्यावर 'टाइम्स' घेतला, त्यांत वाचली बातमी. म्हणे स्टोव्हचा अपघात—

—चल, हॉस्पिटलमधें जाऊ आतां. इनडोअर पेशंट्‌स्‌ना भेटायची वेळ झाली असेल. किती भाजली आहे ती कुणास ठाऊक! 'टाइम्स' तर म्हणतो निराशाजनक स्थिति आहे! चल, ऊठ—

अप्पासाहेबांच्या बोलण्याचा परिणाम माझ्यावर बराच झाला होता. टेकडी उतरून येईपर्यंत त्यांचें कांहींतरी बोलणें चालू होतें. मी नुसतें ऐकण्याचें काम करीत होतों. 'नेस्‌बिट ब्रिज' ओलांडून आल्यावर आम्हाला कांहीं विद्यार्थी दिसले.

"तेरा नंबरची बेड्‌ खालीं झालीय्‌ आज!" एकजण म्हणाला.

"म्हणजे?" मी चमकून म्हणालों.

"अरे रात्रींच खलास झाली ती बया!" तो म्हणाला, "आत्तांच मी वॉर्डमधून जाऊन आलों."

"पोस्ट मॉर्टेम चालू आहे तिकडे!" दुसरा म्हणाला.

"कॉरोनरपुढें सगळं बाहेर पडेल!" आणखी एकजण म्हणतो, "अर्थात्‌ त्या धीरूशेटनं सांगितलं खरं तर—कारण प्रश्न आहे त्याच्याच अब्रूचा."

आणि निष्ठुरपणें हंसत हंसत ती मंडळी चालूं लागली.

कॉलेजच्या विद्यार्थ्यांखेरीज इतरांना 'पोस्ट मॉर्टेम्‌' बघायची परवानगी नसते म्हणून बरें, नाहींतर अप्पासाहेबांना तें भेसूर दृश्य बघवलेंच नसतें!

कॉरोनरच्या कोर्टांत मग दुपारीं आम्ही गेलों. तेथें प्रेताची रीतसर चौकशी झाली आणि अखेर 'स्टोव्हच्या अपघातानें मृत्यु' असा निकाल सांगण्यांत आला.

नंतर, स्टोव्ह वापरण्यांतला बायकांचा बावळटपणा वगैरेंवर कॉरोनरसाहेबांनीं नेहमींप्रमाणें खूप टीका केली. त्यांना कुठें ठाऊक होतें; कीं—

त्या स्त्रीला जिवंत जाळण्याकरितां तिच्या म्हाताऱ्या नवऱ्यानें केलेला आणि ह्यां खेपेला यशस्वी झालेला हा तिसरा प्रयत्न होता!

—'मनोहर'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. नं. ..........
वाचनालय शाखा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ...१५९१० नों दि. ............
वि. ......५१.२११.. क्र.. .......... . .....

# मुशाहिरा

नुकत्याच धारा काढून झाल्या होत्या. गव्हाणींत थोडा कडबा टाकून कालिंदीनें दुधाची चरवी उचलली आणि ती अंगणांतून सोप्याकडे येऊं लागली. पण मधेंच ती जरा थबकली. पहांटेच्या त्यावेळीं अनिलच्या खोलींत दिवा लागलेला पाहतांच तिला क्षणभर आश्चर्य वाटलें. पण लगेच ती स्वतःशीं म्हणाली, " बसले असतील लिहीत कांहीं तरी !"; आणि पुढें चालूं लागली.

पण तेवढयानें तिच्या मनाचें समाधान झालें नाहीं. चरवींतील दूध निरनिराळ्या लहानमोठ्या लोट्यातपेल्यांतून ओतत असतांना आणि अच्छेर पावशेरासारख्या मापांची जुळवाजुळव करत असतांना तिच्या मनांत आपल्या पतिविषयींचेच विचार एकसारखे येत होते. त्याच्या आणि तिच्या एकत्रित आयुष्यांतील पूर्वस्मृति तिच्या मनांत जागृत होत होत्या.

अनिलचा आणि कालिंदीचा विवाह झाल्यानंतरसुद्धां अनिलचें कॉलेजांतील शिक्षण चालूं होतें. आणि त्यासाठीं तो पुण्याला राहात असे. कालिंदी मात्र त्याच्या आईवडिलांजवळ नंदनपुरला असे.

तो सुटीपुरता नंदनपुरला येई तेवढाच त्याचा सहवास कालिंदीला मिळत असे. त्याचा स्वभाव भावनाप्रधान, आणि परहिततत्पर असल्यामुळें कालिंदीला तो अतिशय आवडे, आणि प्रत्येक वेळीं सुट्टी संपून अनिल पुण्याला जायला निघाला कीं कालिंदी त्याला म्हणायची, " राहा ना आणखी थोडे ! काय बिघडतं दोन दिवस कॉलेज बुडलं तर ? "

आणि तोही दरवेळीं सुट्टी संपल्यानंतर दोन दिवस तिच्याकरितां राहात असे.

अशाच एका सुट्टीच्या अखेरीस तो कालिंदीला म्हणाला होता, " हें पहा, मी आतां पुढच्या सुट्टींत येईन कीं नाहीं तें कांहीं सांगतां येत नाहीं. "

" तें कां बरं ? "

" अलिकडे जिकडे तिकडे काय चाललं आहे तुला ठाऊक आहेच. कित्येकदां आपल्या पुढाऱ्यांचीं व्याख्यानं ऐकलीं कीं वाटतं आपणही ह्या चळवळींत सामील व्हावं अन् आपल्या देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीला हातभार लावावा. "

" पण सत्याग्रह करून स्वराज्य मिळणार कां ? " असें तिनें अगदीं बालिशपणें विचारलें होतें.

तो त्या काळच्या सर्वसाधारण तरुणाप्रमाणें म्हणाला होता,— " वेडी आहेस तू अगदीं ! आपण स्वतंत्र होणार यांत शंका कसली ? पण स्वतंत्र झाल्यावर सुद्धां असं वाटायला नको, कीं आपण स्वातंत्र्य उपभोगतों आहोंत खरं, पण ते मिळवतांना मात्र आपण काडी-इतकेही श्रम केले नाहींत ! "

यावर कालिंदी तात्पुरती निरुत्तर झाली होती. ती नुसतीच त्याच्या चेहऱ्याकडे पाहात राहिली होती. तो पुन्हां म्हणाला होता, " खरंच, काली ! वेडी तर नाहींस तूं ? "

" असूं द्या आपली मी वेडी ! पण माझं वेडीचं म्हणणं इतकचं कीं तुम्ही तसं भलतंच कांहीं करूं नका. " असें ती त्यावेळीं सर्व-सामान्य हिंदी तरुणीला शोभेशा थाटांत म्हणाली होती.

त्याची खात्री होती, कीं सत्याग्रहच काय पण आपण एखाद्या सिनेमांत काम करतों म्हणून म्हटलें तरी ही ' तसें भलतेंच कांहीं तरी ' न करण्याबद्दल आपल्याला विनवणार. तेव्हां तोहि मग जास्त बोलला नाहीं. आणि आपल्या मनांतील विचार फारसे प्रकट न करतां तो पुण्याला गेला. आणि लवकरच एका ज्वलज्जहाल पुढाऱ्याचें व्याख्यान ऐकल्याचें तात्कालिक कारण होऊन, त्यानें आपलें नांव सत्याग्रहासाठीं जाणाऱ्या पुढील पथकांत दाखल केलें.

त्यापुढील दोनतीन वर्षांत परिस्थिति कितीतरी पालटलेली होती! चळवळ थंडावली होती; आणि तरुणांना काय करावें हें कळेनासें झालें होतें. इतर अनेकांप्रमाणेंच अनिलचेंहि शिक्षण अर्धवट राहून गेलें होतें, आणि सत्याग्रहाच्या चळवळींत भाग घेतलेला असल्या-मुळें त्याला नोकरीहि कोठें मिळत नव्हती.

याखेरीज त्याचें वैयक्तिक नुकसान झालें होतें तें निराळेंच. सत्याग्रहावर असतांना एकदां पोलीसांच्या प्रतिकारी उपायाखालीं प्रत्यक्ष सांडलेल्या व्यक्तींपैकीं तो एक होता. लाठीहल्ल्यांत सांपडून त्याचा एक पाय मोडला होता, आणि तो कायमचा लंगडा झालेला होता.

तो हॉस्पिटलमधून घरीं परत आल्यावर तर, आपले आईवडील कायमचे दुःखीकष्टी झाले आहेत, असेंच त्याला आढळून आलें होतें. आपलें लहानसें घर, थोडीफार जमीन आणि दोनतीन गुरें हीं सरकारनें जप्त केली नव्हती, यांत ते कसेबसे समाधान मानून राहिलेले होते. असलेलें घरदार तरी कायम ठेवण्याबद्दल त्यांनीं अनिलला आल्याबरोबर उपदेश केला होता. आणि त्यांची स्थिति पाहून भावनावश अनिलनेंहि त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वागण्याचें

ठरविलें होतें. घरादाराकडे मुलाचें आतां तरी लक्ष लागलें हें पाहून त्या वृद्ध पतिपत्नींनीं संसाराचा निरोप घेतला होता आणि आतां सारी जबाबदारी अनिलवर येऊन पडलेली होती.

अनिलच्या शारीरिक व्यंगामुळें त्याला कोणतींच कामें करणें जमत नसे. पण कालिंदी मात्र तीं सारीं हुशारीनें पार पाडी. रोज गांवांतील चार घरांत रतिबाचें दूध नेऊन घालणें आणि त्यावर थोडीफार कमाई करणें साहजिकच कालिंदीकडे असे. अनिलला मात्र मधून मधून वाटायचें कीं आपण खरोखरच कालिंदीच्या कष्टावर जगतों. संसार करायची आपल्यांत लायकी नाहीं ! यामुळें तो बऱ्याच वेळां दुःखीकष्टी असे. त्याच्या तीक्ष्ण बुद्धीला आणि भावानुकूल मनोवृत्तीला अनुसरून कॉलेजांत असतांना त्याला जडलेली कविता लिहिण्याची संवय मात्र अजून कायम होती.

पूर्वी त्यानें प्रेमगीतें लिहावीं आणि ती कालिंदीला दाखवावीं हा क्रम चालू असे. मध्यंतरीं त्यानें राष्ट्रीय वृत्तीचीं गीतें रचून आपल्या शिबिरांतील कित्येकांना स्फूर्ति दिली होती. आणि आताशां मात्र तो संसारांतील वैय्यर्थ्यावरच कविता लिहूं लागला होता. त्याचीं प्रेमगीतें कालिंदीला फारच आवडत असत. तिला आपल्या जीवनाचें प्रतिबिंब त्यांत दिसत असे कीं काय कुणास ठाऊक ? विशेषत: तीं वेळोवेळीं नियतकालिकांतून छापून आलीं म्हणजे ती त्याचें फारच कौतुक करायची.

पण अलिकडे मात्र ती अनिलला एकदां म्हणाली होती, " करायच्या आहेत काय इतक्या कविता लिहून अन् छापून ? त्यापासून कांहीं फायदा तरी ? "

" अग, आपल्याकडच्या बहुतेक मासिकांचं असंच आहे. नाहीं मोबदला कुणी देत तर करायचं काय ? बरं आपल्या लोकांना

गुणग्रहण नाहीं असं थोडंच आहे?" असें म्हणून त्यानें नुकतींच आलेलीं कांहीं संपादकांची पत्रें तिला पुन्हां दाखविलीं होतीं.

तीहि मग अधिक बोलली नव्हती. त्याला जास्त कष्टी करून तिला कांहींच लभ्यांश मिळण्यासारखा नव्हता. शिवाय त्यानें कविता लिहूं नयेत असें तिचें मुळींच म्हणणें नव्हतें. पण त्या लिहिण्याच्या नादांत तो आपल्या मनांत कष्टी विचारच जास्त वागवतो असें तिला वाटत होतें. आणि तें तिला नको होतें. अखेर तिनें विषय बदलला होता, आणि त्याच्या एका जुन्या प्रेमगीताचा उल्लेख करून म्हटलें होतें, "खरंच, तुमची ती कविता पाहूं द्या फिरून. मला बाई ती भारीच आवडली आहे!"

आणि ती कविता तिला पुन्हां दाखविण्याच्या नादांत तोहि तिच्याशीं झालेलें बोलणें विसरून गेला होता.

कालिंदीला हे सारे प्रसंग आत्तांहि आठवले आणि तो काय लिहीत आहे हें पाहण्याचें एक विचित्र कुतूहल तिच्या मनांत उत्पन्न झालें. आणि प्रथम जरी ती 'बसले असतील लिहीत कांहींतरी!' असें म्हणाली होती, तरी रतिबावर जाण्याच्या पूर्वी हळूंच ती अनिलच्या खोलींत आली.

अनिल एकदम दचकला.

"हें काय?— तूं कधीं आलीस इथें?"

"आत्तांच आलें. म्हटलं दिवा लावून काय चाललंय्? शेवटच्या दोन ओळी तेवढ्या पाहिल्या मीं. बाकीच्या बघूं बरं—" असें म्हणून तिनें कागद आपल्यापुढें धरला; आणि त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून त्याची ताजी कविता वाचण्यांत ती गढून गेली.

वाचून झाल्यावर तिनें तोंड वर केलें, आणि तो कागद आपल्या हृदयाशीं धरून ती म्हणाली, "किती छान लिहिलीत ही! फार दिवसांत अशी वाचायला मिळाली नव्हती मला!"

अनिलच्या मनांत आलें, " यापेक्षां आणखी मोबदला तो काय पाहिजे ? "

अनिलच्या लेखणींतून उतरलेलें आणि कित्येक दिवसांत वाचायला न मिळालेलें असें प्रेमगीत आज मिळाल्यामुळें कालिंदीला विलक्षण आनंद झाला. आणि कालिंदी आनंदित झालेली पाहून अनिलहि प्रसन्न झाला !

" काली, काली, फिरायला चलतेस कां ? " तो म्हणाला.

" आत्तां ? " असें म्हणून कालिंदीनें डोळे विस्फारले.

" हो; मी वर्तमानकाळी क्रियापद वापरलं ! " तिच्या विस्फारलेल्या गमतीदार डोळ्यांकडे पाहात तो म्हणाला.

" इश्श. तें नको कांहीं सांगायला ! तेवढं मला कळतं बरं ! येवढ्या साध्या शब्दाचा अर्थ कळायला कांहीं वाङ्मयसेवाच करायला हवी असं नाहीं ! " असें म्हणून ती खट्याळपणें हंसली, आणि पुढें म्हणाली, " माझ्याच म्हणण्याचा अर्थ तुम्हाला कळलेला दिसत नाहीं. " आत्तां म्हणजे असं, कीं आपण जर फिरायला गेलों तर दूध कोण पोंचवणार ? शिवाय डॉक्टरनीं तुम्हाला सांगितलं आहे ना, कीं थंडीच्या वेळीं असे बाहेर पडत जाऊं नका म्हणून ? "

" बाकी फावल्या वेळांत त्या बुद्धिस्पर्धामंडळाचीं कुट्टकं सोडवत असतेस तू !— तेव्हां एकेका शब्दाचे असतील नसतील ते सर्व अर्थ तुला ठाऊक असणार म्हणा ! " असें म्हणून त्यानें वादाचा मुद्दा कौशल्यानें टाळला. तिचें म्हणणेंहि त्याला अंतर्यामीं सत्य वाटत होतें.

तिचें प्रेमळ संरक्षण त्यानें मान्य केलें खरें; पण ज्या कित्येक प्रसंगीं त्याला काव्य आणि जीवन यांतील तफावत तीव्रतेनें जाणवली होती त्यांत आणखी एक भर पडल्यासारखें त्याला वाटलें. त्याचा विरस झाला. त्यानें आपली मुद्रा आणि हाताच्या पंजांची हालचाल

अशी केली कीं त्यांतून 'काय हें आमचं आयुष्य !' असा अभिप्राय व्यक्त झाला.

कालिंदीच्या तें लक्षांत आलें. पण घरोघर दूध पोंचवायची रोजची वेळ टळून गेली असल्यानें ती लगबगीनें निघाली.

सकाळच्या पहिल्या टपालानें मुंबईकडील एकदोन पत्रें आणि एका मासिकाचा ताजा अंक आला होता. तो फोडून बघण्याच्या नादांत अनिलचें पत्रांकडे लक्ष नव्हतें. त्याच्या अपेक्षेप्रमाणें त्या अंकांत त्याची एक सुंदर कविता आली होती. तिच्या छपाईंत एकहि चूक झालेली नसल्यामुळें अनिलनें, जरा आश्चर्यानेंच, समाधानाचा एक निश्वास टाकला आणि म्हटलें,

" पाहूं पत्र कुणाचं आलं तें. "

" पमाचं " असें म्हणत तिनें आपल्या बहिणीचें मुंबईहून आलेलें तें पत्र त्याला दाखविलें. त्या दोघी बहिणींची एक जिवलग मैत्रीण लवकरच परदेशांत जाण्यासाठीं म्हणून मुंबईला येणार होती. म्हणून तिच्या सहवासांत दोनचार दिवस घालवायला म्हणून पद्मेनें कालिंदीला आग्रहानें मुंबईला बोलाविलें होतें.

पत्र वाचून झाल्यावर अनिल म्हणाला, " काय ? जाणार ना ?"

" जावंसं वाटतंय् खरं; पण इथें— ? " असें म्हणून कालिंदीनें दोन्ही ओंठ आंत दुमडून घेतले. आणि भुंवया वर करून पापण्यांची दोनचार वेळां उघडझांप केली.

" इथली व्यवस्था मी पाहीन कीं चारसहा दिवस. त्यांत काय मोठंसं ? " असें तो लगेच मोठ्या तत्परतेनें म्हणाला. त्याच्या मनांत आलें— 'कालिंदी नेहमीं आपल्यासाठीं कष्ट करते; फार काय, आपला सारा संसार आजवर तिच्याच जिवावर झाला आहे. तिनें थोडीशी विश्रांति घेतली तर काय हरकत आहे ?'

"मीहि शक्य तितक्या लवकर परत येईन म्हणा!" असें कालिंदीनेंहि आपल्यापरी त्याला आश्वासन दिलें.

तिनें मासिकाचा तो अंक उघडला. त्यांतली अनिलची कविता तर तिला फारच आवडलेली होती. ती मुद्रित स्वरूपांत पाहतांच तिला त्याच्याबद्दल अनिवार कौतुक वाटलें.

त्या कौतुकाच्या विरोधानें तिला मासिकाच्या चालकांची मात्र चीड आली. ती म्हणाली,

"हे आमच्या मराठी मासिकांचे चालक. कागद, छपाई, अंकांची रवानगी वगैरे गोष्टींवर महिन्याला सहज चारपांचशे रुपये ओतत असतील; पण ज्यांच्या शब्दांनीं ह्यांच्या अंकाच्या अंतरंगाची खरी सजावट होते, त्या लेखकांना सगळयांना मिळून वाटायला म्हणून चाळीस-पन्नास रुपये कांहीं बाजूला ठेवावयाचे नाहींत."

अनिलचें म्हणणेंहि तसेंच होतें; पण त्याला त्या वैषम्याचा सराव झालेला होता. त्यामुळें तो अधिक कांहीं बोलला नाहीं. आणि त्यांचें बोलणें तेवढयावरच थांबलें.

दुसऱ्या दिवशीं एम्. एस्. एम्. च्या पुण्याकडे जाणाऱ्या गाडींत जेव्हां कालिंदी बसली तेव्हां तिला निरोप द्यायला म्हणून गांवापासून अकरा मैल दूर असलेल्या स्टेशनवर अनिल गेला होता.

त्याच गाडीनें जाणाऱ्या एका शेतकरणीचा नवराहि निरोप द्यायला आलेला होता. गाडी सुटायच्या वेळीं ती बाई त्याला म्हणाली, "पोरांना जीव लावा हं."

किती साधे शब्द होते ते. पण कालिंदीला त्यांचा जरा हेवाच वाटला. "कडबा-वैरणीचं वेळच्या वेळीं बघत जा हं. हो, बरी आठवण झाली—शालूला आज बाटूक आणायला हवं." असें ती अनिलला म्हणते न म्हणते तों गाडी चालू झाली.

गाडी निघून गेल्यावर अनिल आपल्या एकाच पायावर विशेष भार टाकत हळुहळूं स्टेशनच्या बाहेर पडला.

कालिंदीच्या गैरहजेरींत अनिलनें जसजशी एकेक घरगुती गोष्ट करण्यास आरंभ केला, तसतशी कालिंदीला होत असलेल्या परिश्रमांची त्याला अधिकाधिक खात्री पटत गेली. एखाद्या दिवशीं—आणि तें सुद्धां तशीच लहर लागली तर—पहाटे उठून कविता लिहीत बसणें, आणि रोज पहांटे उठून गाईच्या धारा काढून घरोघर दूध पोंहोचविणें यांत किती फरक आहे याची त्याला त्या चारपांच दिवसांत नीट कल्पना आली. प्रथम एकदोन दिवस तर गाई धाराच देईनात. कालिंदीची आवडती कालवड शालू दिवसांतून जेव्हां जेव्हां अकारण हुंबारे, तेव्हां तेव्हां अनिलला त्या लहानशा संसारांतील कालिंदीचें महत्त्वाचें स्थान अधिकाधिक स्पष्टपणें कळून येई, आणि तिची विलक्षण उणीव भासे. तिला आपल्या भावोत्कट प्रेमगीतांनी अधूनमधून रिझविण्यापेक्षां नेहमींच तिच्या कामकाजांत थोडाफार हातभार लावून तिला कायमची सुखी कशी ठेवतां येईल याचा तो हळुहळूं विचार करूं लागला. आणि त्याला अशा अनेक बारीकसारीक गोष्टी आढळून आल्या कीं ज्या त्याच्या अधू पायावर यत्किंचित्‌हि जुलूम न होऊं देतां त्याला करतां आल्या असत्या. त्या साऱ्या गोष्टी यापुढें करण्याचें त्यानें ठरविलें. आजपर्यंत आपण त्या केल्या नाहींत याचा त्याला मनापासून विषाद वाटला. त्याच्या मनांत आलें, ‘ आपली कालिंदी किती शहाणी न् समंजस !—अशा परिस्थितींत तिनें अजून एकदांहि कुरकूर केलेली नाहीं ! उलट आपल्याला सुखी करण्याकरितांच ही एकसारखी झटत असतें...

अनिलच्या मनोवृत्तींत पालट होण्यासारखा आणखी एक प्रसंग लवकरच घडून आला. कालिंदी मुंबईला गेल्यानंतर तिसऱ्या कीं चवथ्या दिवशींच तो घरोघर दूध पोंचवून परत येत होता.

त्याच वेळीं फिरायला निघालेले दोन तरुण विद्यार्थी त्याच वाटेनें चालले होते.

अनिलकडे पाहून एका विद्यार्थ्यानें आपल्या जोडीदाराला म्हटलें, " हे आपले महाराष्ट्राचे खंजकवि श्रीयुत पुलिनविहारी बरं का! "

" खंज-कवि ? " दुसऱ्यानें विचारलें.

" हो—लंगडे आहेत हे एका पायानें; " पहिल्यानें स्पष्टीकरण केलें, "—तेव्हां यांची बायकोच नेहमीं घरोघर दूध पोंचवते, अन् पैसे मिळविते."

" मग हे काय करतात ? "

" कविता ! "

असें भरीवपणें उच्चारून पहिला विद्यार्थी कुत्सितपणें हंसला. दुसऱ्यानेंहि त्याला सांथ केली.

अनिलला त्यांच्या या निर्लज्जपणाची विलक्षण चीड आली! आपल्या उत्कृष्ट कवितांपैकीं एकहि त्या विद्यार्थ्यांनी वाचलेली नसणार, आणि अर्थात् त्यांचें रसग्रहण करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं नसणार; पण ' दिसली कविता कीं कर टिंगल ' या अलिकडे बळावत चाललेल्या वृत्तीमुळेंच ते तसे बोलत आहेत—आणि त्याबद्दल व्यक्तिशः त्यांना दोष तो काय द्यायचा ? हा विचारसुद्धां अनिलच्या मनांत आला नाहीं. उलट, तिथल्या तिथें त्यांचे हात धरून, आपण त्यांच्यासारख्याच नादान देशबांधवांकरितां धडपडत असतां कसे लंगडे झालों याची त्या दोघांना चांगली जाणीव करून द्यावी असें त्याच्या मनांत आलें.

आणि त्यासाठीं त्यानें त्वेषानें आपली गति एकदम वाढवली. पण—

रस्त्यावरच्या एका अवसानघात करणाऱ्या दगडाला त्याचा अधू पाय अडखळला,—

आणि त्याच्या डोक्यावरची दुधाची चरवी कलंडून पडली! तिच्यांतील उ.लेसुरलें दूध रस्त्यावरील धुळींत पसरलें.

आणि ते बेजबाबदार विद्यार्थी असभ्यपणें हंसत कोपऱ्यावर वळून दिसेनासे झाले!!

त्या दिवशीं अनिलनें आपल्या मनाशीं पक्कें ठरविलें, कीं 'द्रव्यरूपानें कांहींच मोबदला न देणारी कविता—आणि ती सुद्धां असल्या अरसिकांच्याकरितां यापुढें मुळींच लिहायची नाहीं! इतके दिवस गमतीनें आणि नादिष्टपणें लिहिली तेवढी पुरे झाली!'

मुंबईत येऊन पोंचल्यानंतर, कालिंदीचा पहिला दीड दिवस कसा गेला, तें तिचें तिलाच माहित. बरेच दिवसांनी भेटलेल्या आपल्या बहिणीच्या आणि मैत्रिणीच्या गोड सहवासांत तो अल्प काळ जरी हास्यविनोदांत केव्हांच निघून गेला होता तरी कालिंदीला तो फार दीर्घ वाटला. कारण मुंबईला पोंचल्यानंतर शक्य तितक्या लवकर जी एक गोष्ट करायची तिनें ठरविली होती, ती करायला तिला अजून फुरसतच झाली नव्हती. पण अखेर आतां योग्य संधि आली होती.

ती गोष्ट म्हणजे, त्या बुद्धिस्पर्धामंडळाच्या व्यवस्थापकांची भेट घेणें. कारण या खेपेला तिला त्यांचें एक बक्षीस आलें होतें. स्पर्धेचा निकाल तिला कळवितांना व्यवस्थापकांनी लिहिलें होतें, "...अशा रीतीनें यशस्वी उमेदवारांत आपला क्रमांक तिसरा लागतो. या सुयशाबद्दल आम्ही आपलें मन:पूर्वक अभिनंदन करतों. यशस्वी उमेदवारांपैकीं पहिल्या कांहीं जणांच्या रकमा त्यांना गौरवपूर्वक देण्याचा एक समारंभ करण्याचें आम्हीं योजिलें आहे. प्रस्तुत समारंभास आपण प्रत्यक्ष हजर राहून आपली बक्षिसाची रक्कम (रु. १२०|-) घेऊन जावी, अशी आमची आपणास आग्रहाची विनंति आहे.

" आपण बरेच दिवसांपासून आमचीं कुट्टकें सोडवीत आलां आहांत. परंतु अनेक वेळां यश न मिळूनहि आपण आमच्या बुद्धिस्पर्धेंत भाग घेणें सोडलें नाहींत. आणि प्रस्तुत कुट्टकांत तर आपण अवघा एकच यत्न पाठवूनहि यशस्वी झालांत याबद्दल आम्ही आपलें पुनरपि अभिनंदन करतों..." वगैरे.

त्यानंतर त्यांनी समारंभाचें स्थळ काळ वगैरे माहिती दिली होती. ज्या मासिकांतून हीं ' कुट्टकें ' प्रसिद्ध होत, आणि अनिलच्या कविता ज्या मासिकांत प्रामुख्यानें झळकत, त्याच मासिकाच्या कार्यालयांत प्रस्तुत समारंभ व्हायचा होता.

परंतु समारंभाच्या ठरलेल्या दिवसांपूर्वीच एकदोन दिवस कालिंदी त्या बुद्धिस्पर्धेच्या व्यवस्थापकांना भेटूं इच्छित होती.

त्याप्रमाणें संधि मिळतांच ती त्यांच्या कचेरींत गेली आणि तिनें मनाशीं योजिल्याप्रमाणें तेथें सांगितलें, कीं "...समारंभाच्या दिवसांपर्यंत मला मुंबईत थांबणें शक्य नाहीं. वास्तविक मी माझी रक्कम मनीऑर्डरनेंच गांवीं मागवणार होतें; पण त्याचा तरी खर्च तुम्हाला कशाला ? आणि अनायासें मुंबईत मी आज आहेच; तर तुम्हांला फारसं गैरसोयीचं वाटत नसेल तर ती रक्कम मला अत्तांच द्या म्हणजे झालं..."

व्यवस्थापकांनाहि या तिच्या म्हणण्यांत वावगें असें कांहींच दिसलें नाहीं. त्यांनी तत्काळ कबुली दिली. आणि एकशेंवीस रुपयांच्या नोटा तिच्या स्वाधीन केल्या. पावतीवर सही करून कालिंदी उठली; पण लगेच कांहीं आठवल्यासारखें करून म्हणाली, " हों, विसरलेंच होतें मी. आत्तां एक महत्त्वाचं पत्र लिहून टाकलं पाहिजे मला.—घरीं गेलं तर टपालाची वेळ निघून जाईल, नाहीं कां ?—" असें म्हणत तिनें घड्याळाकडे पाहिलें.

" तसा टपालाला अजून अर्धा तास आहे अवकाश,—पण तुम्ही इथंच बसून लिहा, हवं तर." असें म्हणत व्यवस्थापक-

महाशयांनी ऑफिसचेच छापलेले नोटपेपर, लिफाफा वगैरे साहित्य तिच्यापुढें केलें.

कालिंदीचें पत्रलेखन अगदीं थोडक्यांत आटोपलें. तिनें लिहिलें होतें:—

" स. न. वि. वि.

आपण आजपर्यंत आमच्या मासिकासाठीं सुंदर सुंदर कविता लिहीत आला. त्याबद्दल आम्ही आपले सदैव आभारी आहोंत. आपल्या कविता आम्हांला एकाहून एक अधिक आवडल्या परंतु त्या वेळोवेळीं प्रसिद्ध करण्याखेरीज आम्ही आजपर्यंत कांहींच करूं शकलों नव्हतों. आतां आमच्या मासिकाची सांपत्तिक स्थिति बरीच सुधारली असल्यामुळें यापुढें आम्ही आमच्या लेखकांना मोबदला देण्याचें ठरविलें आहे. आपल्या यापूर्वींच्या साऱ्या लेखनाची थोडीफार तरी भरपाई व्हावी म्हणून सोबतचा मुशाहिरा पाठविला आहे. तो स्वीकृत करावा, अशीं विनंति आहे.

आमच्या मासिकावर आपला लोभ आहेच, तो वाढता राहावा..."

— असा पत्राचा शेवट करून कालिंदीनें खालीं ' संपादक ' अशी मोघम सही केली.

पाकिटावर तिनें अनिलचा पत्ता लिहिला आणि त्यांत तें पत्र घातलें. नंतर ती व्यवस्थापकांना म्हणाली,

" छे हो, हें पोस्टांत टाकण्यापूर्वीं मला एकदां घरीं गेलंच पाहिजे. आणखी एक कागद घालायचा आहे त्यांत. अन् तो राहिला आहे घरीं. "

" पहा, नाहीं तर आमच्या ऑफिसचं टपाल जायचंच आहे कीं पोस्टांत. "

" नको, पण तो घरीं राहिलेला कागद ह्या पत्रासोबत पाठवलाच पाहिजे. इलाज नाहीं कांहीं—अन् आतां इथं मी जास्त थांबलें तर टपालाची वेळहि निघून जाईल. जातें मीं. " असें म्हणून कालिंदीनें पुन्हां एकदां घड्याळाकडे पाहिलें, आणि व्यवस्थापकाचे आभार मानून ती लगबगीनें निघाली.

मात्र ती तेथून निघाली, ती घरीं न जातां पोस्ट ऑफिसांत गेली. तेथें तिनें आणखी एक कार्ड घेऊन तेंहि अनिललाच लिहून टाकलें. तिनें लिहिलें होतें, " मी उद्यां येथून निघत आहे. परंतु पुण्याहून पुढें मोटारनें येणार असल्यामुळें हें पत्र तुम्हांला मिळेल त्या दिवशीं – म्हणजे परवां – संध्याकाळीं मी तेथें पोंचेन. अनायासें तुम्हालाहि स्टेशनवर येण्याची दगदग पडणार नाहीं. कारण मी मोटारनें परस्पर गांवांतच येईन. "

तिनें तें कार्ड टपालपेटींत टाकलें. कांहीं वेळांपूर्वी लिहिलेलें तें दुसरें पत्र तिनें पुन्हां एकदां वाचून पाहिलें. नंतर बक्षीस म्हणून मिळालेल्या नोटांपैकीं शंभराची नोट तिनें व्यवस्थितपणें घडी करून पाकिटांत घातली, आणि पाकीट बंद करून तिनें पावती घेतली.

तीं घरीं जातांना मनाशीं म्हणत होती,—

' अनिल काय पण चकित होतील अगदीं ! अन् आपण घरीं गेल्यावर तर त्यांना जास्तच चकित करूं ! ! '

परंतु, नंदनपुरला परत येऊन पोंचतांच कालिंदी स्वतःच चकित झाली !

तिच्या अपेक्षेप्रमाणें अनिल तिला उल्हसित दिसण्याचें तर दूरच राहिलें; उलट तिला तो जरा खिन्नच आणि त्रासलेला दिसला. गेल्या पांचसहा दिवसांतले घरगुती कष्ट त्याला बरेच जाणवले

नो. मुक्ताहिरा...

असावेत. कांहीं किरकोळ प्रश्नोत्तरें करण्यापलीकडे तो तिच्याशीं अधिक बोललाहि नाहीं.

कालिंदीला मात्र राहवेना. अनिलला त्याच्या कवितांचा मोबदला म्हणून पैसे पाठवून चकित करण्याच्या आपल्या योजनेचें पुढें काय झालें हें जाणण्याची उत्सुकता तिला स्वस्थ बसूं देईना. अखेर तिनें त्याच्या एका प्रेमगीतांतील कांहीं ओळी गुणगुणत मोठ्या कौशल्यानें तो विषय काढला.

" मी गेल्यापासून कांहीं लिहिलंत कां नवीन ? " तिनें सुरवात केली.

यावर अनिलनें कालिंदीच्या गैरहजेरींत घडलेले एकेक प्रसंग तिला सांगितले, आणि तो म्हणाला, " लोकांची रसग्रहणशक्ति जोंपर्यंत ह्या लायकीची आहे, अन् आपल्या संसाराला प्रत्यक्ष मदत होण्याजोगा मोबदला जोंपर्यंत कवितेवर मिळत नाहीं, तोंपर्यंत आपल्या प्रतिभेला शिणवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. " असें म्हणून तो क्षणभर स्तब्ध राहिला.

कालिंदी त्याच्याकडे पाहात राहिली.

जरा वेळानें तो पुन्हां म्हणाला, " काली, ह्यापुढें कविता लिहायच्या नाहींत असं मीं ठरवलं आहे ! "

असें म्हणून त्यानें एक उसासा टाकला. आपल्या स्वभावा-विरुद्ध निश्चय करतांना त्याच्या मनाला एक प्रकारच्या सूक्ष्म यातना होत होत्या.

" असा कां बरं त्रास करून घेतां जिवाला ? " कालिंदी सहानुभूतिपूर्वक स्वरांत म्हणाली, " मुंबईच्या संपादकांचं अलीकडे कांहीं उत्तेजनाचं पत्र नाहीं वाटतं आलं ? "

" हंः ! अशा पत्रांना अन् त्यांतल्या शाब्दिक स्तुतीला किंमत द्यायची नाहीं असंहि मीं यापुढं ठरवलं आहे ! " असें तिरस्कार-पूर्वक म्हणत तो उठला, आणि त्यानें खोलीच्या उघड्या दाराची कोंपऱ्याकडील फळी मिटल्यासारखी केली. दाराच्या झिजलेल्या

बिजागिरींचा नेहमींप्रमाणें आवाज झाला तो कालिंदीला अगदीं नकोसा वाटला. तिचें अंग किंचित् शहारल्यासारखें झालें.

इतका वेळ दाराआड लपलेल्या, आणि आतां उघड्या झालेल्या त्या भिंतींच्या कोंपऱ्याकडे बोट दाखवीत अनिल म्हणाला,

" हें पहा, आजच सकाळीं आलं हें पत्र त्या संपादकाकडून. पण तें मीं फोडूनसुद्धां पाहिलं नाहीं;— फाडून मात्र टाकलं ! "

तें ऐकून कालिंदीला काय वाटलें हें तिचें तिलाच कांहीं वेळ कळलें नाहीं ! झालेला प्रकार इष्ट कीं अनिष्ट होता, आपण करायला गेलों एक आणि झालें भलतेंच– याला जबाबदार कोण, हा सारा प्रकार अनिलला कसा समजावून सांगावा, आपण कोडीं सोडवून पैसे मिळवल्याचें अनिलला त्याच्या अशा मनःस्थितींत रुचेल कीं नाहीं, अशा अनेक प्रश्नांनीं कालिंदीच्या मनांत एकाच वेळीं गोंधळ उडवून दिला ! ती एकदां अनिलकडे आणि एकदां त्या कोंपऱ्यांत पडलेल्या त्या पत्रांच्या निळ्या तुकड्यांकडे पाहात राहिली.

अखेर तिनें मनाचा धीर केला, आणि म्हटलें,

" तुम्हाला एक गोष्ट सांगितली तर रागावणार नाहीं ना ? "

तिच्या त्या मृदु शब्दांनीं, तिच्या मनांत कसलें तरी शल्य बोंचत असावें असें अनिलला वाटलें. तो चट्कन् म्हणाला,

" काली, वेडे, तुझ्या गोष्टी ऐकून मी कधीं रागावलों आहे कां आजपर्यंत ? "

" मग गेले पांचसहा दिवस माझे शब्द ऐकायला मिळाले नाहींत, म्हणून जगावर इतके रागावला होता कीं काय तरी ? "

तशा मनःस्थितींतहि अनिलला हंसूं आल्यावांचून राहिलें नाहीं. आणि त्याचा जगावरील रागहि एकाएकीं नाहींसा झाल्यासारखें त्याला वाटलें. ' कालिंदीच्या म्हणण्यांत तथ्य आहे तर ! ' असेंच तो स्वतःशीं म्हणाला.

" ऐकाच तर माझ्या शब्दांचीं करामत!" असें म्हणून कालिंदीनें आपल्याला बुद्धिस्पर्धेत मिळालेल्या बक्षिसाची हकीकत सांगितली. आणि त्याला चकित करण्यासाठीं त्याच्यापासून ही बातमी काहीं काळपर्यंत आपण लपवून कां ठेवली, आणि त्याचा परिणाम मात्र भलताच कसा झाला हेंहि तिनें त्याला सांगितलें.

एकेक घटना ऐकून अनिलचें मन अधिकाधिक प्रसन्न होत गेलें. शेवटीं, कालिंदीनें त्या फाटक्या पाकिटाचे तुकडे गोळा करून त्यांतून काढलेल्या त्या शंभर रुपयांच्या नोटेचे तुकडे घेत हंसत-हंसत तो थट्टेनें तिला म्हणाला,

" जाऊं दे! कशाला गोळा केलेस हे तुकडे?— असले कोडीं सोडवून मिळालेले पैसे आपल्याला उपयोगीं पडायचे नाहींत असंच मी नव्हतो कां म्हणत?"

कालिंदीहि अधिक कांहीं बोलली नाहीं. तिनें शिकस्तीचे प्रयत्न करूनसुद्धां, अखेर— अनपेक्षितपणें कां होईना— अनिलचें म्हणणें खरें ठरलें होतें. 'एकाएकीं मिळालेला पैसा एकाएकीं जायचाच हा अनिलचा सिद्धांतच एकूण खरा तर?' असा ती आपल्या मनाशीं विचार करत होती. तोंच अनिल म्हणाला,

" काय ग, तुला बक्षीस मिळाल्याबद्दल आलेलं तें पत्र माझ्या नजरेंतून कसं सुटलं?"

" वा! तुम्ही तर आपली नवी छापून आलेली कविता वाचण्याच्या नादांत त्या दिवशीं बाकीचीं पत्रं विसरलांत! अन् तुम्ही विचारलंत तेव्हां मीं नुसतं पमाचंच पत्र दाखवलं तुम्हाला! म्हटलं आयती मुंबईला जायची संधि मिळते आहे! लगेच मीं तुम्हांला तसं चकित करायचा मनाशीं बेत केला!..."

" पण आपली चांगली कविता छापलेली पहातांना इतर गोष्टींचा विसर पडणं साहजिक आहे, काली! कोडीं सोडवून क्वचित् मिळतात

तसे पैसे जरी मिळाले नाहींत त्यावर, तरी कीर्ति मिळते ती केवढी! आपलं नांव छापलेलं बघण्यांत काय आनंद असतो हें तुला कसं कळणार ? इंग्लंड-अमेरिकेंतले कित्येक श्रीमंत लोक आपलं नांव कांहींहि करून छापून यावं म्हणून पगार देऊन आपापल्या पदरीं एकेक 'प्रेस-एजंट' बाळगतात, ते उगीच नाहीं !"

"हं ऽऽ! छापलेल्या नांवांच्या गोष्टी नका सांगूं मला–" कालिंदी मान वेळावीत म्हणाली, "लग्न-मुंजीच्या आमंत्रणपत्रिकांच्या खालीं काय कमी लोकांचीं नावं छापलेलीं असतात ?"

यावर अनिल मनापासून हंसला.

कालिंदी पुढें म्हणाली, "पण तुम्ही म्हणतां तसला आनंदसुद्धां मीं उपभोगला आहे !"

"केव्हां ?" अनिल आश्चर्यचकित होऊन म्हणाला.

"अगदीं अलीकडे— फार कशाला, अगदीं तुमच्या बरोबरच म्हणा ना !"

"म्हणजे ?"

"मग सांगतें काय मी मघापासून !– आपली कविता वाचायच्या नादांत तुम्ही आणखीहि एक गोष्ट विसरलांत– अहो, तुमचं नांव ज्या अंकांत छापलं आहे त्याच अंकांत माझंहि नांव आलं आहे."

"पाहूं वरं"– असें म्हणून अनिलनें तो अंक काढला.

कालिंदीनें, कविता ज्या पानावर छापली होती, तें पान उघडलें. समोरच बुद्धिस्पर्धामंडळाच्या कुट्टकांचा निकाल छापलेला होता, त्यांत कालिंदीचें नांव होतें. अनिलला तिचें यशस्वी नांव पाहून नव्यानें कौतुक वाटलें.

त्यानें चट्कन् तिच्याकडे पाहिलें. तीहि प्रेमळपणें त्याच्याकडे पाहात होती. त्याचा डावा हात सहजच तिच्या पाठीमागून गेला, आणि तिच्या कमरेला त्याचा विळखा बसला.

डाव्या हाताच्या हालचालीमुळें, त्याच्या उजव्या हातांतील मासिकाचा तो अंक आपोआप अर्धवट मिटल्यासारखा झाला, आणि त्या दोघांचीं छापील नावें देखील एकमेकांना बिलगलीं....

मराठी ग्रंथ
वाचनालय

# वसुधावहिनी

दादाच्या लग्नाला मी हजर राहूं शकलों नाहीं; त्यामुळें दादाचा किती विरस झाला! तरी त्याच्या लग्नानंतर लवकरच मला घरीं जायला सवड झाली म्हणून त्यांतल्या त्यांत त्यानें समाधान मानून घेतलं. आणि ह्या खेपेला मी घरीं जाऊन पाहतों तों दादाच्या वागणुकींत, त्याच्या प्रत्येक बारिक सारिक कृतींत अपूर्व उत्साह दिसत होता. त्याच्या आयुष्यांत नवीनच आलेल्या व्यक्तीनें ही क्रांति केली असावी असा मीं तर्क केला, आणि त्या व्यक्तीची ओळख करून घ्यायला मी उत्सुक झालों.

तरी माझ्या मनाचा एक कोंपरा आंतून मला लगाम घालूं पाहात होता. तो म्हणे "जाऊं दे ना! कशाला पाहिजे आपल्याला? एकदां ठेंच लागूनहि शहाणपण येत नाहीं ना?" तोंच मनाचा दुसरा कोंपरा म्हणे, "हः! नसत्या ठिकाणीं असला विवेक करत बसणं म्हणजे शुद्ध आचरटपणा! दुधानं तोंड भाजलं म्हणून का ताक फुंकून प्यायचं?"

यांवर पुन्हां तो मनाचा पहिला कोंपरा औपरोधिक रीतीनें हंसून म्हणे, " खरं आहे, पटतं मला हें अगदीं!— नकोच तसं मुळीं— आधीं तें दूध आहे, मग तें गरम आहे, अशी खात्री पटल्याशिवाय उगीच कां फुंकून प्यायचं ? "

अशा रीतीनें माझें मन हेलकावे खात होतें. दुपारीं बाहेरच्या खोलींत दादाशीं गप्पा मारत मी बसलों होतों. एका ट्रेमध्यें तीन ग्लास घेऊन दादाची बायको बाहेर आली. शेजारचें टीपॉय तिनें पायानेंच आमच्याकडे सरकवलें, ट्रेमधील ग्लास त्यावर व्यवस्थित-पणें मांडले, आणि ट्रे भिंतीला टेकून ठेवलें. मग आणखी एक खुर्ची टीपॉयकडे ओढीत तीवर बसतां बसतां ती म्हणाली, " आज किनई उन्हाळा फार जाणवतोय्; म्हणून चहा नाहीं केला. लिंबाचं सरबत केलंय्. हवा तर करीन पुन्हां पांच-सहा वाजतां. चालेल ना ?"

" न चालायला काय झालं ? अशा डबल प्रोग्रॅमला कुणी आडकाठी घेतलीय् ? " दादा हंसत हंसत म्हणाला, " बाकी आतां सरबत आणलंस, हें खरोखरच छान झालं ! "

नंतर कांहीं वेळ असाच स्तब्धतेंत गेला.

" ह्या तुझ्या कुमुदिनीवहिनी, अन् हे तुझे किशोरभाऊजी— " आळीपाळीनें आमच्याकडे पाहात दादा म्हणाला. आम्हां तिघांच्याहि मुखांवर हास्य झळकत होतें.

त्यांचा स्वभाव मला भारीच आवडला. अवघ्या आठ दिवसांत आमची चांगलीच गट्टी जमली.

" भाऊजी,— " इतकेंच म्हणून त्या जरा थांबल्या. त्यांना पुढें काय बोलायचें होतें इकडे लक्ष न देतां मी मधेंच म्हणालों,

" का हो, तुम्हा माहेरीं तुमचा धाकटा भाऊ काय हाक मारतो? "

" कुमूताई ! कां ? — "

" कांहीं नाहीं. मीही आतां तुम्हाला तसंच म्हणायला लागणार आहे. "

" माझी मुळींच हरकत नाहीं, " त्या जरा गोंधळून म्हणाल्या, " पण का हो, ' वहिनी ' म्हणायला लाजतां ? "

" खरं सागूं कां कुमुताई, मला भाऊजी म्हणून हाक मारलीत कीं मला मागच्या एका वहिनींची आठवण होते. त्यामुळेंच आज अशी पाळी आलीय् कीं मला माझ्या सख्ख्या वहिनींना ' वहिनी ' म्हणायची सोय उरली नाहीं ! तुम्हीहि आतां असंच करा — मला माझ्या नांवानंच हांक मारा— "

" हो पण, तुमच्या मागच्या वहिनींची इतकी आठवण होते म्हणजे कशी होते तें तरी सांगा कीं ! "

" सांगत नाहीं; वाचायलाच देतों. " असें म्हणून मी टेबलाचा खण उघडूं लागलों.

तेवढ्यांतही त्यांना मनमोकळा विनोद केल्याशिवाय राहवेना. त्या म्हणाल्या, " माझं हें लग्न ठरल्यावर मला किती आनंद झाला म्हणून सांगूं. ! "

कांहींतरी नवीन ऐकायला मिळणार म्हणून मी म्हणालों, " खरंच ? "

" हं, कारण असं कीं, तुम्ही माझे भाऊजी—चुकलें, दीर म्हणून तुमची प्रत्येक लघुकथा छापून यायच्या आधीं मला वाचायला मिळणार ! "

यावर मी मनःपूर्वक हंसलों.

त्या पुढें म्हणतात, " कसलेले लेखक म्हणे कल्पकतेंतूनच सत्याचा आभास उत्पन्न करतात. तेव्हां तुम्ही जें वाचायला देणार, त्यांतलं कल्पकतेचं कमिशन किती जायचं तें आधींच सांगून ठेवा; म्हणजे सत्याची मूळ किंमत ठरवायला बरं— "

" कल्पना नव्हे हं. अगदीं शंभर टक्के सत्य ! " असें म्हणून मी त्यांच्या हातांत कांहीं कागद दिले. त्यांनी वाचायला सुरवात केली.

रंगून शहरांतील एकमेकांशीं काटकोन करणाऱ्या इतर सर्व रस्त्यांप्रमाणें बत्तीस नंबरचा रस्ता आणि डल्हाउसी स्ट्रीट ह्यांचा काटकोन ज्या कोंपऱ्यावर होतो तेथील एका इमारतींत वरच्या मजल्यावर वसुधा रहात होती. आणि मी ? मी रहात होतों पार दूर—प्रोम रोडवर कोकाइन तलावाच्या अलीकडे म्हणजे हल्लीं जेथें रंगून युनिव्हर्सिटीची नवी वसाहत झाली आहे, तेथील त्यावेळच्या प्राय: निर्जन भागांत आमचें घर होतें.

आमचीं रहाण्याचीं ठिकाणें जरी इतकीं दूर होतीं तरी आमची नेहमीं एकमेकांकडे ये-जा चालू असे. कारण आमच्या वडिलांपासून माझ्यापर्यंत आणि वसुधेच्या वडिलांपासून तिच्यापर्यंत दोन्हीं कुटुंबातलें लोक एकमेकांच्या पूर्ण परिचयाचे झाले होते; आणि परप्रांतांत गेल्यावर केवळ आपण सर्व महाराष्ट्रीय आहोंत म्हणून, अगदीं पूर्वपरिचयविहीन अशा दोन कुटुंबांची मैत्री व्हावी हें अगदीं साहजिक आहे.

आठवड्यांतून दोन-तीन वेळां वसुधा आमच्याकडे व तितक्याच वेळां मी त्यांच्या घरीं जात येत असूं. ती आमच्याकडे आली कीं आमचें फिरायला जायचें ठिकाण ठरलेलें. तें म्हणजे कोकाइन लेक. मी तिच्याकडे गेल्यावर आम्ही सूले पगोडा ओलांडून फायूच् स्केअरमधल्या हिरवळीवर जाऊन बसत असूं. श्वेडगौं पगोडावर तर आमची महिन्यांतून एखादी तरी खेप व्हायचीच. त्या वेळचें तें निर्व्याज–सुंदर आयुष्य आठवलें कीं अजून मनावर एक प्रकारची विपण्णता येते. काय तें सुंदर शहर, आणि काय तिथलें तें रम्य बालपण... आणि आजचें आयुष्य त्याच्याशीं किती विसंगत !—

तें रम्य बालपण मी सात-आठ वर्षें उपभोगल्यावर शिक्षणाकरितां म्हणून वडिलांनी मला इकडे पाठविलें.

बोटीवर पाय ठेवतांना मला रडूं आवरेना. वसुधा माझ्यापेक्षां पांच सहा वर्षांनी मोठी, त्यामुळें ती अधिक समजूतदार होती.

"असं काय करतोस रे, किशोर ? ती माझ्या खांद्यावर प्रेमळपणें हात ठेवून म्हणाली, "कालच ना तू म्हणालास कीं हिंदुस्थानांत गेल्यावर मी तुला तिथलीं चांगलीं चांगलीं चित्रं पाठवीन म्हणून ? —मग तू जर असा सारखा रडायला लागलास तर मला कशीं चित्रं पाठवणार ? —मला विसरणार का तू ?"

"अ हं;" मी डोळे पुसून म्हणालों, "तुला विसरतां यायचं नाहीं म्हणून तर रडतोंय् !"

तितक्या लहान वयांत मला कुठून तें वाक्य सुचलें कुणास ठाऊक ! त्याचा परिणामहि विपरीत झाला. इतका वेळ माझी समजूत घालणाऱ्या वसुधेच्याहि पापण्या कांठोकांठ भरून आल्या.

माझ्या राहण्याची सोय माझ्या मावसभावाकडे केली होती. माझें पालकत्वहि त्यांच्याकडेच होतें. त्यांचें नांव विनायकराव. ते त्यावेळीं कॉलेजमध्यें शिकत होते.

त्यांच्या हाताखालीं होतों तेव्हां त्यांनीं मला फारच चांगल्या तऱ्हेनें वागविलें. इतकें कीं त्यांच्याबद्दल माझ्या मनांत आदर आणि प्रेम हीं दोन्ही सारख्याच प्रमाणांत दृढमूल झालीं.

शाळेच्या व्यतिरिक्त माझा वेळ त्यांच्या सहवासांत केव्हां निघून जाई हें कळत नसे. आणि शाळेंत तरी काय ? रंगूनला कधीं पाहिल्या नव्हत्या इतक्या मराठी बोलणाऱ्या मुलांच्या झुंडीच्या झुंडी, —त्यांतलेच रोज नवे नवे मिळणारे सोबती,—त्या प्रत्येकाचें कुतूहल पुरवितां पुरवितां ब्रह्मदेशाविषयीं साभिमान सांगितलेल्या माहितीची

रोजची पुनरावृत्ति–ह्या सर्व गोष्टींपासून मीं आनंदाची लूट चालविली होती.

बहुतेक प्रत्येकजण एक ठराविक प्रश्न विचारी: “ काय रे, तुमच्या ब्रह्मदेशांत म्हणे दुकानावर बायका बसतात, अन् नवरा घरीं स्वैपाक करतो ? खरं का हें ?”

“ छे रे ! आपल्या भूगोलाच्या पुस्तकांत कांहींतरी लिहिलंय् ” अशी सुरवात करून त्या प्रश्नाचें उत्तर ब्रह्मदेशांतील स्त्रीस्वातंत्र्य व समान हक्क ह्या प्रश्नापर्यंत मी थेट नेऊन भिडवीत असे. अर्थात् त्यावेळीं असलेल्या ज्ञानाच्या तुटपुंज्या भांडवलावर हा सर्व व्यापार चाले.

आणखी कांहीं मजेदार प्रश्न येत ते असे. “ तिकडे बायका-पुरुषांचा पोषाख सारखाच असतो ना ? ” किंवा “ तिकडच्या घरांना तळमजलाच नसतो ! असं कसं होईल रे ? ”

त्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें देत मी आपला स्वतःचा आणि त्यांचा वेळ मजेंत घालवत असे. त्या नव्या सृष्टींत मन रमल्यामुळें वसुधेची आठवण हळू हळू फिकी होत चालली होती.

“ आपल्या इकडचे आणखी किती लोक तिकडे आहेत ? ” असाच प्रश्न कचित् कुणी केला तर मला वसुधेची आठवण होई. पण ती तेवढ्या पुरतीच. माझें मन रिझवायला मुलांचे इतर खेळ वगैरे तयार असतच.

लहानपणीं एकमेकांच्या आठवणी अशाच भर्कन् विरून जात असतात.

आणि पुष्कळवेळां असेंहि होतें कीं, लहानपणच्या ओळखीच्या परंतु मध्यंतरीं संबंध तुटलेल्या स्नेह्यांच्या मोठेपणीं आपल्याशीं गांठीं पडल्या कीं प्रथम कांहीं दिवस तरी आपण एकमेकांकडे जिज्ञासा, प्रेम, संकोच अशा विविध वृत्तींनीं मिश्रित अशा दृष्टीनें पाहात असतों.

आज इतक्या वर्षानंतर वसुधा आणि मी परस्परांकडे तशा दृष्टीनें पहात होतों.

वसुधेला माझ्याविषयीं काय वाटलें असेल कुणास ठाऊक, परंतु मला मात्र असें आढळून आलें कीं तिचा तो पूर्वीचा हौशी, खेळकर, प्रेमळ आणि मनमिळाऊ स्वभाव कायम होता.

" किती वर्षांनी आपली भेट झाली, नाहीं ? " ती सानंद म्हणाली.

" अन् ती सुद्धां किती जवळच्या नात्यानं ! " मी म्हणालों.

खरें होतें तें. आमची भेट झाली — आणि तीसुद्धां अनपेक्षितपणें — याला मध्यंतरींच्या घटना कारण होत्या.

विनायकराव एम्. एस्सी. होऊन एकदोन वर्षं नोकरी शोधत होते. मी माझ्या कॉलेजच्या शिक्षणाकरितां मुंबईला एकटाच राहिलों होतो. पहिल्या वर्षी अभ्यास फारसा नव्हता. आणि माझ्यावर नियंत्रण घालायला कोणीहि नव्हतें, तेव्हां इतरांना 'नसते उद्योग' वाटण्याचा संभव अशा कायदेभंगाच्या चळवळींत मी भाग घेऊं लागलों.

आणि एक दिवस बेकायदा मीठ हेतुपुरःसर तयार केल्याच्या आरोपावरून माझ्या व्यवसाय बंधूंच्या बरोबर मीहि येरवड्याची वाट चालूं लागलों.

सजा भोगून मी नुकताच मुंबईला परत आलों होतों.

विनायकराव माझ्याकडे आले व म्हणाले, " आजच 'नवाकाळ' मधें सुटलेल्या लोकांचीं नांवं वाचलीं. त्यांत तुझं होतं. म्हणून लगेच आलों. "

मग इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर ते म्हणतात, " चल आतां आमच्याकडे. इथं बसून तरी काय करणार ?—तुझ्या वहिनीची न् तुझी ओळख करून देतों. "

यावर मी हंसलों.

मी तुरुंगांत असतां विनायकरावांना मुंबईस नोकरी मिळाली होती. ते Chemical Analyser to the Govt. च्या हाताखालीं काम करत होते. नुकतेंच लग्न करून त्यांनीं खारला बिऱ्हाड केलें होतें.

त्यांच्या विनंतीला मोठ्या नाखुषीनें नकार देत मीं म्हटलें, "आजच नको; पुन्हां केव्हां तरी येईन. सकाळींच आलोंय् मी, अजून खोलीबिली लावायचीच, पाहा कसा पसारा झालाय तो!"

मोठ्या मुष्किलीनें ते एकटेच परत गेले.

आणखी दोन-तीन दिवसांनीं ते मला आपल्या घरीं घेऊन जायला पुन्हां आले. त्या दिवशींहि माझा नाइलाज झाला.

"दुसरीकडे एंगेजमेंट देऊन ठेवलीय् हो!" मी काकुळतीला येऊन म्हणालों.

"अतां काय, तुम्हीं 'दे. भ.' झालां आहांत! तुम्हाला कसा वेळ होणार?– तें कांहीं नाहीं, आलंच पाहिजे तुला!"

"येईन. मी कुठं नाहीं म्हणतोंय्? उद्याच्या पुढचा कुठलाहि दिवस ठरवून मला सांगा. मी दुसऱ्या कुणाच्याहि एंगेजमेंट्स् घेणार नाहीं–"

"तसं मला नक्की नाहीं रे सांगतां यायचं. वाटेल तेव्हां कामावर हजर व्हावं लागतं. अन् त्याला कारण तुमच्यासारखे 'देशभक्त'" इतकें म्हणून ते हंसले, आणि पुढें म्हणतात, 'बेटे रोज नवीन स्फोटक द्रव्यं तयार करतात, अन् ॲनलायझिंगचं काम येतं आमच्यावर!–त्यांचे कुठं मुहूर्त ठरलेले असतात कीं अमक्याच दिवशीं तीं तयार करायचीं अन् अमक्याच दिवशीं पोलीसच्या हातांत सांपडायचं? म्हणून म्हणतो बाबा, नक्की दिवस मला नाहीं सांगत यायचा. पुढच्या खेपेला मी इथं आलों म्हणजे कांहीं एक ऐकून घेणार नाहीं!"

त्यांच्या आग्रहाला प्रत्युत्तर करायला मला वावच नव्हता.

आणि पुढच्या खेपेला, त्यांनीं आल्याबरोबर "चलो!" असा एकदम मार्शल लॉ पुकारला.

अर्थात् त्यांच्याबरोबर जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. शिवाय, दुसऱ्या दिवशींच्या बुलेटिनकरितां मजकूर तर मीं दुपारींच लिहून दिला होता. सायक्लोस्टाइलवर त्याच्या प्रती फक्त काढायच्या होत्या. तेव्हां मीं माझ्या कर्मसहोदरांना टेलिफोन केला कीं, माझा हात मुरगळला आहे......वगैरे.

सत्यासाठीं झुंजणाऱ्या महात्माजींचा अनुयायी मी! पण त्यावेळीं सोयिस्करपणें खोटें बोललों, आणि विनायकरावांबरोबर निघालों.

त्यांच्या घरीं गेल्यावर प्रथमदर्शनींच मीं ओळखलें कीं त्यांची बायको दुसरी तिसरी कोणी नसून माझी बालमैत्रीण वसुधाच होती! तेव्हां आम्हाला एकमेकांना 'इंट्रोड्यूस' करून द्यायचा विनायकरावांचा डाव फसला! आमची पूर्वींची ओळख होती हें त्यांना वसुधेकडूनच समजलें होतें. पण मी तिला ओळखूं शकतों कीं नाहीं हें पाहायला म्हणून त्या दोघांनीं तशी युक्ति केली होती.

मी वसुधेला म्हटलें, "मी तुला विसरलों असेन अशी तुला शंका आली. पण एका दृष्टीनं मी खरोखरच आपली पूर्वींची मैत्री विसरणार आहे. ह्या नव्या नात्याप्रमाणें मी तुला 'वहिनी' म्हणेन – अन् वहिनी, तुम्ही सुद्धां..."

"अन् भाउजी, तुम्हीसुद्धां आतां मोठे झालांत; तेव्हा तुम्हांला 'किशोर' म्हटलेलं शोभायचं नाहीं!"

आणि वसुधावहिनींच्याकडे माझी आठवड्यांतून एक तरी खेप होऊं लागली! प्रथम प्रथम तर मी खारला गेलों कीं दरखेपेस आमच्या संभाषणांत असा कांहीं ठराविक भाग यायचाच :

" किती वर्षांनीं आपली भेट झाली, नाहीं ?" त्या सानंद म्हणत.

" अन् तीहि किती जवळच्या नात्यानं !" मीहि म्हणे.

आणि आमच्या बोलण्याच्या ओघांत आमच्या लहानपणच्या रंगूनच्या आठवणी तरी किती निघत ! एकदां असाच एक प्रसंग आम्हाला आठवला.

मी राहात होतों त्या घराच्या खालच्या मजल्यावर एक मद्रासी म्हातारा राहात होता. त्याच्या मुलाची समोरच्या ब्रह्मी कुटुंबांत चांगली मैत्री झाली. आणि तो ब्रह्मी गृहस्थ कामावर गेल्यावर दुपारीं हा मद्रासी मुलगा त्याच्या बायकोशीं गप्पा मारीत बसायचा आणि तिच्याजवळ ब्रह्मी भाषा शिकायचा. एकदां म्हाताऱ्या व्यंकटराव अय्यरच्या कानांवर ही गोष्ट गेली. त्यानें सुब्रमणीला— त्या तरुण पोराला—एकदम झोडपायला सुरवात केली ! सुब्रमणीची आई बिचारी जानकीअम्माळ् आपल्या नवऱ्याचा जमदग्नि-अवतार पाहून घाबरली आणि " अयोयो पावम् !" करीत बाहेर आली. समोरचा मांव् जी — त्या ब्रह्मी बाईचा नवरा व मा शीं — खुद्द ती बाई व्यंकट अय्यरची समजूत घालायला धावून आलीं पण ' अमॅले— फया फया !' म्हणून तिनें कानांवर हात ठेवले. तेवढ्यांत ' अफोजी मत मारो ! मत मारो !' म्हणत तिच्या नवऱ्यानें सुब्रमणीला सोडवलें सुद्धां !

" ते लोक तसे उदारवृत्तीचे असतात, " मांव् जी ची आठवण होऊन मी गंभीरपणें म्हणालों.

" तें तर झालंच, " वसुधावहिनी म्हणाल्या, " पण ह्या म्हाताऱ्याला लगेच त्याचा एवढा वाईट अर्थ घ्यायला काय झालं ? आपलंच मन पापी; त्यावरनं दुसऱ्यांची पारख करायची सवय !"

अशाच आणखी किती तरी आठवणी...

अशा रीतीनें वर्ष-दीड-वर्षाचा अवधि झर्रकन् निघून गेला होता. अलीकडे वहिनींची आनंदी वृत्ति हळुहळू मावळत चालली

होती. केवळ एक वर्षांच्या काळांत त्यांचें संसारसौख्य लोपून जावें, असें काय घडलें होतें ह्याची मला कल्पनाहि करतां येईना. तरीपण आपलें औदास्य त्या माझ्यापासून शक्य तितकें दडवून ठेवायचा प्रयत्न करीत, याचेंच मला वाईट वाटे.

असाच एकदां संध्याकाळचा मी त्यांच्या घरीं गेलों होतों. विनायकराव कुठें तरी बाहेर गेले होते.

दिवेलागणी झाल्यावर जरा वेळानें वहिनी म्हणाल्या, "चला, जेवून घेऊंया आपण."

"अन् विनायकराव?" मीं विचारलें.

"माझ्यासाठीं थांबूं नको म्हणून सांगितलंय् त्यांनीं!" हे शब्द ज्या स्वरांत त्यांनीं उच्चारले त्यांत त्यांच्या हृदयाला पडलेलीं कांहीं घरें दिसून आलीं.

पण लगेच सावरून घेण्याच्या उद्देशानें त्या म्हणाल्या, "तुम्हाला माहीतच्च आहे त्याचं काम. केव्हां निघेल न् किती वेळ चालेल तें कांहीं सांगतां येत नाहीं."

मीहि मग अधिक कांहीं बोललों नाहीं.

जेवण झाल्यावर त्या म्हणाल्या, "भाउजी, आज राहा ना इथंच! सकाळींच जा झालं परत. कारण आज आहे शनिवार– ह्यांना फार काम पडलं तर घरीं न येता परस्पर जातील सभेला."

"कसली सभा?"

"अहो तें कांहीं विचारूं नका! इथं एक ज्योतिर्मंडळ आहे. दर शनिवारीं सभा असते त्याची. रात्रीं उशीर होतो यायला. मला बाई करमत नाहीं. अन् भीतिहि वाटते. – खरंच, राहतां का सोबतीला?"

एरवींहि मीं नाहीं म्हटलें नसतें. तशांत आज त्यांची मनःस्थिति व्यथित दिसली. मीं नाहीं म्हणणें शक्यच नव्हतें!

आज आडसर भंगला होता – धरण फुटलें होतें ! इतके दिवस थोपवून धरलेला त्यांच्या दुःखाचा प्रचंड लोट आज दुथडी वाहूं लागला होता ! मी सहानुभूतिपूर्वक ऐकत होतों.

“ आहो, किती सांगू न् किती नाहीं ! वाटेल तेव्हां जातात, वाटेल तेव्हां येतात. जेवाखायलासुद्धां धड फुरसत नसते कधीं ! ”

“ ह्यांची नोकरीच अशी विचित्र पडली ! ” मी म्हणालों.

“ त्याचं कांहीं विशेष नाहीं हो ! नोकरी कशीहि असली, तरी काय चोवीस तास बांधलेला नसतो मनुष्य. बरं लहर लागली म्हणजे घरीं हवा तितका वेळ काढतात. पण जेव्हां पहावं तेव्हां तीं मेलीं ज्योतिषाचीं पुस्तकं हातांत. माझ्याशीं दोन शब्दसुद्धां बोलायला नकोत ह्यांना ! कुठं गेला पूर्वीचा तो स्वभाव कुणास ठाऊक ? अलीकडे ज्योतिषाचा नाद लागल्यापासनं हें अस्सं चाललंय्. आतां त्या ज्योतिर्मंडळाचंच पाहा ना. सभा असते आठवडयांतनं एकदां. पण ह्यांचं तिथं जाणं जवळ जवळ रोजचं ठरलेलं. – तुम्हीच सांगा आतां, असंच जर पुरुष वागायला लागले तर — तर बायकांनीं करायचं तरी काय ? सारखी ती अमक्याची कुंडली आण, तमक्याचा हात पाहा ! अमक्याला गृहसूख किती, तमक्याचं कुटुंबसौख्य वाढायला त्यानं कोणत्या वारीं उपास केले पाहिजेत, ह्याच्या उठाठेवी ह्यांना ! अन् स्वतःच्या घरचा विचार कुणी करायचा ?...

“ कधीं फिरायला घेऊन जाणं नाहीं, का कधीं सिनेमाला चला म्हटलं तर तें नाहीं ! – मला बाई वीट येतो अगदीं स्वस्थ बसायचा ! वेळ जातां म्हणून जात नाहीं.”

“ तुम्ही आलांत म्हणजे तेवढयापुरता विरंगुळा वाटतो. पण भाउजी, तुम्ही गेलांत रे गेलांत कीं झालं माझं कुढणं सुरू ! एकेकदां वाटतं कीं तीं सगळीं ज्योतिषाचीं पुस्तकं घ्यावीत, अन् द्यावी काडी लावून. पण हें बोलणार कुणाजवळ ?— सूर्यानं भाजलं, पावसानं भिजवलं, तर दाद कुणाजवळ मागायची ? ”

त्यांनी आपल्या डोळ्याला पदर लावला. नकळत मींहि आपल्या डोळ्याला हातरुमाल लावला. तरी माझ्या येण्यामुळें त्यांना एक-प्रकारचा विरंगुळा वाटतो हें ऐकून मला थोडेंबहुत समाधान झाल्याशिवाय राहिलें नाहीं.

आणि तसा विरंगुळा त्यांना वरचेवर मिळावा ह्मणून मीहि मग जवळ जवळ रोज त्यांच्याकडे जाऊं लागलों.

मी गेलों म्हणजे विनायकराव कधीं घरीं असत तर कधीं नसत. आणि असले तरी आपलें डोकें नवाथ्यांच्या 'जातकां'त नाहीं– तर शीरोच्या 'पामिस्ट्री'त खुपसून बसलेले दिसत. अलीकडे त्यांच्याकडून होणाऱ्या माझ्या आदरातिथ्यांतहि बरीच उणीव भासूं लागली होती.

माझा ज्योतिषशास्त्रावर फारसा विश्वास नाहीं. तेव्हां मीं आपलें भविष्य त्यांना विचारलें आहे, असा एकहि प्रसंग मला स्मरत नाहीं.

"जरा तुझा हात पाहूं रे, किशोर!" एकदां ते स्वतः होऊन म्हणाले.

माझा हात ते पाहात होते. मी त्यांचा चेहरा न्याहाळीत होतों. त्यांना साश्चर्य आनंद झालासें दिसलें. लगेच त्यापैकीं आनंद मावळला आणि आश्चर्य तेवढें बाकी राहिलें.

"काय?" मीं विचारलें.

"आत्तां मी माझी स्वतःची कुंडली पाहात होतों तर मला असं दिसलं कीं लवकरच आपल्या जवळच्या एखाद्या माणसाच्या आयुष्यांत असा एखादा प्रसंग येणार आहे कीं तो त्याच्या जन्मभर लक्षांत राहील. अन् पाहातों तों तुझ्या हातावरहि तोच योग!"

"लवकरच म्हणजे?"

"आठवड्याभरांत!" त्यांनी पुन्हां माझा हात पाहून म्हटलें.

" मग माझाच हात बरा पाहिलात ? जवळचं माणूस..." मी बोलून गेलों, पण मला वाटलें कीं हें योग्य नव्हे. म्हणून मीं तें वाक्य तसेंच सोडलें.

पण विनायकराव किंचित् गोंधळल्यासारखे दिसले. तरी गंभीरपणें ते म्हणतात, " नाहीं ! ती स्त्री आहे.– हा योग फक्त पुरुषांपुरताच असतो ! "

आणि त्यानंतर आठवड्याभरांतलाच प्रसंग !

सकाळीं उठून मी खारला गेलों. नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें वहिनींना शोधत मी थेट स्वयंपाकघरांत शिरलों. वहिनी स्वयंपाकांत गुंतल्या होत्या.

" या ! " त्या म्हणाल्या.

मी एक पाट मांडून त्यावर बसलों. आणि वहिनींशीं गप्पा मारीत त्यांच्या हातच्या सुंदर पदार्थांचे ' नमुना अंक ' पाहूं लागलों.

त्यांनीं कांहींसें माझ्या हातावर ठेवलें. मी तें तोंडांत टाकलें आणि गंभीरपणें निर्णय दिला कीं " चव कांहीं कळली नाहीं बुवा ! आणखी– "

एखादा पदार्थ फार रुचकर झाल्यास त्याचे दोन ' नमुना अंक ' पाहायची माझी रीत त्यांना पूर्ण परिचयाची होती ! तेव्हां, अशा वेळच्या त्यांच्या नेहमींच्या रीतीला अनुसरून, मोठ्या आनंदानें त्यांनीं आणखी—

इतक्यांत बाहेर कुणाची तरी चाहूल लागली. म्हणून मी डोकावून पाहिलें.

मी येतेवेळीं विनायकराव आपली कुंडल्यांची फाइल चाळत होते, ते आतां ती बाजूला सारून उठलेले मला दिसले.

ते आंत येऊन म्हणाले, " जरा बाहेर येतेस का ग ? "

वहिनी उठल्या. विनायकरावांना त्यांच्याशीं कांहीं खाजगी बोलायचें असेल म्हणून मी तसाच आंत बसून राहिलों.

त्या दोघांच्या कुजबुजण्यांतले कांहीं शब्द अस्पष्टसे मला ऐकूं आले.

" नका, तुम्हीं नका सांगू—मीच सांगतें ! "

हा करुणस्वर वहिनींचा होता.

आणि विनायकरावांचा करडा आवाज म्हणत होता, " तू कशाला ?— मीच सांगतों "

" नको ना ! तुम्हीं सांगितलंत तर कदाचित् त्याचा परिणाम उगीचच जास्त होईल—म्हणून म्हणतें, मीच सगळं समजावून सांगेन त्यांना—पण तुम्हीं तरी आज काय हें..."

वहिनींचे शेवटचे शब्द गुदमरल्यासारखे आले. विनायकरावांनी त्यांच्या तोंडावर हात ठेवला असावा. कारण त्याच्या प्रतिकारार्थ झालेला बांगड्यांचा आवाजहि पाठोपाठ माझ्या कानीं आला.

मी उठून बाहेर जाण्याच्या बेतांत होतों अगदीं. इतक्यांत वहिनी स्वत:च आंत आल्या. त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले होते.

" भाऊजी ! " त्यांचा आवाज कांपरा आला.

" काऽऽय ? " माझाहि आवाज आपोआप कांपरा आला.

" काय सांगू तुम्हाला ? " त्या डोळे पुसत म्हणाल्या, " त्यांना आवडत नाहीं हें !! "

त्यांना हुंदका आवरेना.

मन घट्ट करून उच्चारलेल्या त्या शब्दांचा भार त्यांचा त्यांनाच सहन झाला नसावा. कांहीं मिनिटें त्या जमिनीकडे आपलीं अचल बुबुळें लावून बसल्या होत्या. पापण्या आपलें नेहमींचें उघडझांप करण्याचें काम टाकून अश्रुमोचनाचें नवें काम करत होत्या. तरीहि वहिनींचे डोळे रिते होईनात.

मी तर दिङ्मूढच्च होऊन गेलों होतों! काय बोलावें हें मला सुचेना. मी एकदम उठलों.

" कुठं निघालांत ? " वहिनी म्हणाल्या.

" जातों " येवढेंच मीं कसेंतरी म्हटलें.

" पण कुठं ? "

" कुठं नाहीं— "

" मग थांबा जरा; मला कांहीं सांगायचंय् तुम्हाला, " असें म्हणून त्या एकदम उठल्या.

तोंड धुवून त्या परत आल्या आणि म्हणाल्या, " बसा खालीं."

मी खालीं बसलों. आणि गंभीरपणानें म्हणालों, " हं बोला."

पुन्हां डोळ्यांत पाणी आणून त्या बोलूं लागल्या—" तुम्हाला आत्तां सांगितलं तें सांगतांना जीव तिळतिळ तुटला. रागावूं नका! अगदीं तस्संच जीव तोडून त्यांना मीं विचारलं कीं ' हें आजच काय आठवलंय् ? ' पण त्यांचं आपलं एक ... भाउजी! आपल्याला आतां गप्पा नाहीं मारतां यायच्या पहिल्यासारख्या! पण तुम्ही येत जा हं मधून मधून – हें काय ? तुमच्या डोळ्याला पाणी कां ? "—

मी कांहींच न बोलतां अश्रु पुसले.

" भाउजी! मला नाहीं सांगणार ? — "

" मला रंगूनच्या सुब्रमणीची आठवण झाली. वाईट वाटून घेऊं नका तुम्ही – तुमच्याकडे कांहीं दोष नाहीं त्यांत. " असें म्हणून मी उठलों.

" हें काय ? निघालांत इतक्यांत ? — आल्यासारखे जेवून तरी जा. "

" नको. "

" हें पहा भाउजी, तुम्ही ऐका माझं. – तुम्ही न जेवतां गेलांत तर मीहि जेवायची नाहीं! " असें म्हणून वहिनींनी जवळ जवळ

हाताला धरून खालीं बसवलेंच मला. 'जवळ जवळ' असें म्हणायचें कारण कीं त्यांचा हात तसें करतांना अडखळला. परस्परांतील मोकळेपणा आतां आमच्या इच्छेविरुद्ध लोप पावला होता.

आमचें संभाषण चालू असतां विनायकराव आंत येऊन म्हणाले होते, " मला आज एका मित्राकडे जेवायला जायचं होतं. सांगायचं विसरलों मी. आतां जाऊन येतो." आणि तसें म्हणून ते लगेच कपडे करून बाहेर पडले होते.

बराच वेळ गेल्यावर मोठ्या कष्टानें चार घास कसे तरी घशाखालीं ढकलून मी आणि वहिनी पानावरून उठलों. तेवढ्यांत विनायकराव परत आले.

" जातों " असा वरवर दिसायला कोरडा पण आंतून भावजलानें भारावलेला एकच शब्द जेमतेम उच्चारून मी बाहेर पडलों, तों—

अजून त्यांच्याकडे पुन्हां गेलों नाहीं !

आणि ह्यापुढें कधीं जाईन हेंहि सांगवत नाहीं !

अजून मला वसुधेचे शेवटचे शब्द आठवतात—" आपल्याला आतां गप्पा नाहीं मारतां यायच्या पहिल्यासारख्या, पण तुम्ही येत जा हं मधून मधून."

हे शब्द आठवले कीं माझे डोळे भरून येतात. पण मी तिकडे जात मात्र नाहीं.

मीं येणें सोडलें म्हणून वसुधेला वाईट वाटत असेल, माझी खात्री आहे ! पण, — पण माझा त्याला इलाज नाहीं !

मी अजून विचार करतों कीं विनायकरावांचा ग्रह माझ्याबद्दल असा एकाएकीं कां फिरला ? — मनुष्याला आपली पत्नी म्हणजे एक मालकीची वस्तु वाटते, आणि इतरांनीं तिच्याशीं जास्त सलगी दाखविलेली त्याला खपत नाहीं, हीच मनःप्रवृत्ति विनायकरावांच्या वर्तनाला कारण होती कां ? — कीं वसुधेच्या व माझ्या मैत्रीविषयीं कुणी त्यांचा हेतुपूर्वक गैरसमज करून दिला होता ? एकेकाळीं

वसुधावहिनी
नों. नं. १४०६
१९/२

माझ्याशीं अत्यंत मनमोकळेपणानें वागलेले विनायकराव आता माझ्याविषयीं इतके दूषितग्रह कां ?

मला तरी हें कोडें सुटत नाहीं !

मीं येणें सोडलें हें वसुधेच्या जिव्हारीं लागलें असेल, माझी खात्री आहे ! पण माझा त्याला इलाज नाहीं !

बिचारी वसुधा ! – तिचा स्नेह सोडण्यापूर्वी तिला लिहिलेल्या अखेरच्या पत्राची एक नक्कल अजून मीं जवळ बाळगली आहे. ती इथें जोडून देतों म्हणजे संपली माझ्या वसुधावहिनींची हकीकत !—

" वसुधावहिनी,

तुला संबोधतांना शेवटची तीन अक्षरं खोडून टाकायची आज पाळी आली आहे !

तुझ्या-माझ्या मैत्रीला अशी विचित्र कलाटणी मिळेल अशी कल्पना मला स्वप्नांतहि आली नव्हती ! लहानपणीं मी तुला वसुधा अन् तूं मला किशोर म्हणूनच ओळखत असूं. पुढें मी तुला वहिनी म्हणायला लागलों अन् तू मला भाउजी म्हणायला लागलीस. ह्याचं कारण विनायकरावांचं आणि माझं जवळचं नातं अन् मला त्यांच्याबद्दल वाटणारी आपुलकी. त्यांच्या मनोवृत्तींत एकाएकीं इतका फरक कां पडावा हें मला कळत नाहीं. त्याबद्दल त्यांना दोष द्यावा असंहि मला वाटत नाहीं. कारण ते तुझे पतिदेव आहेत. नात्यानं जे तुझ्याशीं इतके निगडित आहेत, त्यांच्याविषयीं असा निष्ठुरपणा मला करावा लागणार ही जाणीवसुद्धां माझ्या मनाला खुपते. इतकं मला अजून तुझ्याबद्दल वाटतं.

रंगूनच्या सुब्रमणीवरून एकदां आपलं बोलणं निघालं होतं. तेव्हां व्यंकट अय्यरबद्दल तू म्हणाली होतीस, " आपलंच मन पापी; त्यावरनं दुसऱ्यांची पारख करायची संवय ! "

तें वाक्य माझ्या मनाभोंवतीं हजारदां घिरट्या घालतं. पण तें मला विनायकरावांच्या बाबतींत लागू करावंसं मात्र वाटत नाहीं. तसं करायला गेलं कीं त्यांच्याबद्दलचा माझा इतक्या दिवसांचा आदर डळमळूं लागतो; अन् तें तर मला पाहवत नाहीं. इतकं मला त्यांच्याबद्दलहि अजून वाटतं. पण मग प्रश्न पडतो — 'त्यांचं वर्तन हें असं कां?'

अर्थात् तो प्रश्न मी तसाच सोडून देतों. — जाऊं दे तें. जखमेवर खपली बसूं द्यायची सोडून जर खरवडलं तर जास्तच रक्त वाहायला लागायचं! म्हणून नकोच तें—

आतां तुझा-माझा सहवास केव्हां होईल तें सांगवत नाहीं. पण तुझं वहिनीपण आणि माझं भाउजीपण मात्र लोपलं. यापुढं माझ्या मावसभावाची पत्नी म्हणून मी तुझा विचार करणार नाहीं, तर माझी बालमैत्रीण वसुधा म्हणून मी तुझी आठवण ठेवीन. तूहि यापुढं आपल्या भाउजींना विसर; अन् शक्य तर बालमित्र किशोर म्हणून माझी आठवण ठेव.

मनांत उचंबळून आलेल्या भावना अन् विचार एक दशांशसुद्धां पत्रांत व्यक्त झालेले नाहींत. इतका मनांत गोंधळ झालाय्. त्याला मी तरी काय करूं?

— किशोर "

हीं हकीकत आणि हें पत्र वाचून कुमूताईंनी एक दीर्घ निःश्वास टाकला. माझ्या हृदयांत बोंचून राहिलेलें शल्य त्यांना जाणवलें बहुत करून. आणि हें पाहून मलाहि कसेसेंच वाटलें. त्या गप्प आहेत असें पाहून मी म्हणालों, " जाऊं द्या हो कुमूताई! कशाला विचार करतां त्याच्यावर?"

त्यांनीं कांहीं एक न बोलतां ते कागद माझ्या स्वाधीन केले.

मींहि मग कांहीं एक न बोलतां ते इतर लघुकथांच्या फाइलला लावून टाकलें.

नंतर बराच वेळ मी विचार करत होतों–कुमूताईंचें अस्वस्थ मन स्थिर कसें करावें ?

इतक्यांत त्या स्वतःच म्हणाल्या, " कां हो किशोर, तुमचा हात विनायकरावांनीं पाहायला मागितला, तें कां म्हणून ? त्यांत त्यांचा कांहीं विशेष हेतु तर नव्हता ? मला तसं वाटलं वाचतांना, म्हणून विचारतें हो—"

" हेतु होता तर ! पुढच्या आठवड्यांत ते मला ताकीद देणार होते. तिची प्रस्तावना होती ती. खरोखरच त्यांच्या म्हणण्याप्रमाणें जन्मभर लक्षांत राहण्याजोगी गोष्ट !—शिवाय, मी वसुधेबद्दल बोलून गेलों तेव्हां ते काय म्हणतात, कीं हा योग फक्त पुरुषांच्या पुरताच असतो.–मी सांगतों कुमूताई, सरळ थाप होती ती. ज्योतिषशास्त्रांतले योग काय असे फक्त पुरुषांच्या पुरतेच असतात वाटतं ? अहो रेल्वे स्टेशनवरचीं बाकंसुद्धां फक्त स्त्रियांकरितां किंवा स्त्रीपुरुष–दोघांच्या करितां असतात; पण फक्त पुरुषांकरितां ? अं ऽ हंः ! पण जाऊं दे, मला कळत नाहीं फारसं ह्या पृथ्वी अन् इतर ग्रहांतलं नातं. "

असें म्हणून मीं पाठ फिरविली.

परंतु मीं अपेक्षिलेलें वहिनीचें हंसणें मला ऐकूं आलें नाहीं.

" पण किशोर—" इतकेंच म्हणून त्या थांबल्या.

" काय कुमूताई ?—" असें म्हणत मी मागें वळलों.

पाहातों तों मिस्किलपणें हंसत असलेला दादा दारांत उभा !

ती हकीकत त्याला आधींपासून ठाऊक होती. ती कुमूताईंनी वाचायच्या आधीं आणि नंतर आमच्यांत झालेला संवाद त्यानें पलीकडच्या खोलींतून ऐकला असावा.

"दोन बाळांचं आज बारसं झालेलं दिसतंय्!" आपल्या स्वभावानुसार दादानें सुरवात केली. तो पुढें म्हणाला, "बाळांच्या हातावर ठेवायला कांहीं नको का? म्हणजे त्या निमित्तानं आम्हालाहि..."

माझ्या मनांत एक मजेदार पण किंचित् पोरकट कल्पना आली. पटकन् खालीं जाऊन इराण्याच्या दुकानांतून मी 'कोलर चॉकोलेटस्' चं पॅकेट घेऊन आलों!

दादानेंहि गंभीरपणाचा मारे आव आणून तें फोडलें; आणि आंतल्या वड्या आम्हांला वाटल्या.

त्या मजेदार घटनांमुळें कुमूताईचें मन केव्हां प्रसन्न झालें तें मलाहि कळलें नाहीं!

मग, त्या मधुर प्रसंगाची स्मृति म्हणून चॉकोलेटस्वरचें तें वेष्टन मीं जपून ठेवायचें ठरविलें.

आतां कॉंग्रेसच्या चळवळीच्या संबंधांत माझी झडती घ्यायला कधीं पोलीस आले तर त्यांना माझ्या कपाटांत 'KOHLER' छापाचा निळा कागद सांपडेल. आणि "लहान मुलासारखा हा कसला रंगीत कागद सांभाळून ठेवलाय् यानं!" असें ते परस्परांत म्हणतील.

# खास अंक

सत्य हें केव्हां तरी बाहेर पडायचेंच.

पण हें ठाऊक असून सुद्धां मनुष्य पुष्कळ वेळां सत्य लपवायचा प्रयत्न करीत असतो.

पण असा एखादा महत्‌सिद्धांत सांगायचा आव कशाला आणा? मींहि त्यावेळीं अगदीं असेंच केलें होतें. पोलीसांनाहि ज्या गोष्टींतील गूढ उकललें नाहीं तिच्या बुडाशीं मी होतों. तरी ती गोष्ट मीं प्रयत्नपूर्वक लपवली नाहीं म्हणा! नाहीं तर, आज तरी असा कबुलीजबाब द्यायला कशाला बसलों असतों?

माझी वीणादेवी वर्णानें फार तर निमगोऱ्यांत मोडली असती.

पण गौरवर्ण हा जरी सौंदर्याचा महत्त्वाचा घटक असला तरी आकर्षकता कांहीं एकट्या गौरवर्णानें येत नाहीं.

नाक, डोळे, वगैरेंची ठेवणसुद्धां तें काम सहज करूं शकते. निदान माझ्या वीणादेवीच्या बाबतींत तरी तसें होतें. तिच्या

डोळयांतली अथांगता, तिच्या गालावरच्या फुगवटया, तिच्या जिवणीची लाडिक ठेवण, तिच्या केशरचनेची मोहक तऱ्हा, आणि ह्या सगळ्यांची मिळून बनलेली आकर्षकता—मला खरोखर तिचा अभिमान वाटे.

मी ज्या साप्ताहिकाच्या कचेरींत सहसंपादक म्हणून काम करत असे, त्याच कचेरींतील संपादकीय खुर्ची विभूषित करणाऱ्या गृहस्थांनी एके दिवशीं मला एक चमत्कारिक विनंति केली. "...जानेवारींत आपला खास अंक निघायचा आहे, म्हणून ही विनंति केली तुम्हाला. तुम्ही 'हो' म्हणत असलात तर ताबडतोब कामाला लागलं पाहिजे आपल्याला. दहा तारखेला अंक बाहेर पडला पाहिजे." असें शेवटीं म्हणून ते माझ्याकडे आतुरतेनें पाहूं लागले. 'हो म्हणाच' असा आशय त्यांच्या आर्जवी मुद्रेंत होता.

दुसरा कुणी असतां तर मला एकदम तसला प्रश्न करूं शकला नसता. पण संपादकांचा व माझा पूर्वस्नेह असल्यामुळें त्यांच्या विनंतीचें मला विशेष कांहीं वाटलें नाहीं. उत्तराकरितां क्षणाचाहि विलंब सहन करण्याची त्यांच्या मनाची तयारी न दिसल्यामुळें मी ताबडतोब म्हणालों—

"विचारतों आज वीणादेवीला अन् उद्यां सांगतों काय तें."

घरीं आल्यावर वीणादेवीची संमति मिळवायला मला किती त्रास पडला!

ती जरी तितकी सुंदर होती तरी आपल्या सौंदर्याचें अशा रीतीनें प्रदर्शन करण्याची कल्पनाच तिला मान्य होईना.

आमच्या खास अंकाच्या मुखपृष्ठावर तिचें तीनरंगी चित्र आल्यावर तिची किती वाहवा होईल ह्याचें मीं वर्णन केलें.—पण तिला तसली वाहवा नकोच होती मुळीं.

त्या फोटोबद्दल साप्ताहिकाकडून तिला नंतर किती मोबदला मिळेल, ह्याचा एक अंदाजी आंकडा मीं सांगितला.—पण ‘ एरवीं आम्हाला पैशाची कमतरता कुठें होती ? ’ असें तिचें म्हणणें पडलें.

मग, ती सुशिक्षित असूनसुद्धां तिचे विचार इतके कोते असल्याबद्दल मीं तिला दूषणें दिलीं. आणि सौंदर्यस्पर्धेंत बक्षीस मिळविण्यासाठीं अहर्निश झटणाऱ्या पाश्चात्य स्त्रियांचे कांहीं दाखलेहि मीं तिला दिले—पण “ मूर्ख असतात त्या ! ” इतकेंच त्याला उत्तर मिळालें.

शेवटीं मुखपृष्ठावर छापायला आपला फोटो दिला तरी आपल्या शीलाला धक्का बसायचें कांहींच कारण नाहीं हें मीं तिला परोपरीनें समजावून सांगितलें.—आणि त्यावर मात्र तिला कांहींच तोड सुचेना. कदाचित् कांहीं सुचूनहि तिनें प्रकट करायचें टाळलें असेल. कुणास ठाऊक खरें कारण काय होतें तें ! एवढें मात्र खरें, कीं ती जरा वेळ कांहींच बोलली नाहीं.

त्या तिच्या मौनाचा फायदा घ्यायचें मीं ठरविलें, आणि म्हणालों,

“ असं काय ग करतेस ? अं ? आणखी सगळं काम तर माझ्याच देखरेखीखालीं होणार आहे ना ! मग तुझ्या फोटोची एवढीसुद्धां विकृति होऊं द्यायची नाहीं, ह्याबद्दल मी काळजी घेणार नाहीं असं का तुला वाटतं ? ”

“ इश्श ! तसं कधीं मीं म्हटलं ? ”

“ मग ? ”

वीणादेवी कांहींच बोलली नाहीं. “ देवी, सांग ना—” साहजिकपणेंच मी आर्जवी स्वरांत बोललों, आणि अनायासें त्याचा इष्ट तोच परिणाम झाला.

“ आतां काय तरी सांगू बाई ! ” वीणादेवी अर्धवट हंसत म्हणाली, “ तुमची कांहीं हरकत नसली, तर मी कांहीं विशेष प्रतिकूल नाहीं. त्यांत काय मोठसं ?... ”

देवीचे पुढचे शब्द माझ्या कानावर आदळले असतील, पण त्यांचें ज्ञान करून घेण्यास माझा मेंदू मोकळा नव्हता. तो दुसऱ्याच कामांत गुंतला होता. फोटोचा ब्लॉक करायला कुणाकडे द्यायचा याबद्दल तो विचार करीत होता.

त्या आनंदाच्या भरांत मी ताबडतोब संपादकांच्याकडे गेलों आणि फोटो छापायला देवीची संमति मिळाल्याचें सांगून त्यांनाहि आनंदित केलें.

दुसऱ्या दिवसापासून आम्ही कामाला लागलों. आणि जानेवारीच्या पांच तारखेला नुसत्या तिरंगी मुखपृष्ठाच्या तीस हजार प्रती छापून तयार झाल्या.

इकडे आमच्या आगामी खास अंकासाठीं नांवें नोंदविणारांची संख्या शेंकड्यांनी फुगत चालली. आणि गांवोगांवच्या एजंट्सच्या मागण्याहि वाढूं लागल्या. तेव्हां आणखी दहा हजार प्रती काढायचें ठरलें.

परगांवीं पाठविण्याच्या. प्रतींना तिकिटें लावूनसुद्धां ठेवण्यांत आलीं.

दुसऱ्या दिवशीं आमचा खास अंक बाहेर पडायचा असल्यामुळें, शेवटच्या तारखेच्या संध्याकाळपर्यंत आम्हीं इतकी तयारी करून ठेविली होती.

त्या दिवशीं घरीं येतांना माझ्या वृत्ति आनंदातिशयानें उचंबळूं पाहात होत्या. कारण ज्यावरून तो ब्लॉक तयार केला होता, तें मूळचें तीनरंगी चित्र फ्रेम करून मी घरीं नेत होतों.

परंतु घरीं जातांच माझा विरस झाला. देवी कुठें बाहेर गेली होती. गड्याजवळ तिनें माझ्याकरितां पत्र देऊन ठेवलें होतें.

" ...मैत्रिणीकडे आज एक पाहुणी आली आहे. तीहि आमची जुनी मैत्रीणच आहे. आज इतक्या वर्षांनी भेट झाल्यामुळें ह्या दोघींच्या आग्रहाला बळी पडून, तुम्ही घरीं यायच्या आंतच त्यांच्याबरोबर फिरायला जात आहे. जेवण तिकडेच होईल. रात्रीं नाटकाचा बेतहि ठरला आहे. त्यांचीं मनं दुखवणं केवळ अशक्य आहे. सविस्तर हकीकत प्रत्यक्ष सांगेनच, पण मला यायला उशीर होईल. म्हणून काळजी करूं नका, अन् रागावूं नका हं !

— देवी "

देवीच्या पत्रानें माझें कितीहि समाधान झालें तरी माझा जो विरस झाला होता त्याची भरपाई होईना; उलट, उद्यां सकाळपर्यंत तरी आतां तिची गांठ पडत नाहीं, ह्याची जाणीव झाल्यामुळें मला अगदीं सुनेंसुनें वाटूं लागलें. मी अगदीं बेचैन झालों.

मग तो फोटो मी भिंतीला टांगलासुद्धां नाहीं. तो तसाच टेबलावर उभा करून ठेवला आणि कपडे न बदलतां बाहेर पडलों.

मी कुणीकडे चाललों होतों त्याचें मला भान नव्हतें. शेवटीं गांवाबाहेर टेकडीच्या पायथ्याशीं ज्या ठिकाणीं फिरायला म्हणून मी व देवी नेहमीं जाऊन बसत होतों, त्या ठिकाणीं माझ्या पायांनीं मला नेलें. पण तेथें गेल्यावर देवी नसल्याची जाणीव अधिकच तीव्र होऊं लागली.

शेवटीं मी तिथून उठलों आणि टेकडी चढून वर गेलों. अगदीं माथ्यावर जाऊन, गांवाकडे पाठ करून बसलों. पार क्षितिजसीमेपर्यंत पसरलेल्या टेकड्या, झाडी वगैरे सर्व कांहीं अंधुक दिसत होतें. सूर्यास्त होऊन गेला असल्यामुळें दूरचे कांहीं ढग भडक तांबड्या रंगांत न्हाऊन निघाल्यासारखे दिसत होते. त्यांचा अमर्याद

पसारा इतका भयाण वाटत होता कीं कुठें निसर्ग आणि कुठें यःकश्चित् मानव ? असें मला वाटूं लागलें. मग माझ्या एकाकीपणाची जाणीव मला अधिकच त्रास देऊं लागली.

इतक्यांत मी बसलों होतों तिथून जरा खाली कसला तरी कागद फडफडल्याचा आवाज झाला.

मीं वांकून खालीं पाहिलें—

गांधी टोपी, नेहरू शर्ट, आणि पायजमा घातलेला एक तरुण खालीं बसला होता, आणि वर्तमानपत्राची एक गुंडाळी सोडत होता. कांहीं वेळानें त्यानें एक जाड कागद काढला व सरळ केला. आमच्या उद्यांच्या खास अंकाचें तें मुखपृष्ठ होतें.

कारण त्यावर माझ्या वीणादेवीचें तीनरंगी चित्र होतें. तो कांहीं वेळ त्या चित्राकडे पाहात होता. मग त्यानें तें आपल्या छातीशीं धरून पुन्हां बाजूला काढलें, पुन्हां त्याच्याकडे क्षणमात्र निरखून पाहिलें, आणि—आणि त्यानें त्या चित्राचें—माझ्या देवीच्या चित्राचें चुम्बन घेतलें ! !

हो, मीं प्रत्यक्ष पाहिलें ! माझें डोकें भ्रमिष्टासारखें झालें. मी ताबडतोब तेथून उठलों आणि गांवांत आलों. वाटेंत एक आगपेटी विकत घेतली. ऑफिसमध्यें आलों तों तेथें कोणीहि नव्हतें. एक काडी ओढली, आणि तिथल्या खास अंकाच्या गठ्यांना आग लावून दिली ! ! आणि ऑफिसला कुलूप लावून सरळ चालूं लागलों.

घरीं आल्याबरोबर रायटिंग पॅड काढलें. फाउंटन पेनमध्यें शाई भरली, आणि लिहायला सुरवात केली.

" माझी वीणादेवी वर्णानें फार तर निमगोऱ्यांत मोडली असती."

सगळी हकीकत लिहून झाल्यावर एकदां फिरून वाचून पाहिली. मग त्या हस्तलिखिताच्या अग्रभागीं ' खास अंक ' असें मोठ्या अक्षरांत लिहून तें अधोरेखित केलें.

इतक्यांत घड्याळाचा एक टोका पडला. तो अडीच वाजल्याचा होता कीं साडेतीन वाजल्याचा होता हें पाहण्याकरितां मी मागें वळलों, आणि पाहातों तों दारांत देवी उभी!

हंसतमुखानें तिनें आंत प्रवेश केला आणि नुसत्या भुंवया वर करून "आज इतक्या उशिरांपर्यंत जागरण?" असा प्रश्न सुचविला. पण लगेच तिचें लक्ष त्या फोटोकडे गेलें. "ओहो ऽ!" असा उद्‍गार काढून तिनें असें गोड स्मित केलें कीं त्या फोटोचें प्रतिबिंब तिच्या चेहऱ्यावर पडलं, कीं तिचें प्रतिबिंब त्या फोटोंत पडलें होतें असा मला प्रश्न पडला.

त्या नादात, आपण भुवयांनीं केलेला प्रश्न ती विसरली. पण त्याचें उत्तर द्यायला मीं विसरणें शक्य नव्हतें! नुकतेच लिहून काढलेले ते कागद मीं तिच्या हातांत दिले. ती वाचूं लागली, आणि तिच्या चेहऱ्यावर उमटणारे विकार मी पाहूं लागलों.

शेवटीं शेवटीं तिच्या डोळ्यांत पाणी जमूं लागलें. फोटोचा दुरुपयोग झाल्याचें पाहून तिला वाईट वाटलें असावें. पण फोटो छापायला तिला प्रवृत्त करणारा मीच होतों! तिची हकीकत वाचून संपतांच मी म्हणालों—

"चुकलों मी, देवी!"

"नाहीं. मीच चुकलें!" असें म्हणतांना तिच्या खालच्या पापण्या कांठोकांठ भरून आल्या होत्या. "त्यानं चष्मा लावला होता कां?"

"हो" मी म्हणालों, आणि लगेच देवीच्या डोळ्यांतलें अश्रु टप्‌कन् ठिबकले! त्याच्या चष्मा लावण्याचा आणि हिचीच चूक असण्याचा काय संबंध असावा हें मला उमगलें नाहीं. पण अशा वेळीं तरी गैरसमजाला मुळींच वाव राहूं नये म्हणून अधिक स्पष्टीकरणार्थ मी म्हणालों, "हो, लावला होता चष्मा त्यानं.—

अग, आमच्या रामराव कंपॉझिटरकडे नेहमीं तो जगदीश येत-जात असतो ना, तोच होता तो..."

उशींत डोकें खुपसून देवी रडत होती. तिचा चेहरा हलकेंच माझ्याकडे वळवून घेऊन मी तिचे अश्रु पुसूं लागलों.

देवी सांगू लागली, – "मीच चुकलें. त्या जगदीशचं न् माझं पहिल्यांदा एकमेकांवर प्रेम होतं. पुढं तुमची ओळख झाल्यावर तो मला फिका वाटूं लागला. मीं त्याला तसं सांगितल्यावर, त्यानं माझा एखादा फोटो तरी ठेवायला मागितला. पण मीं तेंहि नाकारलं. मला अजून तो फिकाच वाटतो. पण त्याला एक प्रकारें फसवल्याची जाणीव झाली कीं असं वाईट वाटतं.... "

"पण देवी, माझ्या ..." असे एकदोन प्रश्नार्थी शब्द मीं उच्चारिले.

पण देवीनें त्याचें उत्तर द्यायची आवश्यकताच राहिली नाहीं. कारण –

तिनें अशा कांहीं अनन्य दृष्टीनें माझ्याकडे पाहिलें, कीं—

"देवी ! देवी !" असें म्हणून मीं तिला बाहुपाशांत घेतलें.

— 'साप्ताहिक सकाळ'

# संभावितांच्या सान्निध्यांत
## [ न कळत घेतलेल्या मुलाखती ]

तपकिरीची डबी पुढें करून जनूभाऊ मतलबे जेव्हां शंकर शिरजोरच्या खोलींत शिरला, आणि "घ्या ना, घ्या! शंकरराव–" असें स्वत: होऊन मोठ्या औदार्यानें म्हणाला तेव्हां मी जरा चकितच झालों.

कारण प्रत्येकाला जनूभाऊ चिक्कू म्हणून माहित होता. पण 'खाजगी जीवनांत हा जनूभाऊ मतलबे असेलहि उदार कदाचित्' असें मनाशीं म्हणण्याच्या मी विचारांत होतों, तोंच जनूभाऊ शंकरला म्हणतो—

"ए शिरजोर, लेका, पास दे ना तुझा आज जरा. रविवार आहे, तुला कांहीं ऑफिस नाहीं. गिरगांवांत जरा जाऊन येईन म्हणतों."

शंकरनें सरळ त्याला सागितलें— "अरे पण माझा पास आहे जी. आय्. पी. चा! बी. बी. वाला पहा एखादा."

"हलकट आहेस लेका, द्यायचा नाहीं म्हणून सरळ म्हण कीं.– पण मी घेतल्याशिवाय राहतोंय् थोडाच?— भायखळ्याहून चालत जाईन पुढं— समजलास काय?..."

एकूण जनूभाऊच्या दृष्टीनें शंकर हलकट ठरला होता ! कां, तर कधींमधीं जनूभाऊलाहि उपयोगी पडेल असा बी. बी. सी. आय्. चा पास शंकरजवळ नव्हता !

त्यांचें बोलणें तेथेंच थांबलें नाहीं.

शंकर म्हणाला,

" खरं सांगायचं म्हणजे हलकट आहेत तुमच्या बी. बी. चे लोक; म्हणून तर मीं जी. आय्. पी. चा पास काढला. बरेच दिवस पास दाखवतां दाखवतां चेहरा ओळखीचा झाला कीं मग आमच्या जी. आय्. पी. वर पास—तिकिट कांहीं नसलं तरी चालत. प्रत्येक पांचदहा लोकांच्या थव्यागणिक तिकिट कलेक्टर एकदां ' टिकेट, प्लीझ ' असं केवळ रूढी म्हणून म्हणतो. आपण ' पास ! ' असं म्हणत छातीवर काढून वरच्या खिशाला उगाच हात लावल्यासारखं करीत सटकलं तरी कुणी विचारत नाहीं आमच्या जी. आय्. पी. वर ! तुमच्या बी. बी. वर तसं नाहीं.—तिकिटं आडवून घेतातच, पण पास दाखवला तरी त्याची मुदत केव्हां संपते हें तपासायला म्हणून उघडून तारीख बघत बसतात— "

त्याच्या वक्तृत्वाला अडथळा करीत जनूभाऊ मधेंच म्हणाला,

" अन् इतकं असूनहि भलत्याचेच पास घेऊन आमच्यासारखे कांहीं लोक बनवतातच ना त्यांना ? "

शंकर रंगांत येऊन म्हणाला,

" असंच बनवायला पाहिजे लेकाच्यांना ! त्यांतल्या त्यांत, जाड काचांचा चष्मा लावून तो लाल नाकाचा टी. सी. इथं शेवटच्या प्लॅटफॉर्मवर असतो बघ नेहमीं. तो तर अगदींच हलकट आहे.— काल रात्रीं मी एक शब्दहि न बोलतां प्लॅटफॉर्मवरून बाहेर पडत होतों, तर आडवलं कीं त्यानं मला. कांहीं कारण होतं

कां ?— शेवटच्या ‘ शो ’ हून मध्यरात्रीनंतर येत होतों मी. तर्शी त्या गाडीनं फारच थोडीं माणसं आलीं. पण ह्या लालनाक्याला आली लहर आपलं काम चोख बजावण्याची ! हटकलं त्यानं मला ! पण मी कसला खमंग ?— हार्बर–ब्रँचचं एक जुनं तिकिट दिलं ठेवून त्याच्या मुठींत अन् मागं वळून देखील न बघतां घरीं येऊन झोंपलों सरळ ! अगदीं पांघरूण डोक्यावरून घेऊन ... ”

फिरून त्याला अडथळा करीत जनूभाऊ मधेंच म्हणाला,

“ पण त्यानं घेतांना बघितलं नाहीं ? ”

“ मग सांगतों काय तर ? अपरात्रीं ड्यूटीवर असल्यामुळं त्याला येत होती झोंप. तो कशाला पाहतोय् जास्त कमी ? तेवढ्या ठराविक आकाराचा पुठ्ठयाचा तुकडा हाताला लागल्याशीं कारण !”

जनूभाऊ मतलबेला त्या तिकिट कलेक्टरच्या कामाच्या चोखपणा-खालीं दडलेल्या मतलबीपणाचा चट्कन् वास आला. म्हणतात ना, चोराच्या वाटा—

जनूभाऊ म्हणाला, “ खरं सांगू ? अरे त्या टी. सी. चा हा सारा चोखपणा कशासाठीं ? पहायचं चहापाण्याला कांहीं चिरिमिरी मिळते कां ! दुसरं काय ? ”

“ मी तरी तेंच सांगतोंय् कीं, तो जाड चष्मावाला लालनाक्या म्हणजे हलकट आहे अगदीं ! ”

या ठिकाणीं दोघेहि खुषींत येऊन मनापासून हंसले. कारण, एकमेकांच्या संभावितपणाबद्दल आतां दोघांचें एकमत झालें होतें.

दुसऱ्या दिवशीं एक लोकल चुकली म्हणून दुसरी येईपर्यंत प्लॅटफॉर्म-वर मी इकडून तिकडे फेऱ्या मारत होतो; आणि मधेंच थबकून आग्रा–मथुरेचीं आमंत्रणें देणाऱ्या खांबावरील सचित्र पोस्टर्स पाहात

वा. क्र. १०१ ... ता. ६

होतों. असाच एका पोस्टरखालीं उभा असतांना मला दोघां तिकिट-कलेक्टर्सचें संभाषण ऐकूं येत होतें.

तोच जाड चष्मावाला लाल नाकाचा टी. सी. ड्यूटीवर होता. आपल्यासारखाच पांढरा पोषाख केलेल्या एका जोडीदाराला तो सांगत होता,—

" तो बघ इन्स्पेक्टर सालढाना हिंडतो आहे तिकडे प्लॅटफॉर्मच्या टोंकाला ! नीट सरळ उभा रहा बरं का, एक पाय कठड्यावर टेकूं नकोस असा. पाहील तिकडनं तो; – हलकट आहे लेकाचा ! "

" का रे बावा अमीनभाई, एकदम अहेर दिलास त्या सालढानाला ? "

" अरे आहेच तशी ती वल्ली ! कालच्या शेवटच्या गाडीच्या माझ्या कलेक्शनमधें चुकून एक जी. आय्. पी. च्या हार्बर–ब्रँचचं तिकिट त्याला सापडलं; तर म्हणतो कसा ' बी. बी. ' चाच पगार घेतां ना ? मग जी. आय्. पी. चीं तिकिटं कशाला जमा करतां ? ' आतां सांग तूच. काय बिघडलं मोठं ? "

त्या लालनाक्या अमीनभाईच्या जाड चष्म्यांतून बारीक दिसणाऱ्या डोळ्यांकडे निरखून पाहात त्याच्या जोडीदारानें एक प्रामाणिक शंका उपस्थित केली. तो म्हणाला,

" पण तुझं तरी काम असं कसं ? तिकिटांचं कलेक्शन त्याला तपासायला दिलंस त्याच वेळीं तूं कां नाहीं काढून फेकून दिलंस तें तिकीट ? "

" अरे पण म्हणून का त्यानं इतकं मनावर घ्यायचं अगदीं ? मी सांगतों तें ध्यानांत ठेव तू – अगदीं हलकट आहे तो ! "

त्याचें तें म्हणणें त्याच्या जोडीदाराच्या ध्यानांतच येईना.

पोस्टर्स बघण्याचें सोडून मी जरा प्लॅटफॉर्मवर चक्कर मारावी म्हणून तिथून निघालों. प्लॅटफॉर्मच्या दुसऱ्या टोकाला जाऊन पुन्हां मागें फिरतांना त्या तथाकथित सालढानाच्या जवळून मला दोनदां जावें लागलें. त्याचें आपल्या एका मित्राशीं चाललेलें संभाषण ऐन रंगांत आलें होतें. त्याचा मित्र म्हणत होता—

" ल्यूसीबद्दल नको सांगूं जास्त कांहीं आतां. कळलं सारं मला ! पण – काय रे, मेरी भेटली होती का अलीकडे ? "

" हो, परवांच. "

" परवां म्हणजे ? "

" शनिवारीं. "

" कुठं ? "

" इथंच ! "

" काय म्हणतोस ? ह्या स्टेशनवर ? "

" हो, ह्याच प्लॅटफॉर्मवर ! "

" ती कशी काय बुवा ? "

" चालली होती गाडींतनं;– मला पाहिल्याबरोबर उतरली. "

" म्हणजे इथं उतरायचं नव्हतं तिला ? "

" छे, दुसऱ्या गाडीनं पुढं गेली लगेच. "

" म्हणजे मुद्दाम दहा मिनिटं इथं थांबली होती म्हणतोस ? "

" हो, ना ! "

" मग काय म्हणत होती एकंदरींत ? "

" मजेंत होती ! "

" इथं कांहीं लाडिकपणा नाहीं का केलान् नेहमींप्रमाणें ? "

" केलान् तर !– "

" बाकी मधेंच गाडीतनं उतरून दहा मिनिटं थांबली हें काय कमी झालं ? "

" तें तर झालंच; शिवाय– "

" आणखी काय ? "

" काय सांगू ? किती तरी गोड गोड बोलली !– सिगरेट दिलीन् मला; आपणहि एक घेतलीन्. "

" आपण होऊन ? "

" सांगतों काय तर? माझी सिगरेट पेटवून दिली तिनं, इतक्यांत वाऱ्याची एक मोठी झुळूक आली अन् तिच्या हातांतली काडी विझली– "

" मग ? "

" तसं म्हणते काय, ' Let's take a hot kiss ! ' असं म्हणून माझ्या तोंडाजवळ तोंड आणून माझ्या सिगरेटवरून आपली सिगरेट तिनं पेटवून घेतली. तेवढ्यांत पुढली लोकल आली अन् मेरी हातरुमाल फडकावीत निघून गेली... "

" मोठा भाग्यवान् आहेस तू ! "

" खरंच, किती वेळ तरी मी खुषींत होतों त्यानंतर !– पण आमच्या म्हाताऱ्या ए. एस्. एम्. कर्सेटजीनं पाहिलं वाटतं मला तशा स्थितींत– "

" काय म्हणतोस ? "

" केला झालं त्यानं रिपोर्ट. सालढाना म्हणे ड्यूटीवर असतांना धूम्रपान करतो, ही गोष्ट नियमबाह्य आहे– एक अन् दोन, सत्रा गोष्टी लिहिल्या असतील त्यानं रिपोर्टांत ! तसा हलकट आहे तो अगदीं ! मी पुरा ओळखून आहे त्याला. "

" बाकी ड्यूटीवर असतांना धूम्रपान केलंस हें चुकलं नाहीं कां तुझं ? "

" माझ्या लक्षांत आली होती ती गोष्ट त्याच वेळीं. पण मेरीला काय ' नको ' म्हणायचं ? Irresistible आहे ती ! "

" बाकी तरुण वयांत त्या कर्सेटजीनं देखील असंच वर्तन केलं असेल– "

" तेंच तर मी म्हणतों, आतां सारे नियम आठवताहेत त्याला. अरे उगीच कां मी म्हणतों? हलकट आहे तो अगदीं!... "

तेवढ्यांत माझी लोकल आल्यामुळें मला त्या दोघा न्यायप्रिय मित्रांना तसेंच सोडून देणें भाग पडलें.

त्या सगळ्याच अन्यायपीडित संभावितांविषयीं मला राहून राहून हंसू येत होतें.

आणि माझी खात्री आहे कीं उद्यां मला शंकरराव, जनूभाऊ वगैरेंबद्दल आणखी एकदां हंसू येईल.

कारण, त्या सगळ्याच संभावितांच्या न कळत घेतलेल्या ह्या मुलाखती त्या दोघांच्या वाचण्यांत आल्या म्हणजे ते आपापल्या खिशांतली तपकिरीची डबी एकमेकांपुढें करीत मोठ्या औदार्यानें " घ्या ना, घ्या ना! " असें एकमेकांना प्रथम म्हणतील, आणि मग दोघे मिळून, मी आसपास नाहीं अशी खबरदारी घेऊन माझ्यावर तुटून पडतील ते नेहमींच्याच शब्दांत—

" काय हलकट आहे हा तरी!– गोष्ट लिहिलीय् पहा त्यानं आपल्यावर!... "

# खोट्या नाण्यांचा कारखाना

थंडी बरीच पडली होती, आणि आम्ही तिघेहि पडवींत शेकोटी पेटवून चिरूटाचा धूर सोडीत एकत्र बसलों होतों.

आम्ही म्हणजे—आमचे वयानें वृद्ध परंतु वृत्तीनें ऐन पंचविशींतले वाटणारे इन्स्पेक्टर जावळे साहेब, मी त्यांचा मदतनीस, आणि ‘ बी ’ डिव्हिजनकडून ‘ आय्. बी. ’ कडे नुकतेच बदलून आलेले तरुण व धाडसी सब्-इन्स्पेक्टर कांबळे.

बोलतां बोलतां जावळेसाहेब म्हणाले, “ आपली कांहीं नीट व्यवस्था झाली नाहीं बुवा इथं ! ”

कांबळे चटकन् म्हणाले, “ इतकी सोय इथल्या खेड्यांतल्या मंडळींनी केली. मग आणखी व्यवस्था ती कसली ? ”

आणि असें म्हणून त्यांनी पलीकडच्या खोलींतल्या नुकत्याच रिकाम्या केलेल्या दोन बाटल्यांकडे बोट दाखविलें.

मींच मग स्पष्टीकरण केलें, “ ती सोय नव्हे; दुसरी. ”

कारण बऱ्याच वर्षांच्या निकट सान्निध्यामुळें मला त्यांची आवडनिवड नीट माहित झालेली होती.

त्यावर जावळेसाहेब कौतुकानें किंचित् हंसले, आणि एकदां खांकरून त्यांनी चिरूटाचा मनापासून झुरका घेतला.

त्यावेळीं खोट्या नाण्यांचा बाजारांत फार प्रसार होऊं लागल्या-मुळें, खोट्या नाण्यांचा कारखाना कोणी काढला आहे कीं काय, असा सरकारला संशय आला होता. आणि आम्हां तिघांना सातारा जिल्ह्यांतील एका गांवीं संशयित टोळीचा तपास लावण्यासाठीं म्हणून पाठविण्यांत आलेलें होतें.

साध्या वेषांत गांवांत वावरून आमचा तपास पुरा होत आलेला होता. आणि तेथून परत निघण्याच्या आदल्या रात्रीं आरंभीं उल्लेखिलेली बैठक झालेली होती.

पडवीचें तोंड पूर्वेकडे होतें, आणि उशिरां उगवलेलें मृगनक्षत्र समोरच्या कौलारावरून दिसणाऱ्या आकाशाच्या पट्ट्यावर हळूं हळूं आक्रमण करीत होतें.

अशा थंडीच्या रात्रीं ऊबदार शेकोटीच्या सान्निध्यांत गप्पा मारण्याच्या ओघांत गुलाबी विषय न निघाल्यास नवलच.

तेव्हां वरील संवाद आमच्यांत झाला हें नैसर्गिकच होतें.

त्यावरून कांबळेसाहेबांना त्याच गांवांतली एक घडलेली हकीकत आठवली. त्यांनी ती मोठ्या चातुर्यानें सांगितली. पण मी जावळेसाहेबांचा साधासुधा कारकूनवजा मदतनीस असल्यामुळें मला ती जशीच्या तशी सांगतां येणार नाहीं. तरीपण मी माझ्या ओबडधोबड पद्धतीनें प्रयत्न करणार आहे. आणि बरींच वर्षें जावळे साहेबांजवळ नोकरी केली असल्यानें, ही हकीकत बाहेर सांगायला त्यांची आणि त्यांचे नवे दोस्त आणि सहकारी कांबळे यांची संमति गृहीत धरून चालतों.

“ त्याचं असं झालं, याच गांवांत मागं अठरावीस वर्षांपूर्वी मी कशालासा आलों होतों. ” कांबळे यांनीं सुरुवात केली.

“ त्यावेळीं या गांवांत मरियमबी म्हणून एक चांगली गाणारीण होती. वय असेल पंचविसाच्या आंतबाहेर. दिसायला फारशी सुरेख नाहीं; पण आपल्या हिंदी पद्धतीची पातळं नेसायची, उजव्या खांद्या-वरून पदर घेऊन. तिच्या शरीरसौष्टवाला ती नेसणपद्धतीच चांगली दिसत असे. केंस बांधायची ती रोज नव्या तऱ्हेनं. साहजिक आहे, लोकांचं चित्त आपल्याकडे ओढून घेणं हा मुळीं धंदाच होता तिचा.

—नव्हे, तिच्या वंशांत चालत आलेला तो धंदा होता.

तिच्या म्हाताऱ्या आईच्या एकेकाळच्या आवाजांतली सारी गोडी तिच्यांत उतरली होती. शिवाय गाण्याची अन् वाजविण्याची कला तिनं मेहनतीनं हस्तगत केली होती. त्यामुळेंहि कित्येक पुरुष तिच्याकडे ओढले जात.

त्यांच्यापैकींच एखाद्या श्रीमंत सरदारपुत्राला खूष करून मरियमनं आपल्या जन्माची तरतूद करून ठेवावी असं म्हातारीच्या मनांत होतं. पण तिला तसं सांगून सांगून म्हातारी आतां थकली होती, अन् तिनं तिचा नादच सोडून दिला होता.

आपल्या जगण्याबद्दलच्या एकप्रकारच्या असंतुष्टतेनं मरियमचे डोळे पाहावेत तेव्हां विषण्ण झालेले दिसायचे. ती आपली वेषभूषा अन् गाण्याच्या बैठकी करी त्यांतदेखील त्यामुळं तिचं स्वतःचं चित्त मुळींच रमत नसे. रसिक श्रोते मात्र तिच्या गाण्यावर खुष होते. त्यांत ज्यांना गाणं समजत असे ते तर तिच्याबद्दल परमावधीच्या आदरानं एकमेकांत बोलत.

—माझं हें बोलणं म्हणजे नायकिणींच्या जातीबद्दल ठराविक अनुकंपा दाखविणाऱ्या एखाद्या कादंबरींतल्या वर्णनासारखं वाटेल तुम्हाला; अन् तुम्ही हंसाल देखील कदाचित्. पण किरकोळ

व्यक्तींच्या आयुष्यांत देखील कादंबरींतल्यासारखे अद्‌भुत प्रसंग कित्येकदा घडतातच कीं !

असाच कादंबरींतला एक प्रसंग मरियमच्या आयुष्यांत एक दिवस घडून आला.

गांवांतल्या एका घरंदाज कुटुंबांतला वीस-बावीस वर्षांचा एक तरुण मुलगा एक दिवस संध्याकाळीं तिच्या घराखालीं रस्त्यावर तिचं गाणं ऐकत उभा होता. मधेंच तिला ठसका लागला, अन् शेजारच्या पिकदाणींत थुंकण्याऐवजीं तीं सहज खिडकीपाशीं गेली.

आपलं गाणं मनःपूर्वक ऐकत उभा असलेला तो तरुण तिला प्रथमच दिसला. त्याच्या शरीराचा बांधा मजबूत अन् ऐटदार दिसत होता.

तिनं किंचित् कृत्रिमपणें हंसून त्याच्याकडे पाहिलं, यांत तिनं कांहीं विशेष केलं असं नाहीं. पण तो मात्र स्तिमित झालेल्या अन् जराशा बावरलेल्या नजरेनं तिच्याकडे पाहात राहिला.

तिनं वर यायला त्याला खूण केली, अन् आपण काय करीत आहोंत हें नीट कळण्यापूर्वींच त्याचे पाय त्या माडीचा जिना चढूं लागले होते.

प्रथम त्याच्या पायांना थोडया मुंग्या आल्यासारख्या त्याला वाटल्या. पण तिचं गाणं जवळून ऐकायची त्याची अंतःप्रेरणा त्याला मागें राहूं देत नव्हती.

तो वर आला तेव्हां त्याचा ऊर धडधडत होता. बैठकीच्या एका कडेला तो बसला. तिथं जमलेल्या इतर लोकांनीं—ज्यांची भीड केव्हांच चेपली होती अशानी त्याच्याकडे ‘ हंः बच्चा आहे झालं ! ’ अशा अर्थाचे दृष्टिक्षेप टाकले.

मरियमचं गाणं पुन्हां सुरूं झालं अन् तो तिच्या गाण्यांत सगळयांत अधिक रमला.

"त्याचं असं झालं, याच गांवांत मागं अठरावीस वर्षांपूर्वीं मी कशालासा आलों होतों." कांबळे यांनीं सुरुवात केली.

"त्यावेळीं या गांवांत मरियमबी म्हणून एक चांगली गाणारीण होती. वय असेल पंचविसाच्या आंतबाहेर. दिसायला फारशी सुरेख नाहीं; पण आपल्या हिंदी पद्धतीची पातळं नेसायची, उजव्या खांद्यावरून पदर घेऊन. तिच्या शरीरसौष्टवाला ती नेसणपद्धतीच चांगली दिसत असे. केंस बांधायची ती रोज नव्या तऱ्हेनं. साहजिक आहे, लोकांचं चित्त आपल्याकडे ओढून घेणं हा मुळीं धंदाच होता तिचा.

—नव्हे, तिच्या वंशांत चालत आलेला तो धंदा होता.

तिच्या म्हाताऱ्या आईच्या एकेकाळच्या आवाजांतली सारी गोडी तिच्यांत उतरली होती. शिवाय गाण्याची अन् वाजविण्याची कला तिनं मेहनतीनं हस्तगत केली होती. त्यामुळेंहि कित्येक पुरुष तिच्याकडे ओढले जात.

त्यांच्यापैकींच एखाद्या श्रीमंत सरदारपुत्राला खूष करून मरियमनं आपल्या जन्माची तरतूद करून ठेवावी असं म्हातारीच्या मनांत होतं. पण तिला तसं सांगून सांगून म्हातारी आतां थकली होती, अन् तिनं तिचा नादच सोडून दिला होता.

आपल्या जगण्याबद्दलच्या एकप्रकारच्या असंतुष्टतेनं मरियमचे डोळे पाहावेत तेव्हां विषण्ण झालेले दिसायचे. ती आपली वेषभूषा अन् गाण्याच्या बैठकी करी त्यांतदेखील त्यामुळं तिचं स्वतःचं चित्त मुळीचं रमत नसे. रसिक श्रोते मात्र तिच्या गाण्यावर खुष होते. त्यांत ज्यांना गाणं समजत असे ते तर तिच्याबद्दल परमावधीच्या आदरानं एकमेकांत बोलत.

—माझं हें बोलणं म्हणजे नायकिणींच्या जातीबद्दल ठराविक अनुकंपा दाखविणाऱ्या एखाद्या कादंबरींतल्या वर्णनासारखं वाटेल तुम्हाला; अन् तुम्ही हंसाल देखील कदाचित्. पण किरकोळ

व्यक्तींच्या आयुष्यांत देखील कादंबरींतल्यासारखे अद्‌भुत प्रसंग कित्येकदां घडतातच कीं !

असाच कादंबरींतला एक प्रसंग मरियमच्या आयुष्यांत एक दिवस घडून आला.

गांवांतल्या एका घरंदाज कुटुंबांतला वीस-बावीस वर्षांचा एक तरुण मुलगा एक दिवस संध्याकाळीं तिच्या घराखालीं रस्त्यावर तिचं गाणं ऐकत उभा होता. मधेंच तिला ठसका लागला, अन् शेजारच्या पिकदाणींत थुंकण्याऐवजीं तीं सहज खिडकीपाशीं गेली.

आपलं गाणं मनःपूर्वक ऐकत उभा असलेला तो तरुण तिला प्रथमच दिसला. त्याच्या शरीराचा बांधा मजबूत अन् ऐटदार दिसत होता.

तिनं किंचित् कृत्रिमपणें हंसून त्याच्याकडे पाहिलं, यांत तिनं कांहीं विशेष केलं असं नाहीं. पण तो मात्र स्तिमित झालेल्या अन् जराशा बावरलेल्या नजरेनं तिच्याकडे पाहात राहिला.

तिनं वर यायला त्याला खूण केली, अन् आपण काय करीत आहोंत हें नीट कळण्यापूर्वींच त्याचे पाय त्या माडीचा जिना चढूं लागले होते.

प्रथम त्याच्या पायांना थोड्या मुंग्या आल्यासारख्या त्याला वाटल्या. पण तिचं गाणं जवळून ऐकायची त्याची अंतःप्रेरणा त्याला मागें राहूं देत नव्हती.

तो वर आला तेव्हां त्याचा ऊर धडधडत होता. बैठकीच्या एका कडेला तो बसला. तिथं जमलेल्या इतर लोकांनीं—ज्यांची भीड केव्हांच चेपली होती अशानी त्याच्याकडे ' हंः बच्चा आहे झालं !' अशा अर्थाचे दृष्टिक्षेप टाकले.

मरियमचं गाणं पुन्हां सुरू झालं अन् तो तिच्या गाण्यांत सगळयांत अधिक रमला.

आपलं गाणं ऐकणारांपैकीं कुणाला तें कळण्याचं सामर्थ्य सर्वांत जास्त आहे, हें गाणाराला नेहमींच ओळखतां येतं कीं काय, कुणास ठाऊक ? पण मरियमला मात्र त्या दिवशीं त्या नवीन आलेल्या पोराबद्दल तसं वाटलं खरं. आणखी, पुढं देखील त्याच कारणामुळं तिचा न् त्याचा स्नेह खूप वाढला.

त्या दिवशीं तो रात्रीं साडेनऊ वाजतां घरीं गेला.

त्याच्या प्रेमळ विधवा बहिणीनं जेवायला वाढतांना त्याला विचारलं, " कुठ गेला होतास रे इतका वेळ ? अन्न सगळ निवून गेलं ना— ? "

" गाण्याला गेलों होतों. बसलों तिथं जरा जास्त वेळ. " त्यानं प्रामाणिकपणें उत्तर दिलं.

बहिणीशीं त्यानं आजवर कधींच प्रतारणा केली नव्हती.

बहीण जरा चरकलीच त्याचं उत्तर ऐकून ! पण ती त्यावर फारशी बोलली नाहीं.

" आपल्यासारख्या फडणिसांच्या घरांत बरं नाहीं दिसत हें. " एवढंच तीं सौम्यपणें त्याला त्यावेळीं म्हणाली.

पण मग त्यांचा थोरला भाऊ जेव्हां परत आला—जेवण करून तो बाहेर गेला होता—तेव्हां त्याच्या कानावर तिनं ती गोष्ट घातली.

थोरल्या भावाची अडतीची एक मोठी वखार होती गांवांत. भुईमूग, हळद, गूळ, तंबाखू वगैरे जिनसांची मोठी देवघेव चालायची तिथं. त्यासाठीं म्हणून तो वेळीं अवेळीं बाहेर जायचा.

पण अवेळीं तो कां बाहेर जायचा याची धाकट्या भावाला अंधुकशी कल्पना होती. त्यामुळें त्याच्या मनांत थोरल्या भावाबद्दल बेताचाच आदर होता.

थोरल्यानं जेव्हां त्याला उशिरां घरीं येण्याबद्दल विचारलं तेव्हां देखील त्यानं बहिणीला सांगितलं होतं तेंच प्रामाणिकपणें सांगितलं.

पण थोरला भाऊ मात्र त्यावर त्याला अद्वातद्वा बोलला. तें त्याला मुळींच रुचलं नाहीं. उलट थोरला ज्या गोष्टी चोरून करीत होता, त्यापेक्षां कितीतरी साधी गोष्ट—नायकिणीचं गाणं ऐकण्याची—त्यानं उघडपणं केली होती.

त्यामुळं त्याच्यावर भावाच्या बोलण्याचा विपरीत परिणाम झाला, आणि त्यानं मनाशीं पक्की खूणगांठ बांधली कीं या ढोंगी घरांत आपलं फारसं जमायचं नाहीं.

येवढंच नव्हे, तर बहिणीनं तरी आपल्या नादान भावाजवळ ही गोष्ट कां बोलावी तें त्याला कांहीं केल्या उमगेना. आपल्या बहिणीनं आपल्याशीं प्रतारणा केली हीच कल्पना त्याच्या मनांत रुजून बसली.

घरांतल्या या गढूळ वातावरणांतल्या असंतुष्टतेनं त्याच्या मनावर आणखी एक प्रतिक्रिया झाली कीं काय·कुणास ठाऊक ? पण दिवसेंदिवस तो मरियमकडे अधिकाधिक आकर्षिला गेला. त्यांत तीहि दिवसेंदिवस, त्याच्या सहवासांत असतांना, कृत्रिम लाघवीपणा सोडून निर्व्याजपणें त्याच्याशीं वागूं लागली होती.

हळूं हळूं आपल्या इतर चाहत्यांवरचं तिचं लक्ष उडूं लागलं, अन् ती त्याला अधिकाधिक जवळ करूं लागली.

अशा स्थितींत कलोपासनेसाठीं घडलेल्या त्यांच्या सहवासावर प्रीतीचीं फुलं उमललीं नसतीं तरच नवल !

तो फारसा श्रीमंत नव्हता, पण वडिलार्जित शेतीवाडीवर भावाभावांची उत्तम उपजीविका चालली होती. शिवाय भावाच्या वखारीवरहि तो तासन् तास राबायचा. त्यामुळें भावाकडून त्याला वरखर्चाला लागतील तसे पैसे मिळत. पण अलीकडे त्यांचीं मनं एकमेकांच्या विषयीं कलुषित झालीं होतीं.

तो गांव सोडायला तयार नव्हता तो एकाच कारणामुळें, — मरियमच्या सहवासाची नेहमींच अतृप्त राहिलेली त्याची इच्छा. तिच्यासाठीं थोडीफार लाचारी पत्करून देखील तो घरीं राहायला तयार होता.

नाहींतर त्याच्या अंगीं तडफ अन् कर्तृत्वशक्ति विलक्षण होती. शाळेंत असल्यापासूनच तो विलक्षण बुद्धिमान म्हणून विद्यार्थ्यांत चमकत होता. शिवाय साऱ्या खेळांत निष्णात होता तो. एखाद्या कादंबरींतल्या नायकासारखाच तो सर्वगुणसंपन्न होता. क्रिकेट तर असं छान खेळायचा कीं शाळेला कित्येकदां त्यानं विजयढाल मिळवून दिली होती. तीच संवय त्यानं पुढील आयुष्यांत ठेवली असती तर नायडू–देवधरांच्या इतकंच त्याचं नांव गाजलं असतं. बुद्धीनं अन् कष्टाळू संवयीमुळें, पुण्या–मुंबईला तो राहिला असता तर त्यानं चांगलीच कमाई करून स्वतःची सांपत्तिक स्थिति आणखी सुधारली असती.

पण अशा नादिष्ट लोकांचा हाच विशेष आहे. त्यांचं मन एखाद्या गोष्टीवर जडलं कीं तिच्यासाठीं ते वाटेल तें सहन करायला तयार होतात.

कांहीं वर्षांनी गांवात प्लेगची सांथ येऊन गेली. अन् पाठोपाठ देवीची सांथ पण आली. तोंपर्यंत मरियमला एक गोजिवाणं मूल देखील झालं होतं. प्लेगच्या तडाख्यांतून ती बचावली, पण देवीनं मात्र तिला विद्रूप करून टाकलं.

— आहेत कीं नाहींत कादंबरींतल्या सारखे ठराविक प्रसंग? मग त्याची तिच्यावरची प्रीति मात्र कायम होती, हें ऐकून उपहासानं हंसू नका तुम्ही...

— दोन सांथींच्यामुळें गांवांतली वस्ती बरीच कमी झाली होती. पण मरियमला हलणं सोयीचं वाटत नव्हतं. आणि ह्या तिच्या

प्रियकराचा–किसनचा राहता वाडा गांवाच्या एका बाजूला असल्या-मुळें त्यानंहि गांवाबाहेरच्या झोंपड्यांतून वास्तव्य ठेवलं नव्हतं.

अखेर देवीनं तिला गांठलच.

एक दिवस संध्याकाळीं तिला मुलासाठीं जास्त दूध हवं होतं तें त्यानं घरून नेऊन दिलं. आणि गवळी देखील तसल्या सांथीच्या दिवसांत रोज गांवांत दूध घालायला तयार नसल्यामुळें त्यानं तिच्यासाठीं दूध आपल्या घरींच घ्यायला सुरवात केली, आणि रोज तो तिच्यासाठीं अन् आपल्या मुलासाठीं तिच्याकडे दूध नेऊन पोंचवूं लागला.

अर्थात् हें त्याचं वागणं घरांत कुणालाच पसंत पडण्याजोगं नव्हतं.

दोनतीन दिवस वाट पाहून एकदां त्याच्या बहिणीनं अखेर त्याला हटकलंच—

"हें काय आरंभलं आहेस तूं किसन हल्लीं?"

आपण करतों यांत विशेष कांहीं नाहीं अशा स्वरांत किसननंच उलट विचारलं, "कुठं काय, आक्का?"

"ठेव खालीं तें भांडं!" त्याच्या बोलण्यानं चिडून बहीण ओरडली. "आम्हाला कळत नाहींसं कां वाटतं तुला? त्या सटवीसाठीं गवळ्याचा पेशा पत्करलास ना आतां?"

त्यावर एकदम उसळून किसन म्हणाला, "हं, खबरदार आक्का! मला काय वाटेल तें म्हण, पण तिला शिव्या द्यायला तुझा तिचा काय संबंध?"

आणि असं म्हणून तो तें दुधाचं भांडं घेऊन जो बाहेर पडला तो घरीं परत गेलाच नाहीं.

त्या दिवशीं त्यानं मरियमला आपली एकंदर परिस्थिति समजावून दिली. ती भीतियुक्त उत्कंठेनं सारं कांहीं ऐकत होती. तूर्त कांहीं

दिवस तिच्याकडेच मुक्काम ठेवून मग पुढच्या गोष्टी निश्चित करण्याचा आपला बेत त्यानं तिला सांगितला. घरगुती बाबतींतलं त्याचं तक्रारवजा वैतागाचं बोलणं ऐकल्यावर ती बराच वेळ स्तब्ध राहिली. आणि त्याच्याशीं त्या सबंध दिवसांत फार कमी बोलली. आपल्याच विचारांत ती गढून गेली असावी.

पण मग रात्रीं बिछान्यावर पडतांच तिनं आपल्या तोंडावर देखील पांघरूण ओढून घेतलं, अन् ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. गदगदां हालणाऱ्या तिच्या खांद्यांना स्पर्श करून किसननं तिला विचारलं, " काय झालं ग, मरियम ? "

मरियम बराच वेळ कांहीं बोलली नाहीं, कीं तिनं आपल्या तोंडावरचं पांघरूण दूर केलं नाहीं. किसननंच मग तें हलकेच दूर केलं अन् तिच्या केंसावरून हात फिरवून तो म्हणाला, " मला नाहीं सांगणार ? "

इतक्यांत चिमणा अजित कशानंसा जागा झाला अन् त्याला निजवण्यासाठीं म्हणून मरियमला उठावं लागलं. तो ताबडतोब निजला पण त्याच्याकडे पाहात राहून मरियमनं पुन्हां हुंदके द्यायला सुरवात केली.

" वेडी ! " असं म्हणून किसननं तिच्या पाठीवरून हात फिरवला. जराशानं तिला हलकं वाटलं अन् मग ती किसनला म्हणाली,

" तुम्ही इथं राहणार म्हणतां—मला नको कां आहे तसं ? पण तुमचीं घरचीं माणसं—–"

" त्या ढोंगी माणसांची पर्वा नाहीं मला. "

" पण माझ्याकरितां तुम्हाला कोण हा त्रास सोसावा लागतो आहे ! मीच तुमच्या नाशाला कारण झालें... "

" छे, छे, असं मुळींच म्हणूं देणार नाहीं मी तुला, " असं म्हणत त्यानं तिच्या तोंडावर हात ठेवला.

तरी देखील ती अडखळत कशीबशी बोलली. "माझ्यासाठीं घरदार सोडायला लावलं मीं तुम्हाला. किती मूर्ख असलें पाहिजे मी—"

हें बोलतांना, त्याच्या हाताच्या अडथळयामुळें तिचे शब्द जरा बोबडे आले.

तो म्हणाला, "मूर्ख नाहींस, पण असं कांहींतरीच बोलतेस, त्याअर्थी वेडी मात्र असली पाहिजेस."

त्याच्या शब्दांतील कौतुकाचा स्वर ओळखून ती म्हणाली, "तर–तर–!"

पण हे तिचे शब्द आणखीच जास्त बोबडे आले; त्यावर तो म्हणाला—

"नुसती वेडी नाहींस तर लहानसुद्धां आहेस. अगदीं कुक्कुलं बाळ ! बोबडं काय बोलतेस एखाद्या लहान मुलीसारखी !"

आपल्या तोंडावरचा त्याचा हात दूर करीत किंचित् हंसून ती म्हणाली, "लहान कां मी ?"

"नाहीं तर काय ?" तो म्हणाला, "घटकेंत रडतेस काय, घटकेंत हंसतेस काय ?"

यावर, "ऊंऽऽ" असा लटक्या रुसव्यांचा आवाज काढून तिनं मान वेळावली, अन् दिवा मालवून टाकला.

एकमेकांच्या बाहुपाशांत त्यांना केव्हां झोंप लागली तें कुणालाच कळलं नाहीं.

पुढ आठवड्याभरांत मरियमच्या संमतीनं किसन मुंबईला निघून गेला.

मुंबईत असे कितीतरी अनाथ जीव नेहमींच वावरत असतात कीं ज्यांना कामधंदा नसतो अन् पोटासाठीं काय वाटेल तें करायला जे तयार असतात. किसन त्यांच्यांत जाऊन मिसळला.

पण मुंबईची मजा हीच आहे कीं त्या शहरांत ज्याला थोडंफार डोकं आहे तो कसाहि पोट भरूं शकतों. एवढंच कशाला, आपली बुद्धि स्थिर ठेवली तर अशीं माणसं मुंबईत लौकरच गबर होतात.

किसन कित्येक दिवस त्या प्रचंड शहरांत बेकार म्हणून भटकत राहिला. अखेर त्याला एक पाव-बिस्किटांच्या बेकरींत नोकरी लागली. ती त्यानं स्वीकारली त्यावेळीं आपल्या प्रतिष्ठेच्या कल्पना त्याच्या आड येऊं लागल्या. पण त्यानं फारसा विचार केला नाहीं. कारण, त्याला स्वत:चं पोट भरून—किंवा प्रसंगीं तें रिकामं ठेवूनहि मरियमला पैसे पाठवणं जरूर होतं. छोट्या अजितची तिला नीट व्यवस्था ठेवतां यायला हवी.

त्यानं कांहीं दिवस भट्टीजवळ काढल्यानंतर त्याच्या मालकानं त्याची योग्यता ओळखली अन् त्याला गल्ल्यावर बसवला. त्याच्या पगारांत तेव्हांपासून दहा रुपये वाढ झाली. तरी देखील त्याला मिळत पंचेचाळीस रुपयेच. पण एवढ्याशा उत्पन्नावर त्यानं तरी किती वर्षं काढायचीं ?

कांहींहि करून जास्त पैसा मिळवतां आला तर त्याला तो हवाच होता. व्यापाराचं ढोंग करून उपजीविका करणाऱ्या मुंबईच्या कित्येक लफंग्यांची न् त्याची, ह्या बेकरींतल्या नोकरीमुळं दोस्ती झाली होती. त्यापैकींच एकानं एक दिवस कांहीं सोन्यामोत्यांचे दागिने किसनला दाखविले अन् तो म्हणाला, " मला फार गरज आहे पैशाची. एवढे विकून देतोस का मला पैसे ? "

किसननं विचारलं, " तू स्वत:च कां नाहीं विकत ? "

" त्याचं असं आहे, कीं मी स्वत:च विकायला गेलों तर माझी बाजारांतली पत नाहींशीं होईल ना ! एक बडा व्यापारी म्हणून मला इथं जव्हेरी बाजारांत सगळे ओळखतात. पण आज मला आहे पैशांची गरज; मी स्वत:च हा कारभार केला तर उद्यां मला बाजारांत कुणी उभं नाहीं राहूं देणार ! म्हणून तुला सांगायला

आलों. शिवाय माझं काम केल्याबद्दल तुला देईन ना त्यांतला कांहीं भाग—निदान पांच टक्के तरी—"

किसन विचारांत पडला. तें पाहून त्याचा दोस्त पुढं म्हणाला,— "हवं तर दहा टक्के घे. पण यावेळीं मला नाहीं म्हणूं नकोस—"

किसननं जरा भोळेपणानंच कबुली दिली. आणि दुसऱ्या दिवशीं आपल्या दोस्ताचं तेवढं काम करून द्यायचं त्यानं ठरवलं, अन् ते दागिनेही ठेवून घेतले. त्या व्यापारी दोस्तानंहि ते त्याच्याजवळ रात्रभर ठेवायला निःशंकपणें दिले, तेव्हां तर किसनला त्याच्या दोस्तीचं कौतुक वाटलं.

रात्रीं बिछान्यावर पडल्या पडल्या किसन विचार करीत होता— "दहा टक्के म्हणजे निदान दोन-तीन हजार तरी हातीं यायला हरकत नाहीं. शिवाय आपल्या एका बड्या दोस्ताची पत बाजारांत टिकविली तर पुढं मागं आणखीहि लाभ व्हायचा त्याच्याकडून. मग मरियमला म्हणावं रहा आतां एखाद्या राणीसारखी. तें भिकार खेडं सोडून मुंबईतच रहायला ये माझ्या जवळ ..."

पण त्याचे हे विचार फार वेळ टिकूं शकले नाहींत. कारण त्याच वेळी त्याच्या खोलीवर पोलीसांचा छापा आला. ते दागिने गोलपिठ्यावरच्या एका बाईचे कोणीतरी चोरून आणलेले होते. ती बाई आपल्या धंद्याला मोठं क्षेत्र मिळावं म्हणून नुकतीच पुण्याच्या बावनखाणींतून निघून मुंबईला येऊन स्थायिक होऊं पहात होती.

किसन पकडला गेला आणि त्याच्यावरचा खटला पुण्याच्या कोर्टांत दाखल झाला.

ही बातमी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली अन् पुण्याच्या त्याच्या कुणा नातेवाइकाला त्याची दया आली. त्यानं किसनला धीर दिला आणि बरीच खटपट करून हुशार वकील देऊन त्याला त्या आरोपांतून पूर्णपणें सोडवला.

याच त्याच्या नातेवाईकाकडे लहानपणीं त्याचं पालकत्व होतं, अन् त्यावेळीं त्यानं त्याला शिस्तीच्या नांवाखालीं अतोनात छळलं होतं. तेव्हांपासूनच ठराविक साच्याविरुद्ध कांहींतरी करायची प्रवृत्ति किसनच्या मनांत रुजली असली पाहिजे. अर्थात् किसनला तो कितीहि अप्रिय असला तरी एका मोठ्या संकटांतून त्या वृद्ध नातेवाइकानं त्याची सुटका केली होती. तेव्हां त्यानंतर त्याचा उपदेश ऐकणं त्याला भाग होतं.

त्याचं ऐकून तो पुन्हां गांवीं आला अन् भावाजवळ पूर्वीप्रमाणं राहूं लागला. घरच्या मंडळींना वाटलं किसन निवळला. जवळ जवळ दीड वर्ष तो तिथं राहिला. मुंबईतल्या जीवनकलहांत बरीच चलाखी संपादन केल्यामुळें भावाच्या वखारीवर तो जास्त हुशारीनं काम करूं लागला. अजितच्या पाठीवर आणखी एक मुलगा जन्माला आला अन् त्याचं नांव अंजन ठेवण्यांत आलं.

पुढं किसनचं अन् त्याच्या भावाचं पुन्हां काय बिनसलं कुणास ठाऊक ! पण तो असाच एक दिवस गांवांतून नाहींसा झाला. पार तिकडं पंजाबांत गेला होता म्हणे ! कशाला कुणास ठाऊक ? नतर कांहीं वर्षं त्यानं कराचीला घालवलीं. तिथं एका दक्षिणी ज्योतिष्यानं त्याला सांगितलं कीं, " सोन्याच्या खाणींत काम मिळणार आहे तुम्हाला. अन् तिथं तुम्ही आपलं नांव काढाल. " झालं; हा जो निघाला तो थेट कोलारला गेला. काय खटपट केली त्यानं तिथं कुणाला माहित, पण तिथं एका सोन्याच्या खाणींत खरोखरच त्यानं काम मिळवलं कीं !

या सर्व काळांत मरियमला पैसे पुरवायला तो कधींच विसरला नाहीं.

कोलारला जवळ जवळ आठदहा वर्षं तो राहिला अन् तेवढ्या अवधींत त्यानं बरीच कमाई पण केली. पण कांहीं झालं तरी नोकरीची कमाई ती. होऊन होऊन किती होणार ? त्याच्या धाडसी मनाला

त्यांत राम वाटेना. शिवाय त्याला मरियमला अगदीं शक्य तितक्या वैभवांत ठेवायची होती. ती एक जबर आकांक्षाच होती त्याच्या मनांतली.

कारण, मरियम देखील निष्ठेनं आणखी वाटेल ती झीज सोसून त्याच्या दोन्ही मुलांचं—अजित अन् अंजन यांचं शिक्षण करीत होती. ते दोघेहि बापासारखेच अत्यंत हुशार अन् आईसारखेच अत्यंत प्रेमळ आहेत म्हणतात...

किसन पुन्हां मुंबईला आला अन् द्रव्यार्जनाच्या ईर्षेनं प्रेरित होऊन तो कपाशीच्या धंद्यांत लक्ष घालूं लागला...

मला तरी हीं हकीकत कशी कळली हें मोठं नवल आहे ! गेल्या वर्षीच्या माझ्या मुंबईच्या मुक्कामांत मी एका मित्राला भेटायला म्हणून माधवाश्रमांत गेलों होतों. दुसऱ्या दिवशींची एक भेटवेळ ठरवायची होती, म्हणून खालीं सहज मॅनेजरच्या टेबलापाशीं टेलिफोन करायला गेलों. पाहतों तों हा गृहस्थ—किसन माझ्या आधींच तिथून कुणालासा टेलिफोन करत होता. त्याच्या दुसऱ्या हातांत 'टाइम्स' चा ताजा अंक होता अन् त्यांतलं कापूस-बाजारांतल्या ताज्या भावांचं पान त्यानं उघडं करून समोर धरलं होतं.

तिथं त्यानं मला ओळखलं अन् मग एक दिवस चहाला बोलावून आपली सारी हकीकत त्यानं मला सांगितली...

त्याची हकीकत मीं लक्षपूर्वक अन् सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतली. शेवटीं आपल्या आवडत्या खेळाचा उल्लेख करून तो म्हणाला,—

'बोलर फास्ट असला अन् बॅट्स्‌मन् तितकाच दक्ष असला तर बॅट्‌ची नुसती कट लागून देखील बॉल बाउंडरीवर जातो. माझं आयुष्य म्हणजे अशीच कट् लागून गेलेली बाउंडरी आहे ! माझ्यांत हुशारी अन् धमक आहे, पण तिचा उपयोग मला रूढ रीतीनं

करतां आला नाहीं. प्रत्येक ठिकाणीं परिस्थिति इतकी जोरानं अन् विचित्रपणं पुढं आली कीं माझ्यांतल्या सान्या कर्तृत्वशक्तीचा व्यय भलतीकडेच झाला! आज माझे आतेष्ट मला एका नायकिणीच्या नादीं लागलेला, घरांतून पळून गेलेला, अन् चोरीचे दागिने विकून तुरुंगांत जाऊन आलेला लफंग्या समजतात; अन् माझ्या लाडक्या मुलांच्याकडे पाहून नायकिणीचीं मुलं म्हणून लोक नाकं मुरडतात. पण मी तरी त्याला काय करणार?— बाकी माझ्यांत अन् इतर सर्व सामान्य माणसांत कांहींच फरक नाहीं. इतरांच्या-सारखाच मी थोडाफार शिकलोंसवरलों, पैसे मिळवण्याचीं धडपड केली, पैशाच्या जोरावर माझ्या कुवतीप्रमाणें माझ्या आवडत्या स्त्रीला सुखी ठेवायचा प्रयत्न केला, माझ्या लाडक्या मुलांची शक्य ती तरतूद केली, त्यांचं शिक्षण केलं. थोरला अजित पुण्याच्या एका कॉलेजमधें आहे अन् धाकटा अंजन तिथंच एका हायस्कूलमधें आहे. त्याच शिक्षणसंस्थेंत मीहि लहानाचा मोठा झालों. अन् मला अभिमान वाटतो सांगायला, कीं माझीं दोन्हीं मुलं तिथं स्कॉलर म्हणून चमकताहेत आज! फक्त त्यांना माझं नांव नाहीं लावतां येत उघडपणें. पण म्हणून काय झालं? माझ्या मुलांचं हुशार म्हणून कौतुक होतं, त्यांत मीं स्वतःला धन्य मानूं नये का?...'

किसननं प्रामाणिकपणं सांगितलेली हकीकत मी खोटी मानायला तयार नव्हतोंच. त्यांत पुन्हां परवां मला त्या हकीकतींतला शेवटचा दुवा सांपडला. पुण्याच्या कुठल्याशा मोठ्या शाळेचं त्रैमासिक मी परवां चाळत होतो. त्यांत शाळेंतल्या स्कॉलर्सचे फोटो छापलेले होते. त्यांत अजितचा फोटो मला पाहायला मिळाला. थेट बापासारखा रुंद जबडा, वर आलेलीं गालाचीं हाडं, किंचित् कलती मान ठेवून शून्यांत पहाणारी तीच बापासारखी लकब, अन् जरा जास्तच पुढें आलेल्या चिंचोळ्या हनुवटीला मध्यभागीं लहानशी खळी! कोण विलक्षण साम्य!— मॅट्रिकच्या परीक्षेंत त्याला विशेष मानाचं एक

बक्षीस मिळालं होतं. फोटोखालच्या उल्लेखांत त्याचं नांव छापलं होतं— 'कुमार अजित गायक...'

मीं मनांतल्या मनांत म्हटलं— 'अखेरचा दुवा सांपडला !—'

कांबळे साहेबांची हकीकत येथवर आली; आणि इतक्यांत—

'अखेरचा दुवा सांपडला !' हेच शब्द आम्हाला सांगायला म्हणून गांवातला शिपायांचा एक नाईक रामोशाला बरोबर घेऊन तेवढ्या रात्रीं आमच्या वाड्यांत आला.

शेकोटी विझत आलेली होती.

नाइकानें सांगितलेली गोष्ट अशी होती.— खोट्या नाण्यांच्या कारखान्यांतले संशयित आरोपी निश्चित झालेले होते. मात्र प्रत्यक्ष गुन्हा करण्याच्या वेळीं त्यांना अटक करतां यावी म्हणून फौजदार वाट पहात होते, अन् त्यांनीं त्यांच्या हालचालींवर सूक्ष्म नजर ठेवली होती. आजच त्यांपैकीं दोघे आरोपी गांवापासून नऊ मैल असलेल्या एम्. एस्. एम्. रेल्वेच्या स्टेशनवर एक खोटा रुपया चालवण्याच्या प्रयत्नांत असलेले आढळून आले होते.

रुपया खोटा आहे असें स्टेशनमास्तरनें सांगतांच त्यांनी कांहीं बाचाबाची सुरूं केली होती आणि त्यांना अटक करण्यांत आली होती. स्टेशनमास्तरनें आपल्या जबानींत असें म्हटलें होतें, कीं 'हे दोन इसम रोज नियमितपणें जवळच्याच स्टेशनपर्यंत प्रवास करीत असून रोज किरकोळ गाडीभाड्यासाठीं हे रुपयाची मोड मागतात...'

त्या दोन इसमांच्या आतां रात्रींच जबान्या घ्यायच्या होत्या आणि तेथें हजर राहण्यासाठीं फौजदार साहेबांचें बोलावणें घेऊन नाईक आमच्याकडे आला होता. फौजदारांचें म्हणणें होतें कीं, 'बाकी सर्व गोष्टींनी रुपया उत्तम—अगदीं अस्सल वाटतो. फक्त

आवाजांत जरा कमी असल्यामुळें कोठेंहि खपण्याजोगा नाहीं.– तो खपविण्याचा प्रयत्न करणें हा त्या दोघां इतमांचा गुन्हा आहे; आणि त्याच्या जोरावरच येथील खोट्या नाण्यांचा कारखाना आम्हाला हूडकून काढायचा आहे.'

फौजदारांचा निरोप सांगून नाईक म्हणाला, ' अखेर शेवटचा दुवा सांपडला !'

' आम्ही येतोंच; पुढं व्हा तुम्ही—' असें जावळे साहेबांनी सांगितल्यामुळें नाईक आणि रामोशी पुढें निघाले.

त्यांच्या मागोमाग आम्हीहि उठलोंच आणि फौजदारांच्याकडे जायला म्हणून हातांत विजेचा टॉर्च घेऊन निघालों.

वाटेंत आपल्या गरम ओव्हरकोटाची कॉलर वारंवार चाचपीत कांबळेसाहेब सांगत होते—

" बाकी, जावळे साहेब ! तुम्हाला देखील असंच नाहीं कां वाटत, कीं आपला समाज हा सुद्धां एक मोठा थोरला खोट्या नाण्यांचा कारखाना आहे म्हणून ? किसनच्या मुलांचंच पहा ना– दोघेहि बापासारखे हुशार अन् आईसारखे प्रेमळ आहेत; पण त्यांचा जन्म रूढ प्रकाराहून जरा वेगळ्या रीतीनं झाल्यामुळें समाज त्यांना जरा दूरच नाहीं कां ठेवत ? दिसायला कितीहि सारखे असले तरी मुंबईच्या टांकसाळीखेरीज इतरत्र तयार झालेले रुपये जरा निराळा आवाज देतांच खोटे ठरतात ! अशा खोट्या रुपयांची किंमत समाज एकदम शून्यच ठरवतो ! एरवीं अस्सल, पण कठोर तपासणी करतांच नकल ठरणारीं अशीं किती खोटीं नाणीं ठिकठिकाणीं दिसतात. हा त्या नाण्यांचा का दोष ? छे, छे, आपला समाज म्हणजे एक मोठा खोट्या नाण्यांचा कारखानाच नाहीं तर काय ?... "

— ' ज्योत्स्ना '
वर्षारंभ खास अंक, मे १९३९.

# सुटलेला नाद

चहाचा रिकामा केलेला कप शशिकांतानें काळजीपूर्वक बशीवर ठेवला, आणि समोरच्या वृत्तपत्राची घडी करतांना त्यानें एक उसासा टाकला. मग ती घडी टेबलावर आपटीत तो आपल्या पत्नीकडे वळून म्हणाला,

'हं, काय म्हणत होतीस तू प्रमिले?'

'म्हणणार काय दुसरं?' ती जवळ जवळ ओरडतच म्हणाली, 'मला किनई, आतां अगदीं वीट आलाय् ह्या गोष्टींचा! आपलं लग्न झाल्यापासनं पहातेंय् मी—असेल नसेल तो सगळा पैसा तुम्ही खुशाल रेसवर उधळीत आलांत. घरांत हवं नको कांहीं पाहायला नको का?...'

'प्रमिले,' शशिकांत शांतपणें म्हणाला, 'कांहीं झालं तरी तूं स्त्री आहेस.—कारण नसतांना उगीच कसं घाबरून जावं हें बायकांच्या जातीला पक्कं ठाऊक असतं! तुझ्या हें कसं लक्षांत येत नाहीं, कीं ह्या घोड्यांच्या जोरावर एक दिवस मी लखपति होणार आहे? असे काबाडकष्ट करून कां कुठं श्रीमंत होतां येतं? त्यांनीं फार तर अन्नवस्त्राच्या गरजा भागतील! तेव्हां एक दिवस मनाजोगा—खूपसा पैसा कमावला कीं मीं रेस खेळणं सोडलंच म्हणून समज!'

प्रमिलेनें असंतुष्टपणें मान हलवली. ती म्हणाली,

'इतके दिवस हेंच सांगत आलांत; माझी खात्री आहे, अखेरची दिडकी घरांत शिल्लक असेपर्यंत तुमचे महालक्ष्मीचे हेलपाटे चुकायचे नाहींत.—पुरे झालं बाई, आतां सोडा ना एकदाचं हें व्यसन !—माझ्यासाठीं तरी निदान...'

अखेरचे शब्द तिनें अगदीं काकुळतीला येऊन उच्चारले होते. त्यांचा हवा तोच परिणाम झाला.

शशिकांत किंचित् पुढें वाकला, आणि प्रमिलेच्या खांद्यावर थोपटल्यासारखें करून हलक्या आवाजांत म्हणाला,

'बरं; तूं म्हणतेस तसं. आजपासून नाहीं रेस खेळणार;—मग तर झालं ?'

असें म्हणून त्यानें पुन्हां तोंड वळविलें आणि तो त्या वृत्तपत्राची घडी उलगडूं लागला...

संध्याकाळीं शशिकांत सहज बाहेर गेला असतांना नेहमींप्रमाणें नाना आला. आणि त्याच्या येण्याबरोबर प्रमिलेच्या जिवाला जरा हायसें वाटलें. सासरीं हालांत दिवस काढीत असतां, सहानुभूति दाखवायला माहेरचं माणूस असलं तर कोणत्या स्त्रीच्या जिवाला त्यांतल्या त्यांत समाधान वाटणार नाहीं ?

प्रत्येकाच्या आयुष्यांत कधीं ना कधीं तरी अशी एक वेळ येते कीं त्यावेळीं मनांतलें सगळें दुःख दुसऱ्याला बोलून दाखवावें लागतें.

प्रमिलेच्या आयुष्यांत तरी आज ती वेळ येऊन ठेपली होती.

'—काय रे नाना,' ती म्हणाली,'किती दिवस हें असं चालायचं ?'

'पण त्यांनीं आज वचन दिलं ना तुला ?— रेस खेळणार नाही म्हणून ?'

'वचनं काय, रोजचींच आहेत— चार वर्षं झालीं मी विटकीं सुताडीं नेसत आलें असलीं ! तूंच सांग, माणसानं सोसायचं तरी किती ? याला उपाय नाहीं का कांहीं ?'

‘ आहे एक उपाय—पण एकच आहे. अन् तोच तुला सुचवायला म्हणून मी मुद्दाम आलों आज पमाताई ! ’

त्याची पमाताई त्याच्याकडे उत्सुकतेनें पाहूं लागली. एक आवंढा गिळून नाना म्हणाला—

‘ माझी झालीय बदली इथून. उशिरांत उशीर म्हणजे शनिवारीं निघालं पाहिजे मला इथून. रात्रींच्या गाडीनंच जावं म्हणतों मी.—तर चलतेस का माझ्याबरोबर ? वाटेंत बाबांच्याकडे सोडीन मी तुला. त्यांना स्टेशनवर यायला लिहूं हवं तर. पहा—सोबत मिळतेय् आयती.’

‘ पण माहेरीं जाऊन करूं तरी काय मी ? ’

‘ नुसती चल तर खरी ! तूं जर शशिकांताला न कळवतां माहेरी निघून गेलीस तर मला वाटतं, त्याचं डोकं लगेच ताळ्यावर येईल... आणखी काय ग ?—अशा नादान माणसाबरोबर तूं इतकीं वर्षे राहिलीस तरी कशी ? ह्यालाच जर पातिव्रत्य म्हणायचं असलं तर तें अगदींच कुचकामी आहे ! ’

‘ मी त्यांच्याजवळ असतांना हें असं चाललंय्, तर मी निघून गेल्यावर काय अवस्था होईल त्यांची ? ’

‘ तूं कशाला पर्वा करतेस त्याची ? ’

प्रमिलेला आपल्या मनाचा असा एकाएकीं निश्चय करतां येईना. ती शून्य दृष्टीनें समोर पाहात राहिली.

‘ अशी गोंधळून जाऊं नकोस पमाताई ! मला आत्तांच तुझी कबुली हवी असं मी म्हणत नाहीं. सावकाश सांग. विचार कर दोन दिवस हवा तर. शनिवारला अजून खूप अवकाश आहे...’

पण प्रमिलेला त्यावर फारसा विचार करण्याचा प्रसंगच आला नाहीं. कारण शशिकांतानें तिचें भवितव्य जणूं ठरवून टाकलें होतें.

तो बाहेरून आला तो विशेष उल्हसित मनोवृत्तींत दिसत होता. प्रमिलेनें ओळखलें, शनिवारी धांवणाऱ्या एखाद्या घोड्याची धुंदी ह्यांना चढली असावी.

वस्तुस्थिति तशीच होती. शनिवारच्या पांचव्या शर्यतींत अमुक घोडा नक्की 'विन्' मध्यें येणार आणि तमुक नक्की 'प्लेस' गांठणार अशी त्याला आज अगदीं खात्रीलायक बातमी समजली होती; आणि ती त्यानें प्रमिलेजवळ सांगितली. प्रमिलेला अशा गोष्टी ऐकायची आतांपर्यंत खूप सवय झालेली होती. तेव्हां तिनें त्याकडे दुर्लक्षच केलें. पण मग तो पुढें जें कांहीं म्हणाला त्याकडे लक्ष देणें तिला भाग पडलें.

'हो ना!' तो पुढें सांगत होता, 'ह्या खेपेची 'टिप' खोटी ठरणं शक्यच नाहीं. माझी इतकी खात्री आहे, कीं मीं त्या घोड्यावर बँकेंतली पै न् पै लावली आहे.'

'बँकेंतली?' प्रमिलेनें भय-विस्मयचकित होऊन विचारलें, 'बँकेंत जे थोडे पैसे आहेत त्यांना तशीच जरूर पडल्याखेरीज हात लावायचा नाहीं असं आपलं ठरलं होतं ना? आतां कांहींच राहिलं नाहीं म्हणायचं?'

'पहा—पहा,' शशिकांत समजावणीच्या स्वरानें म्हणाला, 'अशी घायकुतीला आल्यासारखं काय करतेस? आतां तर खरी संधि आलीय् आपल्याला श्रीमंत व्हायची. ह्या घोड्यावर लावायला मीं तर उसने देखील घेतले आहेत थोडे पैसे. माझी तितकी खात्री नसती तर मीं सगळे पैसे लावले तरी असते कां?—वेडी कुठली!'

यावर प्रमिला कांहींच बोलली नाहीं.

निदान शशिकांताला तरी ती कांहींच म्हणाली नाहीं.

मात्र त्यानंतर जेव्हां ती नानाला भेटली तेव्हां त्याला म्हणाली, 'नाना, ठरला माझा विचार. ह्यापुढं कांहीं हा जुलूम सहन व्हावयाचा नाहीं माझ्याच्यानं. मी आपली तुझ्याबरोबर येतें कशी...'

सामान जरी फार नव्हतें, तरी तिचा शनिवारचा सबंध दिवस तें आवरण्यांत गेला.

संध्याकाळीं सहा वाजतां शशिकांत घरीं आला, तो अगदीं हताश

झाल्याप्रमाणें दिसत होता. उरला सुरला मित्र गमावावा, किंवा खिशांतली अखेरची दिडकी खलास व्हावी तसा त्याचा चेहरा दिसत होता. परिस्थिति तशीच येऊन ठेपली होती. त्यानें ज्यावर पैसे लावले होते तो घोडा हरला होता.

'मला जेवायचं नाहीं —' असें सांगून तो पलीकडच्या खोलींत कसाबसा बिछान्यावर जाऊन पडला. त्याची तिला एक प्रकारें कींव आली. जरा वेळानें तीहि त्या खोलींत आली. नवल हें कीं त्याच्याकडे पाहतांच तिनें एकदम किंचाळी कशी फोडली नाहीं!

— कारण, हातांत एक कसलीशी चकचकीत वस्तु घेऊन शशिकांत उभा होता. प्रमिला आंत आल्याबरोबर त्यानें ती वस्तु चट्कन् शेजारच्या कपाटाच्या खणांत लपवली. पण ती रुपेरी मुठीची सुरी असल्याचें प्रमिलेनें पाहिलें आणि आपण अशा प्रसंगीं काय करायला पाहिजे हें तिला क्षणार्धांत कळून चुकलें.

त्यामुळें, वास्तविक ज्यावेळीं ती नानाच्या सोबतीनें माहेरीं निघून जायच्या धादलींत असायची, त्यावेळीं ती नानाला एकंदरींत वस्तुस्थिति समजावून सांगत होती.

'—म्हणून तर म्हणतें मी,' ती अखेर नानाला म्हणाली, 'कीं आतां कांहीं मी येत नाहीं तुझ्याबरोबर. अशा वेळीं मला त्यांना सोडून जाणं अशक्य आहे; अगदीं अशक्य आहे...त्या शर्यतीवर त्यांनीं होता नव्हता तो पैसा उधळला—अन् आतां तर धडधडीत आत्महत्या करायच्या विचारांत होते ते. तेवढ्यांत मी तिथें गेलें. नशीब माझं! ( तिच्या डोळ्याला पाणी आलें ) अन् ती सुरी सुद्धां नंतर मीं हळूंच लपवून ठेवलीय्.—पण ते अशा मनःस्थितींत असतांना जर मी त्यांना सोडून गेलें तर त्यांना एवढा धक्का बसेल कीं भलतंच कांहीं करून घ्यायचे एखादे वेळीं. ( तिनें पदरानें डोळे पुसले )—छे, छे, मला राहिलंच पाहिजे त्यांच्याजवळ.'

नाना कांहींच बोलला नाहीं. कांहीं बोलायला त्याला जागाच

नव्हती. त्यानें अखेर एकच तिकीट काढलें आणि त्याला स्टेशनवर पोंचवायला म्हणून प्रमिला तेथपर्यंत गेली. शेवटीं पुन्हां ती त्याला म्हणाली, ' माफ कर मला नाना, पण मी यावेळीं त्यांच्याजवळ राहण्यानंच त्यांच्यांत सुधारणा होण्याचा संभव आहे, असं मला वाटतं. त्यांच्यापासून दूर न होणंच माझं आज कर्तव्य आहे. तें मीं कसोशीनं पार पाडलं तर, आज नाहीं उद्यां त्यांचा नाद सुटेल. '

प्रमिला स्टेशनवरून परत आली तेव्हां तिचे पाय एकप्रकारच्या गूढ भीतीनें लटलट कांपत होते. कसला तरी विलक्षण थकवा आल्यासारखें तिला वाटत होतें, आणि आपल्याला आतां भोंवळ येणार कीं काय अशी तिला एकसारखी शंका येत होती...

शशिकांत अधिकच हताश होऊन बिछान्याच्या कडेला बसला होता. प्रमिला आंत आल्याबरोबर त्यानें कपाळाला किंचित् आंठ्या आणून प्रश्न केला,

' मघाशीं माझ्या हातांत सुरी होती ती काय झाली ? — ड्रॉवर-मधें ठेवली होती मीं ती... '

प्रमिलेनें आपल्या हाताचा विळखा त्याच्या खांद्याभोंवतीं टाकला आणि ती त्याला अर्जवी स्वरांत म्हणाली,

' मीं घेतली ती.— असं काय बरं वेड्यासारखं करतां ?... त्यांत येवढं वाईट वाटून घ्यायला काय झालं ? ते गेलेले पैसे काय, मिळतील उद्यां परत. '

शशिकांताचा चेहरा तेवढ्यांतल्या तेवढ्यांत जरा उल्हसित झाल्यासारखा दिसला. ' मिळालेच पाहिजेत उद्यां परत ! ' तो एकदम मोठ्यानें म्हणाला, ' तेवढ्यासाठींच तर मला ती सुरी आत्तां हवी आहे. रुप्याची मूठ आहे तिला. ती गहाण टाकून तिच्यावर मी थोडे पैसे उसने आणणार आहे.—उद्यांच्या तिसऱ्या शर्यतींतला नक्की घोडा कळलाय मला !... '

— ' कला '

प्रसिद्ध झालें !        विक्रीस तयार !

# अंतरींच्या खुणा

( लघुकथा संग्रह )

लेखकः—श्री. वैजनाथ लक्ष्मण पेंडसे

प्रस्तावनाकारः—के. नारायण काळे
बी. ए., एल्एल्. बी.

किंमत १॥ रुपया

मिळण्याचें ठिकाणः–
' मन्दार ' एजन्सी
काळाराम मंदीर
ठाकुरद्वार, मुंबई नं. २

प्रकाशकः–
जनार्दन सदाशिव लिमिटेड
३९४ सदाशिव पेठ
पुणें नं. २

---

महाराष्ट्राचें नवें मासिक

# मन्दार

संपादकः–मनोहर रानडे

वार्षिक वर्गणी टपाल हंशीलासह २ रुपये

राजकीय, सामाजिक, आर्थिक, ललित इ.
वाङ्मयानें सजविलेलें मासिक

मॅक्झिम गॉर्की यांची

' फोमा '

कादंबरी नोव्हेंबर १९४० पासून चालू आहे

# त्यागपत्र

किंमत १॥ रुपया

लेखकः—जैनेन्द्रकुमार

अनुवादकः—श्री. अ. म. जोशी M. A.

घटना घडत असतात, घडून समाप्त होतात. आपण जगतों, आणि जगतां जगतां एक दिवस मरतों. जीवनाला आरंभ किती उत्साहानें करतो ! आणि शेवट ? ते एक रहस्य आहे .... गूढ आहे !

**जनार्दन सदाशिव लिमिटेड**

३९४ सदाशिव, पुणें २

---

**जगांतील भिन्न भिन्न देशांतील नवलपूर्ण कथांचा**

**— अभिनव कथासंग्रह —**

# रेशमाचे कोष

लेखकः–विद्यासेवक बी. ए. ( ऑनर्स )

**किंमत ८ आणे**

क्रौंच पक्षाच्या मिथुनावर व्याधानें बाण टाकल्यामुळें विव्हळ झालेल्या वाल्मिकीच्या मुखांतून जसें रामायण बाहेर पडलें, तसेच नित्यशः आपल्याच देशबांधवांच्या दुर्दशेमुळें त्यांच्या मूक किंकाळ्या कानांत शिरून त्यांनीं विदारण केलेल्या हृदयांतून ही गद्यमय चित्रें निर्माण झालेलीं आहेत.

# थोडा रुचिपालट

" थोर महात्मे होऊनि गेले
— चरित्र त्यांचें पहा जरा "

खरेंच, पण आधीं आत्मचरित्र लिहून मग थोर होण्याचा बेत करणाऱ्या विभूति वन्दनीय नाहींत काय ?

विनोदी वाङ्मयाची भूक भागविणारे

# मनांतील मांडे

खाणार : लखजी आंवराईकर

तुम्हीहि चव घेऊन पहा !

प्रकाशक : **जनार्दन सदाशिव लिमिटेड,**
३९४ सदाशिव पुणें २.

---

## आमचीं प्रकाशनें

१ नाद-निनाद
२ स्वाति
३ नवा प्रातःकाल
४ कलावंतांच्या सहवासांत
५ चांदण्यांतील सावल्या
६ चित्रा
७ वणवा
८ मंद ज्योति
९ अनिर्बंध जीवन

## कॉंटिनेन्टल बुकसर्व्हिस,
## टिळकरोड, पुणें २

# आमचीं प्रकाशनें

श्री. ग. ना. जोशी, बी. ए., एल्. टी. यांची

## इतिहासावरील पुस्तकें

* **हिंदुस्थानचा संपूर्ण इतिहासः**—मराठी भाषेंत या प्रकारचें या विषयावरील हें पहिलेंच पुस्तक असून याच्या तोडीचें मराठींत दुसरें पुस्तक नाहीं. महाराष्ट्रांतील नामांकित शाळांतून हेंच पुस्तक चालू आहे. पृ. सं. ६०१. किं. रु. २॥.

* **हिंदुस्थानचा सुलभ इतिहासः**—शिक्षणशास्त्राला अनुसरून अत्यंत पद्धतशीर रीतीनें लिहिलेला हा इतिहास ठिकठिकाणीं चालू असून याच्या सुधारून वाढविलेल्या ५ व्या आवृत्तिची छपाई होत आहे. पृ. सं. ३२२. किं. १४ आणे.

* **इंग्लंडचा सुलभ इतिहासः**—इतर पुस्तकांतील विवेचना-पेक्षां या पुस्तकांतील विवेचनपद्धति फार भिन्न असून मांडणीहि शिक्षणशास्त्राला धरून आहे. या पुस्तकाचीहि ५ वी आवृत्ती छापली जात आहे. पृ. सं. २५५. किं. १॥ रु.

**हिंदुस्थान संपूर्ण व इंग्लंड सुलभ इतिहासः**—किं. १॥ रु.

## विज्ञान ( Physics )

ले. के. वि. चितळे, बी. एस्सी., एल्. टी., एल्एल्. बी.

मध्यप्रान्त हायस्कूलबोर्डानें या पुस्तकाला टेक्स्टबुक म्हणून मंजुरी दिली आहे. नित्याच्या व्यवहारांत विज्ञानाचा उपयोग कसा केलेला असतो हें सोदाहरण यांत दाखविलें आहे. मराठी भाषेंत या विषया-वर इतकें उत्कृष्ट दुसरें पुस्तक नाहीं. पृ. सं. ४५८. किं. २॥ रु.

* हीं पुस्तकें मुंबई व मध्यप्रान्त शाळाखात्यांनीं टेक्स्ट-बुक म्हणून मंजूर केलीं आहेत.

**जनार्दन सदाशिव लिमिटेड,**

३९४ सदाशिव, पुणें २.

१५७१०.